
२४ फेब्रुवारी ७३ । पन्नास पैसे

# माणूस

## मुक्काम: मुंबई





संपादक
श्री. ग. माजगावकर

२४ फेब्रुवारी १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये वर्ष : बारा अंक : अडतीस
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

## सप्रेम नमस्कार...

५ जानेवारी, ७३

□ ३०-१२ च्या 'माणूस' मधील चंद्रशेखर मराठे यांच्या लेखावरील माझी प्रतिक्रिया—मी राजकीय किंवा आर्थिक विषयाची अभ्यासक नाही. परंतु एक सामान्य मध्यमवर्गीय जागरूक वाचक.

मूलत: मला असे वाटते की, विचारस्वातंत्र्य म्हणजे अनिर्बंध, स्वैर विचारांचे प्रकटीकरण नव्हे. बहुसंख्य समाजाच्या राष्ट्रांतर्गत समस्यांच्या यशस्वी सोडवणुकीचा परिस्थिती सापेक्ष विचार मांडण्यात जर बंधने असतील तरच तो विचारस्वातंत्र्यावरील आघात होय. भारतात विचारस्वातंत्र्य आहे याचा अर्थ इथे बसून इथल्या अन्नपाण्यावर पोसली जाणारी माणसे रशियन, अमेरिकन, पाकिस्तानी, चिनी ह्या राष्ट्रांची भलावण करू शकतात. त्यांची विचारसरणी स्वीकारल्यास सद्य:कालीन नरकावस्था झटकन बदलून स्वर्गीय अवस्था निर्माण होईल असे धीटपणे म्हणू शकतात. ज्या स्वर्गीय रशियात हिप्पी निर्माण होत नाहीत तेथे अमेरिकन

---

राज्य नाट्यस्पर्धा पुरवणीतील सर्व छायाचित्रे : राजदत्त, मुंबई
मुखपृष्ठ : सुभाष अवचट

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

विचार वाचल्यामुळेसुद्धा सैबेरियात जावे लागते. आचरणात आणणे दूरच.

भारततात अन्न, वस्त्र, निवारा ह्या प्राथमिक गरजांपासूनदेखील सामान्य माणूस वंचित आहे, याचे कारण आमच्याकडे विचारवंत नाहीत आणि परदेशातून PL 480 प्रमाणे विचारसुद्धा आयात करावेत अशी परिस्थिती खचितच नाही. भरपूर हरित क्रांती होऊनसुद्धा आमच्याकडे दुष्काळ असतो. औद्योगिक उत्पादन वाढूनसुद्धा Scarecity वाटते याचे कारण विकली जाणारी माणसेच. Sold People गुंडांची भलावण करतात. साखर उत्पादकांच्या कॉलेजात नोकरी करून त्यांच्या पापांवर पांघरूण घालतात. परदेशात रहायला मिळावे म्हणून परदेशाची तोंड फाटेपर्यंत स्तुती करतात.

प्रस्थापितांविरुद्ध सातत्याने आणि खरेखुरे बोलता येणार नाही, येत नाही याचे कारणदेखील विकलेली माणसे. दुर्दैवाने आमच्याकडे Committed नोकरशाही निर्माण होऊ पहात्येय. पट्टेवाल्यापासून न्यायाधीशापर्यंत माणसे विकत घेता येतात आणि स्वतःला बुद्धिवंत, विचारवंत म्हणविणारी माणसे स्वतःला विकून घेतात. फरक इतकाच की, कोणाला रुबलसचा तर कुणाला डॉलरचा तर कुणाला पौंडाचा मोह पडतो.

रशियन वा अमेरिकन कुबड्यांचा आधार घेऊन आमच्याकडे संपन्नतेचे पाट वहाणार असतील तर 'तशी' संपन्नता आली नाही तरी चालेल असे मध्यमवर्गीय माणसाला वाटते. कारण गुलामगिरीतील दुःख फक्त ह्या वर्गालाच समजू शकते. सामाजिक संदर्भात भावनेलाच अधिक किंमत द्यायला हवी. कारण समाजाची बांधिलकी ही भावनेनेच निर्माण होते. विचारवंतांचा समाज होऊ शकत नाही फार तर गट निर्माण होतो. समाजाचे प्रातिनिधिक मत कोणाही विचारवंताच्या मतापेक्षा अधिक श्रेष्ठ, असे मला वाटते.

हिप्पी फक्त अमेरिकेतच निर्माण होतात असे नाही. भारतातदेखील असतात. चार्वाक पंथीय लोक समाजात सर्वत्र असतात. त्यांच्या टोळ्यादेखील असतात (विशेषत: श्रीमंत उच्चभ्रू लोकात). कोणी जटा वाढवतात, कफनी घालतात, संन्यास घेतात. नावे निराळी, वृत्ती तीच. अमेरिकेत हिप्पी निर्माण झाले यामागे आर्थिक कारणे नसून (माझ्या मते) सामाजिक व सांस्कृतिक कारणे असावीत. ढासळती कुटुंबव्यवस्था, अत्यंतिक यांत्रिकीकरण व प्रभावी आत्मकेंद्रितता यामुळे निर्माण होणारे ताण यांच्या जोडीला अनिर्बंध आचार–विचारस्वातंत्र्य आणि समाजाची पराकोटीची सहिष्णुता यामुळे हिप्पी निर्माण होतात. रशियात हिप्पी निर्माण होत नाहीत याचे कारण राजकीय व सामाजिक असहिष्णुता.

सामाजिक बंधन व समाजरचना यावर एतद्देशीय विचारवंतांनी भाष्यच केले नाही म्हणून परदेशी अवतरणे द्यावी लागतात, हे म्हणणे मला मान्य नाही. अगदी मनूपासून आगरकरांपर्यंत

समाजविषयक भाष्ये बरेच लोक करत आलेत, आजही करताहेत. Implimentation होत नाही इतकेच.

मदालसा मेढेकर, पेण, (कुलाबा)

[ याविषयावरील पत्रव्यवहार आता थांबवलेला आहे. –सं. ]

¤ महर्षी मराठे !
लेखक : अनिल बर्वे
–पुढील अंकी

२७ जानेवारी ७३

¤ यावेळी 'माणूस'चा प्रजासत्ताक विशेषांक उशीरा आला. निदान मुंबईत तरी – अखेर आज सायंकाळी बोरीबंदरजवळच्या पेपरवाल्याकडून तो मिळवला अन् सायं. ५-१९ ची ठाणा लोकल पकडून एका कोपऱ्यात बसून वाचायास सुरुवात केली – विक्रोळीच्या गोदरेज प्रकरणाविषयी खास लेख आढळला म्हणून उत्सुकतेने वाचू लागलो. एवढ्यात दादरला कोणीतरी माझा अंक खेचून 'कसला अंक ?' अशा नजरेने पाहिले. लोकलमधला हा नेहमीचाच अनुभव. म्हणून मी वाचन सुरूच ठेवले, पुढे सायनच्या जवळपास त्याने जाग्यावरून उठून मी कोणते प्रकरण वाचतोय व फोटो वगैरे कोणाचे आहेत हे बघण्यासाठी पुन्हा अंक ओढून पाहिला – मी थोडासा वैतागलोच – मनात म्हटले, 'XXX आली कटकट !' तो कुर्ल्याला ती स्वारी चक्क माझ्याजवळ बसून ते गोदरेज प्रकरण वाचू लागली माझ्याच अंकात डोके खुपसून – हाही एक नेहमीचाच वैताग ! असे म्हणत मी गप्प राहिलो. तर मग (मला वाटले न राहावून) त्याने घाटकोपरला मला अखेर विचारलेच कोणी लिहिलेय हो हे सारे ?'–मी तर एवढा वैतागलो होतो की मी निमूटपणे पृष्ठ क्र. २५ काढून त्यावरील 'माणूस प्रतिनिधी – सु. ल. सोमण' यावर बोट धरले अन् त्याच्याकडे अशा नजरेने पाहिले की 'आता झाले एकदाचे समाधान !' त्यावर तो तरुण पोरगेलासा गृहस्थ (आता मी कोठे त्याला नीट पाहिले होते) माझ्याकडे बघत अगदी मनापासून सद्गदून म्हणाला, 'अगदी खरं खरं लिहिलयहो त्यांनी ! अगदी असंच सारे घडलेय बघा !'–मग मीही विचारले, 'आपण गोदरेजमध्ये असता का ?' त्यावर तो 'हो, म्हणून तर सांगतोय राव !' एवढच म्हणाला, पुढे मी काही विचारणार एवढ्यात विक्रोळी आले अन् तो 'बरं' म्हणत उतरूनही गेला.

हे सारे भारूड लिहिण्याचा प्रपंच एवढ्याचसाठी केला की श्री. सोमण यांच्या लेखाची ही साधीसुधी पण खरीखुरी 'दाद' मला आपणापर्यंत पोचवावीशी वाटली. प्रत्यक्षात काय घडलंय ते 'सत्य' कधी उघडकीला येईल ते येवो. तोपर्यंत एका सर्वसामान्य कामगाराची ही प्रतिक्रिया मला सत्याएवढीच लाखमोलाची वाटेल.

सुहास बाके, ठाणे

[ कुमार केतकर यांनी विक्रोळी प्रकरणाचा केलेला आणखी उलगडा –पुढील अंकी. ]

मुक्काम मुंबई

# यंदाची अंतिम राज्य नाट्यस्पर्धा

लिखाणाबाबतचे मतभेद क्षणभर बाजूला सारून असं म्हणता येईल की, 'घाशीराम कोतवाल' ही यावर्षीच्या स्पर्धेतील आवर्जून नोंद घ्यावी अशी नाट्यनिर्मिती. संगीताची थोर परंपरा असलेल्या मराठी रंगभूमीवर खऱ्या अर्थाने सर्वांगात संगीत-नृत्य मुरलेले 'घाशीराम' सारखं नाटक आले नाही. व्यावसायीक संस्थांना अनेक कारणांनी न झेपणारी ही नाटके केवळ स्पर्धेमुळेच काही प्रायोगिक संस्था मोठ्या जिद्दीने रंगभूमीवर आणू शकतात. यातूनच चार-दोन नवे चेहरे, नवे लेखक, दिग्दर्शक व्यावसायीक रंगभूमीला मिळत राहतात, याहीपेक्षा रंगभूमीविषयी नवी जाण असलेला एक प्रेक्षक हीं

# यंदाची अंतिम राज्य नाट्यस्पर्धा

मुक्काम मुंबई

स्पर्धा तयार करते हे या स्पर्धेचे प्रमुख यश.

या वर्षीच्या स्पर्धा संपल्या आहेत. त्याचे निकाल जाहीर होऊन त्यावर उलट–सुलट चर्चाही सुरू झाल्या आहेत. थोड्या दिवसात चर्चा थांबतील आणि मंडळी पुन्हा नव्या उत्साहाने, नव्या जिद्दीने पुढच्या वर्षाच्या तयारीला लागतील.

यावर्षीच्या स्पर्धेत अंतिम फेरीत सादर झालेल्या दहा–बारा नाटकांचे अधिक विस्ताराने व एकत्रित परीक्षण देण्याच्या कल्पनेतून या पुरवणीची योजना ठरली.

समीक्षक आहेत

**पुष्पा भावे**

यंदाच्या राज्य नाटयस्पर्धेच्या अंतिम फेरीचा प्रारंभ नववर्षदिनी अकोलकरांच्या 'चालविशीहाती' या नाटकाच्या प्रयोगाने झाला. चेंबूरच्या 'नाटचप्रपंच' या संस्थेने हा प्रयोग सादर केला. ह्या संस्थेने यापूर्वी काही अवघड पाश्चात्य नाटचकृतींची मराठी रूपांतरे सादर केलेली आहेत. प्रायोगिक रंगमंचावर घडणाऱ्या घडामोडींशी निष्ठेने संपर्क ठेवणारी काही मंडळी या नाटयसंस्थेत असल्यामुळे त्यांची नाटचसंहितेची निवड चांगली असेल अशी अपेक्षा होती. याशिवाय 'धुके न्हाऊनी गेले' हे नाटक लिहिणाऱ्या अकोलकरांविषयी काही अपेक्षा होत्या. परंतु प्रत्यक्षात समोर आले ते एक अत्यंत सैल रचनेचे नाटक : धड ना विनोदी, धड ना गंभीर. बरे, संयत विनोदाने एखाद्या अर्थपूर्ण अनुभवाला छेद द्यावा असेही येथे घडत नव्हते एका वृत्तपत्रीय छायाचित्रकाराला क्रिकेटच्या एका सामन्याच्यावेळी लहानसा अपघात होतो; बेकार वकील असलेला त्याचा मेव्हणा या अपघाताचा फायदा घेऊन प्रचंड नुकसानभरपाईची मागणी करतो; ही मागणी न्याय्य वाटावी म्हणून गुरांच्या डॉक्टरकरवी त्याला तात्पुरते लुळे करतो; त्याचे लुळेपण खरे आहे का हे पारखण्यासाठी क्रिकेट असोसिएशनकरवी गुप्तपोलिस ठेवले जातात इत्यादी बराच गोंधळ कृत्रिमरीत्या घडवून आणला जातो. शिवाय या छायाचित्रकाराची फॅशनमॉडेल असणारी प्रेयसी [ नाटकापुरते का होईना जिचे 'फॅशनमॉडेल' हे वर्णन स्वीकारणे अत्यंत अवघड जावे अशा एका नटीने ही भूमिका सादर केली होती. ] आणि हॉस्पिटलमधील सुस्वभावी नर्स यांच्यातील संघर्ष आहे. शेवटी नुकसानभरपाईच्या रकमेवर नजर ठेवणारी श्रीमंत प्रेयसी दूर जाते आणि सर्वसाधारण रूपाच्या गरीब प्रेयसीचा विजय होतो. [ मराठी प्रेक्षक खुश ! ] या सगळ्या लपंडावांचा, कारस्थानांचा कंटाळा येऊन तो छायाचित्रकार सत्य सांगायचे ठरवितो त्याचवेळी त्याला खरे अपंगत्व येते. या नाटकाचा प्रयोग करावा असे कुणालाही का वाटावे ? नाटचसंहितेचा फारसा विचार न करता नाटक निवडायचे आणि मग पांढऱ्या चौकटींच्या साहाय्याने उभारलेल्या चौकटी, दिवसाची वेळ सुचविण्यासाठी आकाशवाणीचे कार्यक्रम, इत्यादी क्षुल्लक लकबींच्या आधारे प्रयोग सजविण्याचा प्रयत्न करायचा, हा खटाटोप कशासाठी ? यंदाच्या स्पर्धेतील अनेक नाटके पाहात असताना आठवण झाली की स्पर्धेच्या प्रारंभकालात के. नारायण काळे यांनी अशी सूचना केली होती की स्पर्धेत एखादे विशिष्ट नाटक आपण का निवडले याविषयी दिग्दर्शकाने एक लेखी निवेदन करावे; या निवेदनाचा व परीक्षकांच्या निर्णयाचा काही अन्योन्य संबंध असू नये. मला वाटते पुन्हा एकदा या सूचनेचा आपण विचार केला पाहिजे. आपण विशिष्ट नाटचसंहिता का निवडली, ती विशिष्ट नाटचशैलीतच का सादर करीत आहोत,

प्रकाश योजनेचे व संगीताचे प्रयोजन कोणते, या सर्व गोष्टींविषयी दिग्दर्शकाला काही सांगता आले पाहिजे. ते त्याच्याच हिताचे ठरेल. नाहीतर 'चालविशी हाती 'सारखे मुळात दिशाहीन नाटक स्वीकारून त्यावर श्रम करायचे याला काही अर्थ नाही. स्पर्धा हौशी नाट्यसंस्थांसाठी असली तरी त्या हौसेला काही वळण असावे. 'नाट्यप्रपंच' या संस्थेने आतापर्यंत बहुधा गभीर नाटकें सादर केली होती. ठाणे केंद्रात व इतरत्र राम मुंगींच्या विनोदी नाटकांना गेली दोन वर्षे जे यश मिळाले त्यामुळे जर 'नाट्यप्रपच' विनोदी नाटकाकडे वळली तर ही प्रथा अनिष्ट मानावयास हवी.

---

## अर्घ्याच्या शोधात दोन

### गुरुदत्त मित्रमंडळ

---

ठाणे केंद्रातून पहिले आलेले 'अर्घ्याच्या शोधात दोन' हे गुरुदत्त मित्रमंडळाचे (डोंबिवली) नवे नाटक श्याम फडके यांनी लिहिलेले आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फे होणाऱ्या कै चिंतामणराव कोल्हटकर स्पर्धेत पहिल्या पारितोषिकाचा व वांद्रयाच्या 'अभिनय'त होणाऱ्या कै. पार्श्वनाथ आळतेकर नाट्यस्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिकाचा मान या नाट्यप्रयोगास मिळाला आहे. तर यंदाच्या सरकारी अतिम नाट्यस्पर्धेत उत्तेजनार्थ पुरस्काराचा मान मिळाला आहे. श्याम फडके यांनी 'अर्घ्याच्या शोधात दोन' या नाटकाच्या प्रयोगाचे हक्क इतरत्रही काही दिग्दर्शकांना दिले होते. वेग वेगळ्या दिग्दर्शकांनी या नाट्यसंहितेचे संकल्पन कसे केले हे पाहाणे मनोरंजक ठरले असते. परंतु इतर ठिकाणचे नाट्यप्रयोग प्रथम फेरीतच बाद झाल्यामुळे ते काही शक्य झाले नाही. श्याम फडके यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा विचार करता असे वाटते की अत्यंत गंभीर समस्या तीव्रतेने ज्याला जाणवतात आणि विसंगताचाही ज्याला चटका बसतो असा हा नाटककार आहे. परंतु नाट्यरचनेवर त्यांची अजूनतरी पकड नाही. सुचलेल्या एखाद्या कल्पनेचा धागा सैलपणे ते सोडून देतात. एखादा विनोदी प्रसंग पेचदारपणे उभा करावा हे त्यांना जमत नाही. 'काका किशाचा' हे त्यांचे लोकप्रिय झालेले नाटकही मूळ लेखनात अतिशय कच्चे व कंटाळवाणे आहे. 'अर्घ्याच्या शोधात दोन' या नाटकाचे शीर्षक चित्तवेधक असले तरी ही नाट्यरचना मात्र चित्तवेधक नाही. या नाटकाचे कथासूत्र तसे सनातन आहे. पतिपत्नी नात्यात 'सखी'त्व हरवण्याचा अनुभव, ते सखीत्व दुसऱ्या स्त्रीत शोधण्याचा यत्न, या नाटकाच्या

मुळाशी आहे. कवा असणारा, हौशी क्रिकेट खेळाडू असणारा रमेश कुळकर्णी हा एक सामान्य सरकारी कारकून आहे; पण आपल्या पत्नीने आपल्यातला कवी, खेळाडू ओळखावा, त्याला साथ द्यावी, असे त्याला वाटते. त्याची पत्नी शिक्षिका आहे; तिच्या नजरेला रमेशचे 'मराठी कच्चे' इतकेच दिसते; म्हणून तिला माहेरी पाठवन रमेश सुरेखाला—त्याच्या मैत्रीणीला—घरी बोलावतो; इतक्यात बायको परत येते आणि नाटकातील संघर्षाला प्रारंभ होतो. या कथानकाच्या जोडीला सुरेखा आणि तिचा प्रेम भक्त कवी करंवदे यांचे व घरमालक-भाडेकरू यांचे उपकथानक आहे. सुरेखाला कवीने आणलेला हार ती रमेशकडे विसरते—तो हार रमेशची पत्नी पाहते, तेव्हा तो तिच्यासाठी आणलेला आहे असे सांगणे हाच एक मार्ग रमेशपुढे असतो. नंतर सुरेखाला दुसरा हार घेऊन देण्यासाठी रमेश घरमालक-भाडेकरू संघर्षाचा उपयोग करतो आणि अधिकच गोंधळात



'अर्थाच्या शोधात दोन'
शीर्षक चित्तवेधक पण...

अडकतो. तसे पाहिले तर मराठीतील बहुसंख्य नाटके याच कथावस्तूच्या आसपास घोटाळत असतात. पण प्रस्तुत नाटकात काव्यात्मक सुखात्मिकेची बीजे होती. अर्थात् श्याम फडके यांना सहसा आपल्या नाटकाला नेमका कोन देता येत नाही त्याप्रमाणे याही नाट्यरचनेचे झाले आहे. परिणामी एक अत्यंत अतार्किक असे नाटक दिग्दर्शक राम मुंगी यांनी स्पर्धेसाठी करायचे ठरविले.

या अत्यंत दोषास्पद अशा नाटकाचा प्रयोग मात्र मुंगींनी चित्तवेधक केला. मुंगींकडे नाटकाचे दृश्यसंकल्पन करण्याची दृष्टी आहे. त्यानुसार या तर्कहीन संहितेला अर्थ देण्याचा त्यांनी खूप यत्न केला आहे. नाटकाच्या कथानकातील अनेक त्रिकोण दर्शविण्यासाठी योजलेला लाकडी त्रिकोण, सेट उभा करताना पुढची खोली, मागची खोली आणि मागे जाण्याचा मार्ग सूचित करण्यासाठी वापरलेले त्रिकोण, पात्रांच्या हालचालींचे केलेले संयोजन देखणे होते. परंतु त्यांनी कल्पिलेले नेपथ्य मात्र(functional) नाट्योपयोगी होते हे मला पटले नाही. परंतु या विषयी मतभेदाला जागा आहे.

राम मुंगी यांनी स्वत: रमेश कुलकर्णींची व सौ. करंबेळकर यांनी त्यांच्या पत्नीची भूमिका अत्यंत कार्यक्षमतेने सादर केली. मुंगींच्या आवाजाला एक नैसर्गिक खर आहे ही मर्यादा वजा करता आंगिक अभिनयाचा यथायोग्य वापर करून त्यांनी भूमिका उभ केली. सौ. करंबेळकरांची भूमिका साचेबंद, खाष्ट भूमिका होण्याचा धोका त्यांनी नाटकातील आपल्या स्थानाविषयीच्या समजुतीने टाळला (अर्थात त्यांच्या नैसर्गिक देहयष्टीचा, अपऱ्या नाकाचा, चष्म्याचा त्यांना या भूमिकेत फारच फायदा झाला.) वैयक्तिक अभिनयाच्या पारितोषिकासाठी झालेली त्यांची निवड रास्तच होती. कवी करवंदेची भूमिका प्रेक्षकांची खूप दाद घेऊन गेली—पण त्या स्वरूपाच्या नकला मराठी रंगमंचावर इतक्या झाल्या आहेत की त्याचे अप्रूप वाटत नाही. अलकनंदा रणदिवेने उभी केलेली सुरेखा मात्र असमाधानकारक वाटली. एक तर तिचे मराठी उच्चार कृत्रिम होते; आणि दुसरे, लेखकाच्या पुढे असणारे सुरेखाचे व्यतिचित्र तिने समजून घेतले होते असेही अभिनयातून जाणवले नाही. जाता जाता एकच शंका—

---


फिडेल
चे
आणि
क्रांती
अरूण साधू
मूल्य : सात रुपये


---

'Death of a Salesman' चे शं. ना. नवरेकृत रूपांतर मुंगींच्याकडे आहे अशी बातमी आम्ही ऐकून आहोत. इतके मातब्बर नाटक हातात असताना श्याम फडणीसांचो नाटके करण्याचा अट्टहास का? ०

## एकाकी
## आर्टिस्टस् कंबाइन

राज्य नाट्यस्पर्धेच्या अंतिम फेरी-तील दोन नव्या विनोदी नाटकांनंतर ग्वाल्हेरच्या 'आर्टिस्टस् कंबाईन'चे 'एकाकी' हे नवे गंभीर प्रकृतीचे नाटक पाहिले. 'आर्टिस्टस् कंबाईन' या संस्थेने राज्य नाट्यस्पर्धेत स्वतःचे एक विशिष्ट स्थान गेली अनेक वर्षे प्रस्थापित केलं आहे. यंदा त्यांनी प्रा राम जोगळेकरांचे नाटक अत्यंत परिश्रम पूर्वक सादर केले. पण मूळ नाटक इतके भडक, भावविवश आणि अतार्किक की हे गंभीर प्रयत्नही हास्यापद ठरावेत. अत्रे-रांगणेकरांच्या काळातल्या नाटकातील खलनायकांसारखे या नाटकात एक ना दोन चक्क तीन खलनायक होते! आणि कथावस्तु काय तर एका स्त्रीच्या एकाकीपणाची व्यथा! कथावस्तू, त्यातील घटना यांचा काही विचारच लेखकाने केला नव्हता एक जर्मन तत्त्वज्ञ–चित्रकार, एक जंगलखात्याचा अधिकारी–त्याचा व्यसनी जावई, एक कवयित्री आपल्या हीन तत्त्वाचा शाप असणारी, तिचा 'माजी' प्रियकर, रस्त्यातून हिंडणारा गोड गळ्याचा भिकारी, नायिकेच्या प्रोत्साहनाने तो मोठा गायक होणे, त्याची अनाथ मुलगी नायिकेकडे वाढणे आणि मग पुढे ज्याला ना काही दिशा असे हे नाटक



ग्वाल्हेरच्या मंडळींचे 'एकाकी'
गंभीर प्रयत्नही हास्यास्पद ठरावेत इतके मूळ नाटक भडक, भावविवश...

भैय्या भागवतांसारख्या दिग्दर्शकाने निवडले. नेपथ्य सजावट, संगीत, प्रकाशयोजना यांच्या साहाय्याने उभे केले. अठरा वर्षांच्या स्पर्धेच्या प्रवाहात आणि प्रायोगिक रंगमंचावर होणाऱ्या धडपडीतून आमचे दिग्दर्शक शिकले इतकेच की नेपथ्यादी बाह्य युक्त्यांचा वापर करून पोकळ डोलारे उभे करता येतात. यंदाचे नेपथ्याचे पारितोषिक या नाटकाचे नेपथ्यकार बाळकृष्ण कर्डेकर यांना मिळालेले आहे. जे डोळ्यांना सुख देते ते चांगले नेपथ्य, अशी तर आमच्या परीक्षकांची समजूत नाही? 'एकाकी'त नेपथ्य व सजावट यांचा परस्पर तोलही साधला गेला नव्हता; सामानाच्या गर्दीमुळे अनेकदा अभिनय-क्षेत्र मर्यादित झाले होते, याचा विचार करायला नको होता काय? या नाटकातील 'पद्मनाभ'ची भूमिका करणारे वसंत परांजपे यांचा आवाज ऐकणे, एवढेच 'एकाकी'च्या तापदायक अनुभवात एक सुख होते. या नटाचा आवाज इतका संपन्न आहे, त्यातील खर्ज इतका अर्थपूर्ण आहे आणि या छोट्याशा भूमिकेत दिसलेली अभिनयाची संयत पातळी इतकी आशादायक आहे, की नाट्यसंहितेची निवड या अनुरोधाने व्हायला हरकत नव्हती. असो.

राज्य नाट्यस्पर्धेच्या निमित्ताने दरवर्षी नवी नाटके लिहिली जातात. या स्पर्धांमुळे अनेक नवे नाटककार निर्माण झाले हे जसे खरे आहे तसेच नव्याच नाटकाचा प्रयोग करण्याच्या अट्टाहासापायी कमकुवत नाट्यसंहितेवर एखाद्या संस्थेने आपला वेळ, जीवशक्ती आणि साधनसामुग्री वाया दवडावी असेही अनेकदा होत असते. खरे म्हणजे चांगले नवे नाटक मिळत नसल्यास जुन्या समर्थ नाटकाचा प्रयोग करण्यास काही हरकत नाही. हे जुने नाटक निवडत असताना मात्र व्यावसायिक रंगभूमीवर लोकप्रिय झालेले नाटक निवडण्याकडे असणारा स्वाभाविक कल सावरावा लागेल विशिष्ट संस्थेला उपलब्ध असणाऱ्या पात्रांचा, सामुग्रीचा विचार करून नाटक निवडावे हे तर उघडच आहे. परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे धोरण असे की, हौशी नाट्यनिर्मितीचे स्वरूप ध्यानात घेऊन जुने नाटक निवडले जावे. यंदा मुंबईतील 'रंग-भवन' केंद्रातून अंतिम फेरीतून निवडली गेलेली तिन्ही नाटके जुनी होती : पहिले वसंत कानेटकरांचे 'रायगडाला जेव्हा जाग येते' [बेस्ट कला व क्रीडा मंडळ, मुंबई] आणि दुसरे श्री. ना. पेंडश्यांचे 'आमचं हे असंच' [शास्त्री हॉल कलोपासक मंडळ, मुंबई.]

राज्य नाट्यस्पर्धेत 'बेस्ट कला व क्रीडा मंडळा'ने मुंबईकर रसिकांच्या मनात गेली काही वर्षे निश्चित अपेक्षा निर्माण केलेल्या आहेत. त्यांच्या नाट्य-प्रयोगात नेपथ्याची ठाकठिकी आणि सांघिक कार्यक्षमता नेहमीच असते. 'संभूसांच्या चाळी'मुळे या संस्थेला विशेष नाव मिळालेले असले तरी 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाचा प्रयोग करण्याचे या संस्थेने योजले आहे हे ऐकल्यानंतर मला

आश्चर्य वाटले होते. कारण आतापर्यंत पाहिलेल्या त्यांच्या प्रयोगात इतके अवघड, व्यक्तिचित्रणात्मक अभिनयाचे नाटक पेलू शकेल असा एकही नट दिसला नव्हता. त्यांच्या संस्थेतील नट हे नकलांच्या पद्धतीचा, विडंबनात्मक अभिनय करणारे होते. परंतु त्यांनी आपला नटसंच आणि नाटकाचा प्रकार दोन्ही एकाच वर्षी बदललेला आहे हे ऐकून या दोन्ही बदलांचे परस्पर नाते असावे असेही वाटू लागले. व्यावसायिक रंगभूमीवर लोकप्रिय असणाऱ्या एका नाटकाचा प्रयोग करण्याच्या त्यांच्या धैर्याचेही कौतुक वाटले. ●

## रायगडाला जेव्हा जाग येते
## बेस्ट कला व क्रीडा मंडळ

'बेस्ट कला व क्रीडा मंडळा'ने सादर केलेल्या 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाट्यप्रयोगाचे दिग्दर्शक जयवंत विचारे यांनी व्यावसायिक प्रयोगाचे पक्के अनुकरण तेवढे करायचे ही कल्पना मात्र मनाशी बाळगली नव्हती हे प्रथमतःच सांगून त्याबद्दल विचारे यांचे अभिनंदन केले पाहिजे. नेपथ्य व प्रकाशयोजना यांचे संयोजनही रमेश रणदिवे आणि एलीस रामराजकर यांनी मूळ प्रयोगापेक्षा वेगळे केले होते. रंगमंचाच्या मागे कडा दाखवण्याची व विशिष्ट प्रसंगी तो प्रकाशित करण्याची, शिवाजीच्या मृत्यूचा क्षण पडद्यावरील सरकणाऱ्या ढगांच्या आधारे दर्शविण्याची, इत्यादी कल्पना परिणामकारक वाटल्या.

नारायण घोसाळकर ('अमृत नाट्य-भारती'चे जुने विद्यार्थी) यांनी मोठ्या परिश्रमाने शिवाजीची भूमिका सादर केली. या नाटकातील शिवाजीची भूमिका अवघड आहे कारण तिच्यात परंपरागत प्रतिमेवर एक दुसरी प्रतिमा आरोपित केलेली आहे. या दोन्ही अर्थांचे (स्वराज्यसंस्थापक शिवाजी–पिता शिवाजी) आविष्करण करणे अत्यंत अवघड आहे. घोसाळकरांनी जबाबदारीने भूमिका सादर केली असली तरी प्रत्येक वाक्याचा शेवट ओढण्याची त्यांची लकब अनैसर्गिक असल्यामुळे कर्णकटु वाटत होती. संभाजीची भूमिका करणाऱ्या गजानन खामकरांनी काशीनाथ घाणेकरांचे (व्यावसायिक प्रयोगातील 'संभाजी') अनुकरण केले नाही हे नकारात्मक विधान आवर्जून करावेसे वाटते. कारण हौशी रंगभूमीवरील तरुण नटांमध्ये काशीनाथ घाणेकरांच्या लकबींची नक्कल करण्याकडे कल दिसत असताना, त्यांनी लोकप्रिय केली एक भूमिका एका नव्या नटाने स्वतंत्रपणे सादर करावी हे कौतुकास्पद आहे. दिग्दर्शकाने या

नाटकातील सर्वच पात्रांचा अभिनय संयत पातळीवर राखण्याचा यत्न केला आहे. सोयराबाई (नीला दिघे), हंबीरराव (पुरुषोत्तम देसाई), अण्णाजी (रमाकांत केदार) यांनी आपल्या भूमिका समजून केल्या–परंतु रंगमंचावर असताना प्रत्येक क्षण आपण नाटकात असले पाहिजे याचा या पात्रांना विसर पडत होता. येसूबाई (शोभा वैद्य) यांनी आपली लहानशी भूमिका अत्यंत शाळकरीपणे सादर केली. मुळात कोवळा आवाज (येसूबाईचे वय लक्षात घेताही) आणि वाक्यार्थाकडे लक्ष न पुरवता वाक्यांना दिलेला झोका, यामुळे त्यांचे काही महत्त्वाचे संवाद वाया गेले. या नाटकातील राजाराम हे पात्र लेखनामध्येच कृत्रिम आहे; त्याच्या तोंडचे संवाद भावविवश आहेत; यामुळे समीर कर्णिक या लहान मुलाने ती भूमिका सहजपणे सादर करूनही ती कृत्रिम वाटत होती.

दिग्दर्शकाने पात्रांच्या हालचालींचे संयोजन करीत असताना, सिंहासन–त्यामागे दूरवर दिसणारा एकाकी कडा–अंतरकक्ष आणि लेखनसाहित्य ठेवलेल्या कोपऱ्यातून सूचित होणारी कचेरी, या वेगवेगळ्या विभागांचा विचारपूर्वक उपयोग केला होता. परंतु एक-दोन प्रवेशात काही दुय्यम पात्रे शिवाजीपेक्षा उच्चपातळीवर उभी राहून (मागील पायऱ्यांवर) संभाषण करीत होती हे ऐतिहासिक आभासाच्या दृष्टिकोनातून काहीसे खटकले. ऐतिहासिक वेशभूषा मात्र सर्व पात्रांनी डौलाने पेलल्या होत्या.

'रायगडला जेव्हा जाग येते' या नाट्यप्रयोगाने यंदाच्या सरकारी स्पर्धेत दुर्मिळ झालेला सफाईदार प्रयोगाचा अनुभव दिला. त्यात दिग्दर्शक, नटवर्ग, तंत्रज्ञ यांचे परिश्रम जसे जाणवत होते तसेच समृद्ध नाट्यसंहिता दुय्यम नटवर्गालाही किती आधार देऊ शकते याचाही प्रत्यय येत होता. ●

## आमचं हे असंच
## शास्त्री हॉल कलोपासक मंडळ

'शास्त्री हॉल कलोपासक मंडळ, मुंबई' या संस्थेने 'आमचं हे असंच' हे श्री. ना. पेंडश्यांचे नाटक सादर केले. 'ल्व्हाळी' या कादंबरीचे हे नाट्यरूप 'असं झालं आणि उजाडलं' या नावाने काही वर्षांपूर्वी 'रंगधारा'ने सादर केले होते. श्री. दामू केंकऱ्यांनी दिग्दर्शित केलेले हे नाटक व्यवसाय म्हणून यशस्वी ठरले नव्हते तरी शांताराम पवारांनी उभे केलेले नेपथ्य, नाटककार दिग्दर्शकांनी युद्धकाळाची केलेली पुनर्निर्मिती, ललिता केंकऱ्यांची मंगी, सरस्वती बोडसांची आई, अशा अनेक गोष्टींसाठी हा नाट्यप्रयोग लक्षात राहिला होता.

समाजपुरुषाचे दर्शन घडविणारी, युद्धाच्या पार्श्वभूमीवर सामान्यांचे दर्शन घडविणारी 'लव्हाळी' ही मराठीतील एक लक्षणीय कादंबरी आहे. या कादंबरीतील कालघटक कोणाही पात्रापेक्षा महत्त्वाचा आहे. असे असता स्वत: नाटककारानेच 'आमचं हे असंच' या नाटकात स्वत:च्या कल्पनेवर अन्याय करावा हे आश्चर्यकारक आहे. संहितेची सविस्तर चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे. परंतु नव्या संहितेला एका उथळ सुखान्तिकेचे स्वरूप आलेले आहे. काळाचा आधार काढून घेतल्यामुळे पात्रांच्या व्यक्तिरेखा अगदी कमकुवत झाल्या आहेत.


प्रस्तुत नाटचप्रयोगात कमलाकर नेने यांनी सर्वोत्तमची आणि संध्या गुर्जर यांनी मंगीची भूमिका सहजतेने सादर केली. नेने यांची एक हात उडविण्याची लकब कृत्रिम–रंगमंचावर वावरताना हाताचे काय करावे या अडचणीतून निर्माण झाल्यासारखी वाटत होती. 'आई'ची भूमिका करणाऱ्या शरयू भोपटकर नाटचस्पर्धेच्या वा 'रंगायन'च्या प्रेक्षकांना परिचित आहेत. त्यांनी सांकेतिक भूमिकेला व्यक्तिमत्त्व देण्याचे आपले कौशल्य याही नाटच-प्रयोगात व्यक्त केले.

या नाटकाचे नेपथ्य अशोक साठे व मृगांक जोशी यांनी केले होते. चाळीत राहणाऱ्या माणसांना फारसे 'खाजगी' काही उरत नाही ही कल्पना पांढऱ्या चौकटयांच्या नेपथ्यांतून चांगली सूचित झाली होती. परंतु त्यामुळे चाळकऱ्यांचे कुचंबलेले जीवन जरा जास्तच मुक्त झाल्यासारखे वाटले. 'आमचं हे असंच' हा नाटचप्रयोग पाहताना रंगमंचावर फारसे काही चुकत नसतानाही अस्वस्थतेचा प्रत्यय आला : विचार करता, नाटचप्रयोगातील हा पोकळपणा, दिग्दर्शक वा पात्रे कुणीही नाटचकृतीचा एकसंध विचार न करता वेगवेगळचा क्षणापुरता विचार करत असल्यामुळे निर्माण झाला असावा असे वाटले. अर्थात् याच्या मुळाशी स्वत: नाटककाराने संहितेत केलेला बदल होता हे खरेच !

●

## पगला घोडा
## ललित कला क्रीडा मंडळ

नासिक रोडचे 'ललित कला आणि क्रीडा मंडळ' अनेकदा प्रायोगिक रंगमंचावरील नाटके निवडते. त्याप्रमाणे यंदा त्यांनी 'पगला घोडा' हे नाटक निवडले होते. या नाटकाचा प्रयोग करणे अवघड आहे. स्पर्धेत असे एखादे, कसलेल्या नटांनी आधी केलेले नाटक करण्यामध्ये तुलनेचा धोका



पगला घोडा

नाशिककरांचे अपयशही महत्त्वाचे

असतो. तोही या मंडळाने पत्करला याबद्दल त्याचे अभिनंदनच केले पाहिजे. या नाटकातील नायिकेला चार अस्तित्त्वे आहेत — मुलगी, मालती, लक्ष्मी, मिली. सौ. शैलजा शित्रे यांचा चेहरा, डोळे या भूमिकेला साजेसे नव्हते. परंतु ही उणीव आपल्या आवाजाने आणि भूमिकांच्या समजुतीने भरून काढण्याचा आटोकाट यत्न त्यांनी केला. गंगाधर क्षेमकल्याणी (कार्तिकबाबू) आणि श्री. सुधीर खाडिलकर (शशीबाबू) यांनी त्यांना चांगली साथ दिली. नाटकाच्या दिग्दर्शिका विजया कोप्पीकर या नाटकातील निःशब्द स्तब्धता अर्थपूर्ण करू शकल्या नाहीत हे खरे असले तरी या नाटचसंस्थेचे अपयशही महत्त्वाचे आहे. कारण काही निश्चित दृष्टिकोन बाळगून त्यांनी एक आकांक्षी नाटचसंहिता निवडली आणि ती कष्टपूर्वक सादर केली. ●

## दंश
## अभिवादन

याउलट 'अभिवादन' या नाशिकच्याच नाटचसंस्थेने इब्सेनच्या 'Ghosts' या नाटकाचे 'दंश' नावाचे विडंबन सादर केले. कार्यक्रमपत्रिकेत

'दंश' हे नाव पाहिले, वर्तमानपत्रात भिकू पै आंगले यांनी इब्सेनचे नाटक रूपांतरित केले आहे असे वाचले तेव्हा एकूण नाशिकची निवड चांगली वाटली. परंतु नाट्यप्रयोगाला प्रारंभ होताच भ्रमनिरास झाला. वडील-मुलगा यांच्यातील वंशाचे रक्ताचे नाते ही मूळ नाटकाची कथावस्तु. भूतकाळाचे सारे बंध तोडून आपल्या मुलाला नवा भविष्यकाळ देऊ पहाणाऱ्या आईचा, पूर्वजांच्या पापाची भुतावळ पराभव करते हे मूळ नाटकाचे कथासूत्र! (या नाटकाचे प्रामाणिक हिंदी रूपांतर सत्यदेव दुबे – सुलभा देशपांडे यांनी मागे मुंबईत सादर केले होते) परंतु आमच्या विद्वान मराठी भाषांतरकाराने या नाटकातील आईला 'मला उत्तर हवंय' पद्धतीचा भूतकाळ देऊन, तिच्यातील रोगाचे बीज मुलाच्या ठिकाणी निर्माण झालेले दाखवून एक अतिरंजित भडक, हास्यास्पद नाटक सादर केले. मूळ कथानकाच्या जोडीला एक प्रेम-कथा, खलनायक, सर्व काही नवा 'मसाला' टाकला आणि सजावटीची आतषबाजी करणारी निर्मिती सादर केली. वाईट वाटले एका गोष्टीचे: विसू कामेरकरांसारख्या प्रायोगिक रंगमंचाशी परिचय असणाऱ्या माणसाने या प्रकारात सामील व्हावे याचे! विसू कामेरकरांसारखी गुणी माणसे मुंबईबाहेर जातात तेव्हा त्यांनी आपल्या निष्ठा जपायला हव्यात. असे गर्दीच्या हौसेचे बळी होऊ नये. (याच विसू कामेरकरांनी गतवर्षी 'पाचोळा जळत नाहीए' या नाटकाची प्रकाशयोजना किती संवेदनाक्षमतेने केली होती!) ●

## जेव्हा देवाचा खून होतो
## सुरुची निकेतन

असो. नाटकाचा पडदा उघडण्यापूर्वीच्या अपेक्षा आणि प्रत्यक्ष नाटक यात अनेकदा असे अफाट अंतर पडते. तरीही आपण पुन्हा पुन्हा अपेक्षा बाळगतोच किंबहुना नव्या नाटकाला जाणे हा प्रत्येकवेळी एक विलक्षण अनुभव असतो. नागपूरच्या 'सुरूचि निकेतन'-तर्फे 'जेव्हा देवाचा खून होतो...' या नाटकाचे पत्रक हाती आले त्याच्या एका बाजूला 'नाटक बघण्यापूर्वी' असा मजकूर छापला होता. "'जेव्हा देवाचा खून होतो' हे नाटक म्हणजे 'प्रेम' व 'त्याची चोहोबाजूंनी गळचेपी करण्याचे षड्यंत्र' यांची कथा. एक सौंदर्यशाली सुविद्य तरुणी एका प्रेताला प्रेमसंजीवनी देऊन त्याला परत जीवनामृत प्रदान करण्याची दुर्दम्य इच्छा बाळगते, हे कथाबीज..." हे निवेदन वाचताना नकळत काही अपेक्षा निर्माण झाल्या आणि त्याचबरोबर काही शंका:

मोहित चट्टोपाध्याय यांच्या मूळ बंगाली नाटकाचा अनुवाद पुरुषोत्तम दारव्हेकर या सुप्रसिद्ध मराठी नाटककाराने केला होता. नेमक्या याच तपशीलामुळे माझ्या मनात शंका निर्माण झाल्या होत्या. कारण दारव्हेकरांना मूळ नाटकातील कथावस्तूच्या पोताचा विचार न करता अनुवाद करण्याची सवय आहे. (उदा. 'नयन तुझे जादूगार') काव्यात्मक कथावस्तूला दारव्हेकरांची उपकथा-



'अभिवादन'चे 'दंश'
अतिरंजित, भडक

नकांची, विनोदाची पद्धती फारशी पोषक नाही. नेमके असेच या नाटकाची मूळ संहिता आणि मराठी संहिता यांच्या संदर्भात घडले असावे. कारण वर उल्लेखिलेले निवेदन आणि प्रत्यक्ष प्रयोगात उभा केलेला व्यंगचित्रासारखा इन्स्पेक्टर, राधा गोविंद यांचे नेमके नाते काय होते ? असे असताही इन्स्पेक्टरची भूमिका करणाऱ्या जयंत पाचपोर यांना वैयक्तिक पारितोषिक मिळावे हा एक परीक्षकी चमत्कार ! देवाशिष रॉय, अजय बॅनर्जी या दिग्दर्शकांनी, मोहन फाटे या नेपथ्यकाराने व आलोक मुकर्जी या प्रकाशयोजकाने हा प्रयोग कल्पकतेने सादर केला. परंतु त्यातील विनोदाने झालेला रसभंग कोणीही सावरू शकले नाही. कला कार्णे (शांता लाहिरी) आणि विनायक पाटील (प्रेतात्मा—मोहन) यांनी नाटयवस्तूचे भान अभिनयात व्यक्त केले. असे ऐकते की अशोक साठे या नाटकाचा मुंबईत प्रयोग करणार आहेत. वेगळ्या पद्धतीने या नाटकाचा प्रयोग करणे निश्चित शक्य आहे. एका वेगळ्या पद्धतीचा अनुभव व्यक्त करणारे नाटक सादर करण्याचा यत्न म्हणून हा प्रयत्न उल्लेखनीय होता.

●

## फास
## रसबहार

लातूरच्या ‘ रसबहार ’ने निवडलेला ‘ फास ’ या अनंत काणेकरांच्या नाटकाचा सहसा मराठी रंगमंचावर प्रयोग होत नाही. (काही वर्षांपूर्वी आशा भेंडे, राम टिपणीस यांनी या नाटकाचा मुंबईत प्रयोग केला होता.) केवळ दोन पात्रांचे असणारे हे नाटक सादर करणे अवघड होते. एकतर त्यातील संवादात पुनरुक्ती, कंटाळवाणेपणा बराच आहे, आणि दुसरे म्हणजे कथावस्तूतील साम्यवादी चळवळीचा संदर्भ काहीसा जुना झालेला आहे. परंतु रवींद्र गोवंडे या दिग्दर्शकाने पती-पत्नी नाते, साम्यवादी चळवळीचा संदर्भ आणि स्वतःच्याच मनस्तापात चार भिंतीत एकत्र कोंडलेली दोन माणसे, हे वेगवेगळे अर्थ परिणामकारकतेने व्यक्त केले. विशेषतः राजेन्द्र गोजमगुंडे आणि त्यांचे सहकारी यांनी निर्माण केलेले नेपथ्य व सजावट नाटयाला उपकारक ठरली. दोनच पात्रांच्या नाटकात नटांवर विलक्षण जबाबदारी असते. अमृतची भूमिका करणाऱ्या श्रीराम गोजमगुंडे यांनी ही जबाबदारी जाणीवपूर्वक पेलली. परंतु त्यांचे कुरळे केस, रमेश देवसारखे दिसणे, त्यांचा पोशाख, हे मात्र साम्यवादी पुढाऱ्यासारखे नसून मराठी चित्रपटाच्या नायकासारखे होते. मीराची



मीरा । अमृत । अनंत काणेकरांच्या 'फास'मध्ये

भूमिका करणाऱ्या लता पत्कींना रंग-मंचाला अनुकूल अशी शरीरयष्टी आहे; परंतु मीराची अवघड भूमिका त्या पेलू शकल्या नाहीत. विशेषत: त्यांचे शब्दोच्चार आणि नेत्राभिनय दोषास्पद होते. एरवी सफाईदार असणाऱ्या या प्रयोगात गोजमगुंडचांनी हाताने मोरी हलवणे व पत्कींनी वेगवेगळ्या कमानींना दार मानणे, अशा ढोबळ चुका झाल्या. दिग्दर्शक, नट, नेपथ्यकार सर्वजण एकाच तर्कातून एखाद्या नाटयकृतीकडे पहात असले, की एखाद्या सामान्य नाटय-संहितेतून किती नेटका प्रयोग उभा होऊ शकतो याचा सुखद प्रत्यय 'फास'ने दिला.

●

अंतिम फेरी संपत आली होती आणि तरी ज्या नाटयप्रयोगाची स्मृती प्रेक्षकांनी पुढे अनेक वर्षे बाळगावी असा एकही प्रयोग झाला नव्हता. शेवटी साऱ्या अपेक्षा दादर केंद्र व पुणे केंद्र

म्हणजेच : ‘मेन विदाऊट शॅडोज,’ ‘प्रेम-कहाणी’ ‘घाशीराम कोतवाल’ ‘हयवदन’ या चार नाटयप्रयोगांवर केंद्रीभूत झाल्या होत्या. ●

## मेन विदाउट शॅडोज्


## गॉसिप ग्रूप

विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा-संघाने गतवर्षी (वा दोन वर्षापूर्वी) ‘गॉसिप ग्रुप’ नावाचा प्रायोगिक नट-संच एकत्र आणला. विजय बोंद्रे यांनी या संचासाठी ज्यां पॉल सार्त्रचे ‘मेन विदाऊट शॅडोज्’ हे नाटक भाषांतरून सादर केले होते. काही कारणामुळे त्यावेळी त्यांचा हा प्रयोग मी पाहू शकले नव्हते. तरी जाणकारांकडून त्या प्रयोगाची स्तुती ऐकली होती. या नाटकाची निवड करणाऱ्या दिग्दर्शकाचे कौतुक मनात होते. स्पर्धेला असे आकांक्षी नाटक सादर करण्याचे धैर्य अलीकडे कमी होत चालल्याने या कौतुकाला काही अर्थ होता. सार्त्रच्या कोणत्याही नाटयकृतींप्रमाणे प्रस्तुत नाटकातील घटनांना, विशेषत: शरीर क्लेशांना एक वेगळा अर्थ आहे. देशभक्ती, नेतृत्व अशा मृगजळापाठीमागे धावून त्या आभासात ‘स्व’त्व शोधणे आणि सरळ प्रत्यक्ष ‘स्वत:’ला सामोरे जाणे या दोन प्रक्रिया आणि क्लेश दिल्या-जाणाऱ्या शरीरापासून अलिप्त होणे— न होणे या प्रक्रियेला प्रस्तुत नाटकात मूळ सूत्राचे स्वरूप आहे. युद्धकथांमधील नैतिक विजयाच्या कल्पना आणि सार्त्र सारखा तत्त्वज्ञ नाटककार ज्यावेळी युद्धकथेचे आवरण पत्करतो त्यावेळी त्याच्या नाटकातील नैतिक विजय—अस्तित्व याविषयीच्या कल्पना, यामध्ये मूलभूत अंतर आहे. परंतु शब्दश: भाषांतर करण्याचा यत्न करणाऱ्या भाषांतरकाराने नाटकाचा हा आत्माच हरवला आहे. मूळ नाटक व मराठी भाषांतर यांची तुलना हा वेगळचा लेखाचा विषय होऊ शकेल. भाषांतर करताना मराठी भाषेच्या मोडणीचाही फार विचार भाषांतरकाराने केलेला नाही. आणि इतके करून सार्त्रचा आशयही ते मराठीत आणू शकलेले नाहीत. शिवाय नाटकाचे संवाद म्हणून मराठी भाषांतरात उच्चारसौकर्य-संभाषणाची लयही फारशी निर्माण झाली नव्हती. भाषांतर ही अवघड कला आहे, त्यामुळे पहिल्या प्रयत्नातली ही मर्यादा मी समजू शकते. परंतु दिग्दर्शक म्हणून विजय बोंद्रे यांनी नाटकाची जी कल्पना मनाशी बाळगली त्यात शरीर छळाचे भीषण दर्शन घडविणे याला इतके प्राधान्य दिले गेले की नाटकातले गंभीर अर्थ नाहिसे झाले.

कॅनरीची भूमिका सादर करणाऱ्या

खाळ चोळकरांनीच नाटकाच्या अनुभवाचा पोत जाणून घेतला होता. इतरांपासूनच नाही तर स्वतःपासून अलिप्त होण्याचे प्रयत्न त्यांनी आपल्या आवाजातून, मुखवटचासारख्या निर्लेप चेहऱ्यातून व्यक्त केले. त्यांच्या डोळचांची खोल ठेवण, मागे सरकलेली केसांची रेषा या नैसर्गिक ठेवणीचाही त्यांना योग्य उपयोग झाला होता. किंबहुना वैयक्तिक पारितोषिकाची निवड करताना परीक्षकांचे चोळकरांकडे लक्ष गेले नाही हा त्यांच्या नाटचाशी प्रामाणिक रहाण्याचाच पुरावा आहे. मंगेश कुळकर्णींनी तरूण फँकी विशेष संवेदनक्षमतेने सादर केला. या तरुण नटाचा चेहऱ्याच्या स्नायूंवरील ताबा कौतुकास्पद आहे. विनय आपटे यांची देहयष्टी व आवाज रंगमंचाला अनुकूल आहे. परंतु दिग्दर्शकाने या भूमिकेसाठी मध्यम तीव्रतेच्या रंगातील शर्ट त्यांना देऊन त्यांचे वय विनाकारण कमी केले होते त्यांचे आविर्भावही सार्त्रच्या नाटकातील असण्यापेक्षा युद्धकथेच्या सांकेतिक नायकासारखे वाटत होते. सौ. शोभा

..पृष्ठ ६६ वर



ज्यां पॉल सार्त्रचे 'मेन विदाउट...'
निवड कौतुकास्पद

# आ ले पा क

■ पू. दत्ता बाळ म्हणतात : तमाशा-मधील 'गणगौळण' प्रवेशात श्रीकृष्ण विकृत स्वरूपात लोकांपुढे दाखवला जातो.

ते पहाणाऱ्याच्या दृष्टीवरदेखील अवलंबून आहे, असे आपण का म्हणायचे नाही ?

■ जनसंघाचे माजी अध्यक्ष अटलबिहारी बाजपेयी म्हणतात : जनसंघाने कोणतीही गोष्ट आंधळेपणाने केलेली नाही.

आणि देशातील मतदारांनी एकच गोष्ट आंधळेपणाने केली. त्यांनी आपली मते गायवासराला दिली !

■ शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले की महाराष्ट्र-म्हैसूर सीमा प्रश्न केवळ शिवसेनाच सोडवू शकेल.

बाळासाहेबांचा हा विनयीपणा पाहून चित्त हेलावून जाते.

■ पाकिस्तानमध्ये चाललेल्या लष्करी शिक्षण कार्यक्रमाला अनुलक्षून पाकचे गृहमंत्री म्हणाले : आमच्या या तयारी-मुळे भारताने घाबरून जाऊ नय; कारण आमचा भारतावर स्वारी करण्याचा हेतू नाही.

भारताने कशाला घाबरायचे ? पाकिस्तानच्या लष्करी तयारीमुळे अखेर पाकिस्तानलाच घाबरावे लागते, हे भारताला चांगले ठाऊक झाले आहे.

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यान-मालेत धनंजय कीर म्हणाले की आपल्याकडील मंत्री एकदा मंत्रिपदावर आरूढ झाले की ते मुंगळ्याप्रमाणे तेथेच चिकटतात.

पण मंत्रिमुंगळे तर म्हणतात की ढेपीप्रमाणे मंत्रिपदच त्यांना चिकटते.

■ एका जागरूक पत्रलेखकाने अशी तक्रार केली आहे की मध्यरेल्वेच्या डब्यातील बाकड्यात बेसुमार ढेकूण झाले असून ते चावतात.

सुरुवातीला 'पाचशे ढेकणांसाठी' अशी पाटी प्रत्येक बाकड्यावर लावा-यची मध्यरेल्वेची कल्पना होती म्हणतात. चावण्याबद्दल म्हणाल तर अंटरगड गर्दीमुळे स्वतःला चावणारे ढेकूण शेजाऱ्यांनाच चावताहेत असेच मला वाटत राहते. सदर पत्रलेखक मध्यरेल्वेचा नवखा प्रवासी असावा.

■ श्री. नीळकंठ खाडिलकर एका व्याख्यानात म्हणाले : शेक्सपियरच्या 'हॅम्लेट' नाटकापेक्षा कृ. प्र. खाडिलकरांचे 'कीचकवध' नाटक कितीतरी थोर आहे.

यावरून हेही सिद्ध होत नाही का की शेक्सपियरच्या नातवापेक्षा कृ. प्र. खाडिलकरांचा नातू कितीतरी थोर आहे ?

■ इंदिरा गांधी म्हणाल्या : क्रिकेट असो किंवा दुसरा कोणता खेळ असो त्यात कोण जिंकतो याला फारसे महत्त्व नाही; महत्त्व असते खेळाला.

ही साधी गोष्ट त्या अण्णा अजित वाडेकरना कधी कळणार कोण जाणे.

■ एका अग्रलेखात म्हटले आहे : नाटक हा महाराष्ट्राच्या काळजाचा विषय होऊन बसला आहे.

काळजीचासुद्धा !

■ स्नेहप्रभा प्रधानांनी एका भाषणात सांगितले : अभिनय अधिक समर्थपणे प्रगट करण्यासाठी अवयवांवर ताबा ठेवणे आवश्यक आहे.

मराठी प्रेक्षकांबद्दलच्या सहानुभूतीने असे म्हणत असाल तर त्याची काही गरज नाही. एकापेक्षा एक वजनदार नायिका पाहून मराठी प्रेक्षकाची नजर आता मेली आहे.

■ मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजिलेल्या पत्रकार कुटुंबियांच्या मेळाव्यात बोलताना एक पत्रकार पत्नी म्हणाल्या : वृत्तपत्रात येते ते सर्वच खरे असते असे पत्रकाराची बायको तरी समजणार नाही.

मेव्हणीची गोष्ट वेगळी.

■ त्याच पत्रकार पत्नी पुढे विचारतात, पत्रकाराच्या बरोबर असलेली बाई त्याची बायकोच असेल कशावरून ?

पत्रकाराचा पडेल वा चढेल चेहेरा पाहून या प्रश्नाचे अचूक उत्तर देता येते असे तज्ञांचे मत आहे.

■ माजी उपपंतप्रधान मोरारजी देसाई एका व्याख्यानात म्हणाले : काँग्रेस-मध्ये चारित्र्यसंपन्न माणसे होती म्हणून तो पक्ष बलवान झाला. ही माणसे आता सत्तेवरून बाहेर फेकली गेली आहेत.

मग सत्तेबाहेर चारित्र्यसंपन्नता वाढल्याचे कुठे आढळले नाही, हे कसे काय ?

■ विदर्भ साहित्य संघाच्या कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमालेत बोलताना दुर्गा भागवतांनी सांगितले : सत्यं-शिवं-सुंदरम् हे वाक्य वेद किंवा उपनिषदातून आलेले नसून त्याचा उगम फ्रेंच वाङ्मयातच सापडेल.

म्हणजे कोणतीही कला सत्य-शिव-सौंदर्यरहित असेल तेव्हाच ती अस्सल भारतीय कला ठरू शकेल.

कोणी सांगावे, उद्या खुद्द वेद आणि उपनिषदांचाही उगम कोठल्या तरी पाश्चात्य वाङ्मयात आहे असे सिद्ध व्हायचे.

■ नुकत्या झालेल्या शिरगणतीच्या आकड्यानुसार भारतात आत्तापर्यंत लग्न केलेले नाही आणि आता करण्याची वा होण्याची शक्यता नाही अशा स्त्री-

पुरुषांची संख्या अनुक्रमे ११ कोटी ८८ लाख ४४ हजार ८०० व १५ कोटी ५८ लाख ९१ हजार एवढी आहे.

लग्न न करणे हा सुखाचा मूलमंत्र होय, हे सूत्र एवढ्या भारतीयांना ठाऊक असेल असे वाटले नव्हते.

■ खासदार एच्. डी. मालवीय मुंबई-तील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात म्हणाले : काँग्रेस पक्षाचा प्रत्येक मंत्री हा पक्षाला जबाबदार आहे.

मग स्वतंत्रपणे तो बेजबाबदार असला तरी हरकत नाही.

■ मधुसूदन कालेलकरलिखित, 'नाटच-मंदार' निर्मित नवे मराठी नाटक : 'चांदणे शिपीत जा !'

दुष्काळ संपेपर्यंत या नाटकाला सर-कारने करमुक्त करावे, अशी जाहीर सूचना आम्ही करतो आहोत.

■ स्वतंत्र आंध्र चळवळीचे नेते श्री. सुब्बा रेड्डी यांनी असे उद्गार काढले की, यापुढे वेगळ्या आंध्र राज्याची निर्मिती प्रत्यक्ष परमेश्वरही थांबवू शकणार नाही.

हा त्या सर्वशक्तिमान परमेश्वराचा अपमान आहे. खरे म्हणजे परमेश्वर काय वाटेल ते करू शकेल; फक्त आधी इंदिरा गांधींची तशी परवानगी घेतली की झाले.

■ तुर्भे येथील भाभा अणुशक्ती संशोधन केंद्रातील मेटॅलर्जी डिव्हिजन मुंबईहून हलवून महाराष्ट्राबाहेर नेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शिवसेनेची आगाऊ संमती मिळाल्या-खेरीज असा निर्णय घेता येत नाही, हे संशोधन केंद्राला ठाऊक आहे ना ?

■ सांगली जिल्ह्यातील सोनवडे येथे भरलेल्या सर्वपक्षीय नांदोली धरण-विषयक परिषदेत आमदार उदयसिंगराव गायकवाड, खुजगावकर राजारामबापू पाटीलना उद्देशून म्हणाले : झोपलेल्यांना जागे करणे सोपे असते; पण झोपल्याचे सोंग केलेल्यांना जागे करणे अवघड असते.

आणि जागे झाल्याचे सोंग करणारे? त्यांचे काय ?

■ धरण बांधणे म्हणजे पाण्याला विश्वासात घेणे.

■ अ. भा. सारस्वत मेळाव्याला मार्ग-दर्शन करताना रेल्वेमंत्री टी. ए. पै म्हणाले : सारस्वतावर गेल्या हजारो वर्षांत अनेक संकटे आली; पण त्यातू-नही त्यांनी मार्ग काढला, आपले अस्तित्व टिकवले.

याचे ताजे उदाहरण म्हणजे पुणे विद्यापीठाने 'महाराष्ट्र सारस्वता'वर आणलेले संकट !

■ महाराष्ट्राचे माजी पोलादी पुरुष बाळासाहेब देसाई म्हणतात, मराठी माणसांनी मुजरे करणे सोडावे.

आम्ही म्हणतो, मराठी माणसांनी

मुजरे करणे आणि मुजोरी करणे, दोन्ही सोडावे. □

## टोनी ग्रेग आणि मी

इंग्लंड आणि भारत यांच्यातील शेवटचा पाचवा कसोटी सामना मुंबईला ब्रेबॉर्न स्टेडियमवर यथासांग पार पडला. हा सामना साक्षात पाहू शकणाऱ्या ७० हजार भाग्यवान प्रेक्षकांमध्ये मी होतो. शंकरराव चव्हाणांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद मिळविण्यासाठी केले नसतील इतके प्रयत्न मी या कसोटी सामन्याच्या तिकिटासाठी केले होते. मुंबईला काही विशेष घडले तर ते आपण पाहायलाच हवे, अशी एक जागरूक मुंबईकर नागरिक म्हणून माझी कर्तव्यदक्ष भूमीका असते.

वास्तविक क्रिकेटमधले बारकावे मला अजिबात समजत नाहीत. (ते असतात एवढे समजते हेही काही कमी नाही म्हणा.) धावांचा पाऊस पडावा, चौकार-षटकारांची आतषबाजी व्हावी, कडाकड खेळाडू बाद व्हावे, आणि अखेर सामना निकाली ठरावा, अशी माझी स्थूल अपेक्षा असते. गोलंदाज चेंडूफेकीत करत असलेले बदल, त्यानुसार बदलणारे क्षेत्ररक्षण, चेंडूप्रमाणे मारला जाणारा फटका, फलंदाजांच्या अनुक्रमात होणारी उलथापालथ, नो बॉल व पायचितीबद्दलचे नवे नियम, हे खरे सांगायचे तर, आपल्याला उमगत नाही. तेवढे मन लावून क्रिकेट पाहतो कोण? आणि तेवढा वेळदेखील आहे कोणाला इथे? कसोटी सामन्याची गोष्ट अर्थात वेगळी आहे. माझे कलंदर क्रिकेटप्रेम शाबित करण्यासाठी कसोटी सामन्याला मला जावेच लागते. कित्येक वेळा सामना पाहताना कंटाळा येतो; खळ पाहण्यापेक्षा चणेदाणे खाणे अधिक रंजक ठरते; पण तरीही तेथे आपल्याला कसे उदात्त उदात्त वाटते आहे असे मी मनाला पटवतो. वस्तुस्थिती अशी असते की हा जातो, तो जातो, मागचा जातो, पुढचा जातो, वरचा जातो, खालचा जातो, अल्याडचा जातो, पल्याडचा जातो, ओळखीचा जातो, अनोळखीचा जातो, विकतचा जातो, फुकटचा जातो, म्हणून मला जाणे भागच पडते.

आत्तापर्यंत हे कोणाला माहीत नव्हते. मी कोणाला कधी सांगितलेच नव्हते. त्यामुळेच ते त्या टोनी ग्रेगला कसे कळले याचे मला मोठे आश्चर्य वाटून राहिले आहे. त्याचे असे झाले: सामन्याचा तिसरा दिवस होता. टोनी ग्रेगने रीतसर शतक पुरे केले होते. चंद्रशेखर तंबूकडून गोलंदाजी करत होता. चंद्राच्या एका चेंडूवर टोनी ग्रेगने उंच फटका मारला तो सरळ चंद्राने झेलला. टोनी ग्रेग बॅट काखोटीला मारून तंबूकडे निघाला. त्याआधीच मी आपल्या जागेवर उभा राहून उड्या मारायला लागलो होतो. तोंडाने 'आऊट, आऊट' जल्लोषत होतो. आणि पाहतो तो काय, टोनी ग्रेग क्रीडांगणावरून हात करून मला खाली

बसायला सांगत होता. म्हणजे ग्रेग बाद झालाच नव्हता. त्याने मारलेला चेंडू जमिनीला घासपटून वर उडाला होता. चंद्राने झेल घेतल्याचे नाटकच केले होते. ग्रेगदेखील खोटाखोटाच तंबूकडे निघाला होता. मीच वेडा बेभानपणे थयथयाट करत होतो; त्यामुळे ग्रेगला हाताने खूण करून मला बसायला सांगावे लागले. मी बसलो. सगळे मला हसत होते. क्रिकेटमधली साधी गोष्ट मला कळू नये याबद्दल माझी कीव करत होते. क्षणभर तेथून निघून जावे असे मला वाटले. पण तसे वाटले तरी तसे करणे माझ्या स्वाधीन नव्हते. म्हणून चुळबुळत, चुटपुटत दिवस संपेपर्यंत तसाच बसून राहिलो. आपल्या प्रेक्षकीची थट्टा झाल्यामुळे मनाला हुरहुर लागली होती. अखेर ब्रेबॉर्न स्टेडियमवर यापुढे होणारा प्रत्येक कसोटी सामना पाहीनच पाहीन अशी प्रतिज्ञा मावळत्या सूर्याच्या साक्षीने केली तेव्हा मन शांत झाले. ☐

## वाडेकरचे ' अजित 'पण

क्रिकेटचा विषय निघालाच आहे तेव्हा चारदोन फटके मारून घेतो. कारण क्रिकेट हा विषय राजकारण वा शिक्षणासारखा आहे : कोणीही उठावे आणि त्यावर तोंड उचकावे. मला सांगायचे होते अजित वाडेकरबद्दल.लागोपाठ तीन कसोटीमालीका जिकल्यामुळे अजित वाडेकरचा डावा हात सध्या ब्रेबॉर्न स्टेडियमच्या घडयाळाला लागण्याइतका लांब झाला आहे. आपले अजितपण टिकवण्यासाठी काय वाटेल ते करायला वाडेकर तयार होईल असे कानपूर आणि मुंबईच्या कसोटी सामन्यावरून वाटते. कानपूर आणि मुंबईला भारतसंघनायक वाडेकर क्रिकेट खेळलाच नाही; तो खेळला एकटयाने खेळायचा पत्त्यातला ' पेशन्स 'चा डाव. हा डाव हेकटपणाने खेळण्यातली अजित वाडेकरची गती कौतुकास्पद आहे. पुढील कारकीर्दीत ही कला पूर्णत्वाप्रत नेण्यासाठी तनमनधनेकरून तो झटेल अशी चिन्हे दिसू लागली आहेत. म्हणजे यापुढे अजित वाडेकरच्या नेतृत्वाखालील सगळेच कसोटी सामने अनिर्णित राहतील अशी खूणगाठ बांधायला हरकत नाही. ते अनिर्णित राहिले की वाडेकर ' अजित ' राहील; भारतीय क्रिकेटच्या इतिहासात तो अमर होईल. मग क्रिकेटची विटंबना झाली तरी हरकत नाही. क्रिकेटपेक्षा स्वतःला अधिक मोठे मानणाऱ्या संघनायकांनी क्रिकेटची विटंबना पुन्हा पुन्हा केली आहे; त्यामुळे अजित वाडेकरला संकोच वाटण्याचे काही कारण नाही.

–अनंतराव

# दोन प्रकाशन समारंभ

## आनंदवन : पुणे
## स्नेहांकिता : मुंबई

### आनंदवन । एक आव्हान आणि आवाहन

दिवाळी अंकाच्या साहित्यिक आणि आर्थिक यशापयशाचे हिशोब डिसेंबर ७२ अखेर संपत आले होते आणि १९७३ या नव्या वर्षातला जानेवारी उजाडला.

नव्या वर्षाच्या पहिल्या महिन्यात बहुतेकजण आपापल्या परीने बरेच संकल्प सोडतात आणि त्या त्या वर्षात ते सिद्धीस नेण्याचे ठरवतात. परंतु वर्षे निघून जातात, संकल्प राहतात आणि सिद्धी व नवीन वर्षाचा मेळ काही बसत नाही. असे का घडावे ? इच्छेला चिंतनाची व प्रत्यक्ष कृतीची जोड मिळत नसावी. चिंतनाला सामाजिक जाणीवेची बैठक जेव्हा लाभते तेव्हाच भविष्यातील स्वप्ने प्रत्यक्षात येण्याची धडपड करू लागतात. आणि अशी धडपड जेव्हा मूर्त स्वरूप घेऊ लागते तेव्हा 'आनंदवन'सारखे त्रैमासिक काळाची गरज काही प्रमाणात पूर्ण करण्यासाठी सुरू होते.

१९७३ चा जानेवारी. मागील कित्येक वर्षांच्या चिंतनाला आणि संकल्पांना प्रत्यक्षात येण्याचा योग म्हणजे 'आनंदवन' ! विशिष्ट कालावधिनंतर काळाची निश्चित अशी मागणी असते, एक प्रकारची गरज असते. सांप्रत मराठीत साहित्यविषयक मासिकांचा 'सुकाळु' असताना आणखी एका नियतकालिकाची भर कशाला असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. परंतु तो फोल ठरतो. कारण सांप्रत मराठीत ही आणखी एक भर नसून 'आनंदवन'ही एका नवीन प्रवाहाची सुरुवात आहे.

ललित साहित्याला छेद देऊन पुढे पाऊल टाकणारे 'आनंदवन' हे मानव्य विद्यांना वाहिलेले एक त्रैमासिक आहे. हा धाडसी आणि constructive प्रयत्न केला आहे पुण्यातील प्रसिद्ध

'कॉन्टिनेंटल प्रकाशन'च्या अनिरुद्ध कुलकर्णी ह्यांनी.

आज मानवी जीवनातील समस्या सतत वाढत आहेत; परंतु मानव व त्याच्या समस्या केंद्रस्थानी मानून जीवनातील त्यांचे स्वरूप स्पष्ट करणे आणि त्या आधारे काही निश्चित असा अर्थ मांडण्याचा प्रयत्न करणारी नियतकालिके मराठीमध्ये अगदी बोटावर मोजण्याइतकी आहेत. आणि त्यातही महाविद्यालयीन विद्यार्थी व पदव्युत्तर विद्यार्थी यांच्या अध्ययनाला पूरक ठरणारी नियतकालिके जवळजवळ नाहीतच. आजचा विद्यार्थी हा फक्त 'अभ्यासक्रमात'– Syllabus मध्ये अडकलेला आहे. आपण अभ्यास करीत असलेल्या विषयात त्याला सहाय्यक ठरतील असे काही विचार मांडले जात आहेत याची त्याला अजिबात जाणीव नसते. त्यामुळेच आजचा विद्यार्थी हा वास्तव जीवनात बावरल्यासारखा प्रवेश करतो आणि संघर्षात अयशस्वी ठरतो. ह्यामुळेच अनेक समस्या निर्माण होतात.

मानवी समस्या आणि मानवी व्यक्तिमत्त्व इतकी बहुविध आहेत की त्यांचे वर्गीकरण (Clasification) आणि विशेषीकरण (Specialization) केल्याशिवाय गत्यंतर नाही. म्हणूनच मानसशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, राजकारण, नीतिशास्त्र, कायदा इत्यादी व्यापक विषयांच्या आधारे मानवी जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करावा लागतो. आणि म्हणूनच 'आनंदवन'ने 'मानव्यविद्या' (Humanities) व 'सामाजिक शास्त्रे' (Social Sciences) अशी व्यापक भूमिका स्वीकारलेली आहे. वेळोवेळी निर्माण होणाऱ्या मानवी पर्यायाने सामाजिक समस्यांविषयक विस्तृत व चिकित्सक लेखन साहजिकच सामाविष्ट व्हावे. मानव्यविद्यांचे अंतिम उद्दिष्ट जीवन सुसह्य करून त्याचा अर्थ सांगणे हा आहे. आणि असा प्रयत्न 'आनंदवन'च्या पहिल्या अंकातील 'खरे नागरिकत्व' (ना. वि. जोशी), 'भारतीय जातीयवादामागील तर्कशास्त्र' (नी. र. वऱ्हाडपांडे), 'व्यस्ततावादी मनोवृत्ति' (रा. ग. जाधव), 'मानव, यांत्रिक मानव व यंत्र' (शि. स. अंतरकर), 'पुणे शहरातील झोपडपट्टी' (गोविंद गारे) या लेखांवरून केल्याचे दिसून येईल.

मराठीतील अशा या नवीन व्यापक उपक्रमाची सुरुवात पुण्यात जानेवारी ७३ मध्ये झाली. 'आनंदवन' या नव्या त्रैमासिकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ सेतुमाधवराव पगडी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू त्र्यं. कृ. टोपे यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक भाषणात अनिरुद्ध कुलकर्णी यांनी 'आनंदवन' हे केवळ Research Journal न होता ते तात्कालिक जिवंत समस्यांची दखल व उहापोहदेखील करेल हे स्पष्ट केले. संशोधन अथवा विचारमंथन हे सार्वकालिक समस्यांचे व सूत्रांचे जसे असते तसेच वर्तमानातील भेडसावणाऱ्या प्रश्नांचेदेखील असते याची जाणीव त्यांनी व्यक्त केली.



कुलगुरु टोपे । अनिरुद्ध कुलकर्णी । सेतुमाधवराव पगडी

मानव्यविद्यांना वाहिलेल्या त्रैमासिकाचे नाव 'आनंदवन' असण्याचे औचित्य काय? त्यामागील भूमिका त्यांनी स्पष्ट केली. 'समर्थ रामदास हे महाराष्ट्रातील पहिले विचारवंत होते आणि त्यांनी प्रथम 'विचार' (Thought) ही संकल्पना स्पष्ट केली. तेव्हा वैचारीक चळवळीचे प्रणेत्या समर्थ रामदासांच्या 'आनंदवन भुवन' ह्या सुप्रसिद्ध काव्यातील 'आनंदवन' हे शब्द निश्चित केले. तसेच समर्थांनी त्या काव्यात भावी वैभवशाली महाराष्ट्राचे चित्र देऊन जणू एक 'युटोपिआ'च रेखाटला आहे.' अनिरुद्ध कुलकर्णी यांच्या प्रास्ताविक भाषणातून उपस्थितांना 'आनंदवन'ची भूमिका समजली आणि त्यांच्यामध्ये एक प्रकारचा मोकळेपणा निर्माण झाला!

कुलगुरू टोपे यांनी 'आनंदवन'च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन केले. सन १८४० साली प्रकाशित झालेल्या 'दिग्दर्शन' या बाळशास्त्री जांभेकरांनी संपादित केलेल्या पहिल्या नियतकालिकापासूनचा थोडक्यात आढावा त्यांनी घेतला. त्यानंतर कुलगुरू टोपे म्हणाले, आनंदवनसारखी संशोधनपर असलेली नियतकालिके प्रत्येक सुशिक्षित मराठी माणसाने वाचली पाहिजेत. 'आनंदवन' हा Revivalism ठरता कामा नये. 'आनंदवन'मधील खरे नागरिकत्व आणि भारतीय जातीयवादामागील तर्कशास्त्र हे दोन लेख विशेष उल्लेखनीय आहेत. खरे नागरिकत्व ह्या लेखामधील Human Rights च्या कल्पना मार्मिकपणे मांडल्या आहेत व Nobody will be Stateless ही विलोभनीय व भविष्यातील जगाबद्दलची कल्पना निश्चितच

नवी आहे. तांत्रिक प्रगतीमुळे सर्व जग इतके जवळ येईल की ते एकच गाव होईल आणि अशारीतीने प्रत्येकजण ह्या जगाचा नागरिक होईल. भारतीय जातीयवादामागील तर्कशास्त्र या लेखामधील 'आर्य हे भारतात दुसरीकडून आले नाहीत' ह्या मुद्द्याबाबत अधिक संशोधन होणे आवश्यक आहे आणि अशा प्रकारच्या लेखांमध्ये पुरावे महत्त्वाचे ठरतात, त्यामुळे लेखकाने मांडलेल्या सिद्धांताला बळकटी येते. आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी इशारा दिला 'पुरेशा पुराव्याशिवाय मांडलेले सिद्धांत सामाविष्ट केलेले लेख कटाक्षाने टाळा.'

आनंदवनच्या प्रकाशन समारंभ ला बोलावून कॉन्टिनेंटलच्या अनतरावांनी माझ्या डोक्यावर पगडी आणि कुलगुरुंच्या डोक्यावर टोपी घातली' अशा हलक्याशा विनोदाने सेतुमाधवराव पगडी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणास सुरुवात केली, 'आनंदवन'ने मानव्यशास्त्र असे व्यापक क्षेत्र निवडले आहे. तेव्हा त्यात सायन्स सोडले तर बहुतेक सारे विषय समाविष्ट होतात. हे त्रैमासिक केवळ संशोधनापुरते मर्यादित असू नये तर ते विचारप्रवर्तकही ठरावे. 'आनदवन भुवना'त आदर्श समाजाची कल्पना मांडलेली आहे. Futurology म्हणजे भविष्यकालीन समाज व शासन कसे असावे याची चर्चा व्हावी. 'राष्ट्र' ह्या कल्पनेला सुरुंग लागतोय आणि त्यातूनच Noble Village व World Citizenship ची कल्पना पुढे येत आहे– (Concept of One World) 'आनंदवन'मधील महाभारत व पुरातत्त्व ह्या म. श्री. माटचांच्या लेखामध्ये मी रमलो–तो एक विचारप्रवर्तक लेख आहे. असे विचारप्रवर्तक परंतु विविध वाचकांना रस असणारे लेख अंकात द्या. मात्र धार्मिक व संत वाङ्मय देण्याचा मोह कटाक्षाने टाळा,' असे सांगून त्यांनी Secondary लेख नाकारण्याचे धैर्य दाखवा असा स्पष्ट सल्ला दिला. जगाच्या पुढील संस्कृतीत धर्माचे स्थान काय? तसे एखादा नवीन धर्म उदयाला येणार आहे काय? याविषयी सेतुमाधवरावांनी केलेल्या शैलदार विवेचनामुळे आणि त्यांच्या व्यासंगी भाषणामुळे उपस्थित श्रोते तृप्त दिसत होते.

आभारप्रदर्शनानंतर सर्व उपस्थितांनी कॉफीपानाचा आस्वाद घेतला आणि 'आनंदवन'चा छोटासा, आकर्षक व आटोपशीर असा प्रकाशनसमारंभ संपला.

–अनिल

## स्नेहांकिता

एक अंगात शिरशिरी आणणारी संध्याकाळ.

सोमवार दि. २२ जानेवारीची.

मुंबईत थंडीची लाट आलेली आहे. सुखवस्तू मुंबईकर आपल्या ठेवणीतल्या गरम कपड्यात नटूनथटून आपापल्या कार्यक्रमांना चालले आहेत. त्यातलेच काही साहित्यसंघात लगबगीने शिरत

आहेत.कुणीतरी कुणालातरी विचारतंय्–

'काय आहे हो आज इथे?'

उत्तर येतंय्––

'स्नेहांकिताचा प्रकाशन समारंभ!'

'स्नेहांकिता? म्हणजे काय बुवा?'

'अहो, आपल्या स्नेहप्रभा प्रधान आहेत ना? त्यांनी म्हणे एक खळबळजनक पुस्तक लिहिलंय्–त्यांच्या आणि डॉ. शिरोडकरांच्या स्नेहसंबंधाबद्दल त्या पुस्तकाचं नाव आहे 'स्नेहांकिता'!'

'अस्सं! तरीच एवढी गर्दी दिसतेय्.'

मी एका बाजूला उभी राहून हा संवाद ऐकतेय्. मनात विचार येतोय्, खरंच, 'स्नेहप्रभा प्रधान' या नावातच अशी काही जादू आहे की काय की त्यांनी पुस्तक–आणि तेही आत्मचरित्र-लिहिलंय् असं कळताच त्याच्या प्रकाशनासाठी लोकांनी गर्दी करावी?

कारण काहीही असो, पुरंदरे सभागृह तर आमंत्रित प्रतिष्ठितांनी, लेखकांनी आणि स्नेहप्रभाबाईंच्या चाहत्यांनी फुललेलं आहे हे मात्र अगदी खरं!

बरोबर ६–३० ला समारंभ सुरू होतो. पॉप्युलर प्रकाशनचे संचालक श्री. रामदास भटकळ प्रास्तविक भाषण करतात. उपस्थितांचं स्वागत करून झाल्यावर स्नेहप्रभाबाईंना आपण आत्मचरित्र लिहायला कसं प्रवृत्त केलं हे सांगताना ते सरळ जाहीर करून टाकतात की स्नेहप्रभाबाईंचं खरं आत्मचरित्र अजून लिहून व्हायचंच आहे–प्रस्तुत पुस्तक हे फक्त एका विशिष्ट कालखंडाशीच संबंधित आहे. साहजिकच श्रोत्यांमध्ये कुतूहल अधिकच वाढतं–मग हे पुस्तक आहे तरी कशाबद्दल?

समारंभाचे अध्यक्ष प्रा. वि. ह. कुलकर्णी सूत्रे हातात घेतात आणि 'स्नेहांकिता'चे औपचारिक प्रकाशन करतात. पहिल्या वक्त्यांना भाषणासाठी आवाहन केले जाते.

या आहेत श्रीमती लीला मस्तकार-रेळे. स्नेहप्रभाबाईंच्या शालेय जीवनापासूनच्या मैत्रीण. आपल्या अस्खलित भाषणात त्या स्नेहप्रभाबाईंच्या स्वभावाचे काही पैलू उलगडून दाखवतात आणि 'स्नेहांकिता' वाचताना त्यांना जाणवलेले काही विशेष स्पष्ट करून सांगतात. त्या असंही म्हणतात की 'दुःख हे सांगितल्यानं कमी होतं आणि सुख हे सांगितल्यानं वाढतं'– त्या न्यायानेच या पुस्तकातून वाचकाला सतत जाणवणारा स्नेहप्रभाबाईंचा असह्य-एकाकीपणा आता वाचकांना स्वतःची ही मर्मकथा सांगितल्यामुळे जरासा कमी होईल अशी आशाही व्यक्त करतात.

यानंतरचे व्यक्ते आहेत सुप्रसिद्ध अभिनेते गजानन जागीरदार. स्नेहप्रभा प्रधान जेव्हा यशाच्या आणि कीर्तीच्या ऐन शिखरावर होत्या तेव्हाचे त्यांचे समवयस्क मित्र. आपली स्नेहप्रभाबाईंशी ओळख कशी झाली आणि त्यांच्या विनोदबुद्धीचा आपल्याला कसा प्रत्यय आला त्याची एक खुसखुशीत कहाणी ते श्रोतृवृंदाला ऐकवतात. स्नेहप्रभाबाईंनी यापुढेही आपले लेखन असेच जोमात चालू ठेवावे अशी सदिच्छा व्यक्त करून ते आपले छोटेसेच भाषण संपवतात.

यानंतर बोलायला उठतात डॉ. गोपाळ करंदीकर. डॉक्टर शिरोडकरांचे शिष्य आणि स्नेहप्रभाबाईंचे सुहृद् या

दोन्ही भूमिकांतून आज ते बोलत आहेत. 'स्नेहांकिता' वाचून आपण अक्षरशः कसे भारून गेलो आहोत याचे विलक्षण प्रत्ययकारी चित्र ते आपल्या झपाटलेल्या वक्तृत्वात रेखाटतात. श्रोते हे भाषण ऐकूनच भारून गेलेले मला दिसत आहेत. डॉक्टरसाहेब श्रोत्यांना पुनः पुन्हा बजावून सांगत आहेत, 'हे पुस्तक लायब्ररीतून पुनः पुन्हा वाचायला मिळू शकणार नाही आणि एकदा वाचल्यानंतर तुम्हाला पुनः पुन्हा वाचल्याशिवाय राहवणार नाही, म्हणून माझा तुम्हाला सल्ला आहे की विकत घ्या आणि वाचा.'

मान्यवर वक्त्यांना सुंदर पुष्पगुच्छ अर्पण करण्यात येतात आणि प्रा. वि. ह. कुळकर्णी अध्यक्षीय भाषणास सुरुवात करतात. ते म्हणतात की, 'स्नेहांकिता' वाचल्यावर मला एका फार जुन्या इंग्रजी पुस्तकाची—डॉ. जॉन्सन यांच्या 'रासेलस्' या कादंबरीची आठवण झाली. त्या कादंबरीतील माणसे जशी सुखाच्या शोधात सर्वत्र फिरली; परंतु त्यांना कधीच खरे सुख सापडले नाही त्याप्रमाणेच स्नेहप्रभाबाई आयुष्यभर माणुसकीच्या शोधात फिरल्या; परंतु त्यांना कुठेच माणुसकी आढळली नाही.' प्रा. कुळकर्णी असेही सांगतात की 'स्नेहांकिता' हे अतिशय मर्मग्राही दृष्टीने लिहिलेले जीवनावरचे भाष्य आहे आणि त्याला कृत्रिमतेचा कुठेही स्पर्श नाही. त्यामुळेच हे पुस्तक अतिशय वाचनीय झाले आहे असा निःसंदिग्ध निर्वाळाही ते देतात.

यानंतर श्रोते ज्यांची उत्कंठेने वाट पाहात असतात त्या स्नेहप्रभाबाई प्रेक्षकांना सामोऱ्या येतात. या आता काय बोलतील? पुस्तकाची पार्श्वभूमी कथन करतील की सर्वांचे आभार मानतील की 'माझे हे पहिलेच पुस्तक असल्यामुळे त्याच्या प्रकाशनाच्या या प्रसंगी मी अतिशय आनंदात आहे' अशी सुरुवात करतील? माझ्या मनात तऱ्हेतऱ्हेचे विचार तेवढ्यात येऊन जातात. परंतु स्नेहप्रभाबाई जरा दुःखी दिसत आहेत. मला वाटतं, एकूणच स्वतःच्या आयुष्यातील काही नाजुक भाग वाचकांना ऊघड करून सांगण्याच्या क्रियेचे अप्रत्यक्ष दडपण त्यांच्यावर आलेले असावे. त्या भाषणाची सुरुवातही दुःखी सुरातच करतात आणि बोलताबोलता त्यांच्या मनाला सलणारं, छळणारं, एक फार मोठं शल्य उघडं करतात. त्या म्हणतात की 'आम्ही कलावंत कितीही यशस्वी झालो, प्रसिद्ध झालो तरी शेवटी आम्हाला असंच वाटत राहतं की आपण समाजाकडून वाळीत टाकले गेलेलो आहोत. समाजातील व्यक्ती त्यांच्या वैयक्तिक आनंदाच्या क्षणी आम्हाला त्यांच्यात सामावून घेत नाहीत. मला माणुसकी शोधायची होती, परंतु ती फार थोड्या ठिकाणी, किंबहुना अपवादात्मकच आढळली. माझ्या या दुःखाला वाचा फोडण्याचे कार्य या पुस्तकाद्वारे करवून घेण्यात आले याचे सर्व श्रेय मी रामदास भटकळ यांना देते. माझी आणि डॉक्टर शिरोडकरांची मैत्री या पुस्तकाद्वारे उजेडात येत आहे आणि त्या अनुषंगानेच मी समाजाचा भोंदूपणा, नकलीपणा या पुस्तकात खरवडून काढला आहे.' समारंभ संपतो.

—अनामिका

पुस्तके

# सावरकरांच्या रत्नागिरी कालखंडावर अधिक प्रकाश

पां. कृ. सावळापूरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे समग्र चरित्र अनेक दृष्टींनी उदात्त, स्फोटक, स्फूर्तिप्रद, क्रांतिकारक, अद्भुत आणि अद्वितीय आहे. त्यांनी राष्ट्राकरिता भोगलेल्या हालअपेष्ठा फारच थोड्यांच्या वाट्यास आल्या आहेत; आणि स्वतंत्र भारताच्या शासनाने त्यांच्या ठिकाणी दाखविलेली अनास्था तर त्यापेक्षाही अद्वितीय आहे.

थोर व्यक्तींचे थोरपण कळावयास व त्याचे यथार्थ मूल्यमापन व्हावयास फार काल लागतो. ते त्या व्यक्तीच्या आयुष्यात बहुधा होत नाही. विशेषेकरून कालप्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाऊन सक्रूद्दर्शनी कडू पण परिणामी पथ्यकर असे विचार सांगणारी व तदनुरूप आचार करणारी व्यक्ती काही पिढ्यांनंतर बहुमानित होते. त्यांचे द्रष्टेपण प्रत्ययास यावयास तसा काळ यावा लागतो. तो आला म्हणजे राष्ट्राची अज्ञानाची झापड दूर होते व त्या थोर व्यक्तीचे थोरपण पटू लागते. स्वातंत्र्यवीर सावरकर अशा दुर्मिळ थोर व्यक्तीपैकी एक होऊन गेले. त्यांची चरित्रे अनेक व्यक्तींनी अनेक भाषात लिहिली आहेत व प्रत्यक्ष सावरकरांनीही आपले अंशात्मक आत्मचरित्र लिहिले आहे. सावरकरांनी अनेक लेख, नाटके, कादंबरी काव्ये हेही वाङ्मय प्रभूत प्रमाणात आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा एक भाग म्हणून निर्माण केले असल्यामुळे त्यातूनही त्यांचे दर्शन होण्याची सोय झाली आहे. असे असूनही श्री. बाळाराव सावरकर यांनी प्रस्तुत चरित्र लिहिले, ते इतर चरित्रातील अपूर्णता दूर करण्यासाठीच होय. विशेष करून १९२४ ते १९३७ या काळात सावरकर रत्नागिरीत स्थानबद्ध अवस्थेत असताना त्यांनी जे विधायक सामाजिक कार्य केले त्याचा साधार

वृत्तांत या चरित्रात येतो या दृष्टीने ते फार महत्त्वाचे आहे. सामान्यतः राजकीय कार्य जसे डोळ्यात भरते, व पारतंत्र्याच्या काळात शत्रुद्वेषामुळे त्या कार्यास जसे चित्तथरारक स्वरूप येते, तसे सामाजिक सुधारणा कार्याच्या संबंधात होत नाही. सामाजिक कार्यात समाजाच्या स्तुस्तीपेक्षा त्याच्या निंदेसच सुधारक अधिक पात्र होतो म्हणून एका दृष्टीने, पारतंत्र्यकालातील राजकीय कार्यापेक्षा ते अधिक सुरक्षित वाटले तरी दुसऱ्या दृष्टीने ते अधिक अवघड असते. म्हणून श्री. बाळाराव यांनी लिहिलेल्या या चरित्रग्रंथाची योग्यता अधिक वाटते. प्रस्तुत चरित्र लिहिण्याचा आपला उद्देश लेखकांनी प्रस्तावनेत पुढील प्रमाणे सांगितला आहे.

"मी लिहित असलेले चरित्र ही ह्या चरित्रात केवळ एक नवीन भर नाही तर मी लिहिलेल्या ह्या सावरकर चरित्रात १९२४ ते १९३७ जून या या कालखंडातील त्यांचे कार्य विस्तृत नि साधार सांगितले आहे. श्री. करंदीकर यांच्या ५०० पानी चरित्रात या कालखंडाला केवळ ३०-४० पाने दिलेली आहेत. तसेच श्री. कीर यांनीही हा काल, त्यांचा अत्यंत आवडता असताही, पन्नास साठ पानात संपवावा लागला आहे. मी हा काल प्रथम घेण्याचे ठरविले याचे मुख्य कारण म्हणजे श्री. शि. ल. करंदीकर यांनी जन्मठेपेपर्यंतचा म्हणजे १९१० पर्यंतचा भाग विस्तृतपणे लिहिला आणि स्वतः तात्यारावांनीच बालपण १८८३ ते १९०० नि जन्मठेप म्हणजे १९१० ते १९२४ पर्यंतचा भाग विस्तृतपणे सांगितला आहे. म्हणून याच्या पुढचा सन १९२४ ते १९३७ पर्यंतचा कालखंड मी ह्या चरित्रात सांगितला आहे."

यावरून या चरित्रग्रंथाची रूपरेषा कळून येईल. आणखीही एक गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे. चरित्र लेखक श्री. बाळाराव हे चरित्र नायकाचे पंधरा वर्षे लेखनिक व निजीकार्यवाह होते. तात्यारावांनी आपला पत्रव्यवहार, वर्तमानपत्रातील त्या त्या संदर्भातील कात्रणे इत्यादी सारे योजनाबद्ध रीतीने जपून ठेवून तो सारा संग्रह श्री. बाळाराव यांच्या स्वाधीन केला, इतकेच नव्हे तर संपूर्ण सावरकर वाङ्मयाचे अधिकार त्यांच्याकडेच दिले. यामुळे श्री. बाळारावांनी लिहिलेले हे चरित्र अगदी अधिकृत व प्रत्यक्ष माहितीने भरलेले असणे हे स्वाभाविक आहे. या चरित्रासाठी आवश्यक असणारी साधने लेखकाच्या स्वाधीन इतक्या प्रमाणात होती की त्या साधनांचेच त्यांना तारतम्याने नियमन करावे लागले! या ग्रंथातील प्रत्येक विधान साधार आहे. प्रत्येक वर्षाच्या कार्याचे, त्या वर्षाचे शीर्षक देऊन, एक एक प्रकरण केले आहे त्यामुळे आपण स्वातंत्र्यवीरांची जणू दैनंदिनीच वाचत आहोत असे वाटते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांना प्रथम रत्नागिरी नगर व नंतर जिल्हा याच परिसरात कोंडून ठेवून राजकीय कार्य

न करण्याचे बंधन त्यांजवर घातले होते. ही बंदी दोन दोन वर्षांनी वाढविली जात होती व १९३७ या वर्षी अल्पसंख्य पक्षाचे मध्यावधी मंत्रिमंडळ स्थापन न होते तर त्याकाळी सावरकरांची सुटका झालीही नसती व पुढील पाव शतक त्यांच्या प्रज्ञेचा नि नेतृत्वाचा जो लाभ हिंदुराष्ट्रास मिळाला तो मिळालाही नसता. त्या दृष्टीने मध्यावधी मंत्रिमंडळ हे एक वरदानच ठरले असे म्हणावयास हरकत नाही. लहानसहान का होईना पण प्रत्यक्ष कार्यच करून दाखवावे हा स्वातंत्र्यवीरांचा बाणा होता. मग ते कार्य राजकीयेतर, म्हणजे लिपिशुद्धी, भाषाशुद्धी, मुद्रणसुधारणा, टंकलेखन अस्पृश्यता व जन्मजात वर्णजाती यांचे उच्चाटण, हिंदुसंघटन इ. कोणतेही असो, पण ते कार्यान्वित केल्याविना सोडावयाचेच नाही या हिरीरीने स्वातंत्र्यवीर काम करीत असत. योगायोगाने त्यांना रत्नागिरी जिल्हा या कामासाठी एक तपाहून अधिक काळ मिळाला. व या कार्यात त्यांनी अपूर्व यश मिळवून दाखविले !

स्वातंत्र्यवीरांनी सहभोजने घडवून आणली, सर्व हिंदूंना खुले असणारे पतितपावन मंदिर उभे केले. बाटलेल्या अहिंदूना शुद्ध करून घेऊन परत स्वधर्मात घेतले. यासाठी शेकडो व्याख्याने दिली, शेकडो लेख लिहिले व अमूप शारीर परिश्रम केले. त्याकाळच्या सनातनी समाजात राहून हे काम करणे किती कठीण होते याची आजच्या पिढीस कल्पना येणार नाही. केवळ बोलक्या सुधारकासही जेथे विरोध होत असे तेथे प्रत्यक्ष कर्त्या सुधारकास तो किती सहन करावा लागला असेल ते कल्पनेने जाणता येईल. पन्नास—साठ वर्षांपूर्वी, जो राजकीय सुधारक असे तो समाजकारणात सनातनी व जो समाजसुधारक असे तो राजकारणात मवाळ व ब्रिटिश धार्जिणा अशी समज असे. कै. श्री. कृ. कोल्हटकर यांनी आपल्या श्यामसुंदर व दुटप्पी की दुहेरी या कादंबऱ्यांतून अशी व्यक्तिचित्रणे रेखाटली आहेत. परंतु खरा सुधारक राजकीय व सामाजिक मतांच्या संबंधात एकाच वेळी सारखाच उग्र असू शकतो, हे स्वातंत्र्यवीरांनी आपल्या कार्याने सिद्ध करून दाखविले. एका बाजूस आत्यंतिक तर्ककर्कश बुद्धिवाद व दुसऱ्या बाजूस भवानीमातेपुढे शपथ घेण्याइतकी भावनावशता; एका बाजूस इंग्रजांचे राज्य शस्त्रबळाने उखडून लावण्याची सिद्धता तर दुसऱ्या श्रुतिस्मृतीस विरोधूनही आपल्यास अभिप्रेत असलेल्या समता-प्रस्थापनेचा उद्योग. एकाच वेळी इंग्रजीसत्ता व स्वकीयांचा समाज या दोन्हीचा विरोध सहन करून तो पचविण्याचे विलक्षण धैर्य स्वातंत्र्यवीरांमध्ये होते. आणि या सर्वांचा स्थायीभाव केवळ हिंदुराष्ट्रहित हाच होता. याचसाठी त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्याचा क्षणन् क्षण वेचला.

सामाजिक सुधारणांच्या संबंधात स्वातंत्र्यवीरांना विरोध व्हावा हे समजण्यासारखे आहे; पण भाषाशुद्धी

सारख्या निरुपद्रवी प्रश्नांवरही त्यांना विरोध सहन करावा लागला! पण त्याकाळी अनावश्यक परकी शब्दांसाठी स्वातंत्र्यवीरांनी जे स्वकीय प्रतिशब्द सुचविले ते आज अगदी रूढ होऊन गेलेले आहेत. यावरूनच सावरकरांचे त्या संबंधातील कार्य किती यथायोग्य होते ते सिद्ध होते.

## तर्क आणि भावना

प्रस्तुत चरित्राचे स्वरूप एखाद्या वार्ताहराने अनेक घटनांचे प्रतिवृत्त क्रमशः लिहावे असे आहे. प्रायः अलिप्तपणे लिहिण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे. मात्र थोड्याच ठिकाणी लेखक हा अलिप्तपणा सोडून आपले मत देतो व चरित्रनायकाची प्रशस्ती करतो आणि ते अगदी स्वाभाविकही आहे. चरित्रनायकाचे थोरपण स्वतःस पटल्यावाचून सहसा कोणी लेखक त्याचे चरित्र लिहावयास प्रवृत्त होणारच नाही हे उघड आहे. या चरित्रात जसे चरित्रनायकांच्या स्तुतिपर, इतरांनी लिहिलेले, उतारे आहेत तसे त्यांच्या विरोधकांनी लिहिलेलेही उतारे आहेत. त्यामुळे या लेखकाने विरोधकांसही योग्य न्याय दिला असे म्हटले पाहिजे. त्याने विरोधकांसंबंधी कोठेही अपशब्द लिहिला नाही हा संयम वाखाणण्यासारखा आहे.

सावरकरांची राजकीय मते व कार्य मान्य पण त्यांची सामाजिक मते व कार्य अमान्य असे अनेक लोक त्यावेळी होते व आजही आहेत. सावरकरांच्या तर्कांना केवळ तर्कानेच उत्तर देणे फार कठीण आहे इतके त्यांचे विवेचन मूलग्राही असे. पण तर्क आणि भावना यात भावनेचा पुष्कळदा जय होतो असे आपण पाहातो. नव्हे, सद्भावनांची जोपासना समाजस्थैर्यासाठी आवश्यकही असते. 'न बुद्धिभेदं जनयेत्' या गीतावचनासंबंधी लिहिताना दुर्भावनांचा भेद केलाच पाहिजे असे सावरकरांनी लिहिले आहे हे खरे; पण कोणती भावना सद्भावना आहे आणि कोणती दुर्भावना आहे याचा निर्णय कोणी लावावयाचा? व जो तो आपल्या बुद्धीनुसार तो निर्णय करू लागला तर विवाद कायमच राहतील. तरीही सावरकरांनी ते केले. आपल्या सद्‌सद्विवेकबुद्धीशी प्रामाणिक असणे हा जो पुढारी, कार्यकर्ते आणि लेखक यांचा मोठा गुण तो सावकरकरांच्या ठायी पूर्णावस्थेस गेला होता यातच त्यांचे थोरपण साठविले आहे. सावरकरांचे कार्य व वाङ्मय यासंबंधी विवेचन करणे हा या अभिप्राय-लेखनाचा उद्देश नसल्यामुळे, अधिक विस्तार करीत नाही. पण रत्नागिरी पर्वातील स्वातंत्र्यवीर सावरकर, चरित्र लेखकांनी, अगदी यथातथ्य रीतीने वाचकांसमोर उभे केले आहेत एवढे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे. मधून मधून सावरकरांच्या लेखांतील योग्य अवतरणे येत असल्यामुळे चरित्रनायकाची वाङ्मयीन मूर्तीही वाचकांसमोर उभी राहते.

जी रोटीबंदी तोडण्यासाठी रत्नागिरी येथे सावरकरांनी अविश्रांत परिश्रम केले ती आता प्रायः तुटली आहे. नगरे

व यांत्रयुगीन संस्कृती यामुळे आता सार्वजनिक ठिकाणी कोणीही रोटीबंदी मानीत नाहीत. अस्पृश्यता घटनेने तर नाहीशी झालीच; पण व्यवहारातही ती नष्टप्राय झाली आहे. आता कोणत्याही विद्यालयातून मुले सरमिसळ बसतात; त्यांच्या जातीची चौकशीही कोणी करीत नाही. बाटलेल्यास शुद्ध करून घेण्यासाठी कोणीही विरोध करीत नाही. केवळ जन्माने आता कोणासही श्रेष्ठ-कनिष्ठता मिळेनाशी झाली आहे. हे सर्व सावरकरादी समाजसुधारकांना अभिप्रेत असेच घडले आहे. यासाठी जसे त्यांचे परिश्रम, त्यापेक्षाही परिस्थिती, अधिक कारणीभूत झाली आहे. पण इतके घडूनही समाजैक्य साधले काय आणि जाती खरोखर मूळात नष्ट झाल्या काय असा विचार मनात आला म्हणजे मन विषण्ण होते. केवळ खानपानात जात नष्ट झाली व निवडणुकीत ती टिकली तर आपण प्रगती केली असे होत नाही. जात म्हणजेच जन्म. या जातींचे मूळ गवताप्रमाणे भारी चिवट आहे आणि निवडणुकीचा पाऊस पडला की ती पुनः पुन्हा तरारून येते. शेवटी जात नाही ती जात, अशीच व्याख्या करावी लागते. आपण धर्म बदलू शकतो पण जात बदलू शकत नाही अशी परिस्थिती आहे! तरीही सहभोजनादिकांमुळे जन्मजात श्रेष्ठकनिष्ठत्व नष्ट होते असे त्यांना प्रामाणिकपणे वाटते. त्यांच्या त्या प्रयत्नांची स्तुतीच केली पाहिजे. जातिभेदापेक्षाही जातिद्वेष नष्ट होणे आवश्यक आहे व त्या द्वेषाची कारणे जातीहून भिन्न क्षेत्रांत शोधावी लागतील. काही लोक जातिभेद न म्हणता जातिव्यवस्था म्हणतात त्याचाही गंभीरपणे विचार झाला पाहिजे सध्या तरी श्रेष्ठ-कनिष्ठ ही भावना राजकीय पक्ष व तदाश्रित अधिकार यामुळे पूर्वीच्या जातिभेदापेक्षाही अधिक वाढीस लागली आहे व त्यातूनच नव्या दलितांचा नवा वर्ग सिद्ध होऊ लागला आहे. नव्या सुधारकांना या दलितांच्या उद्धाराकडे या पलीकडे लक्ष द्यावे लागेल असे वाटते.

समाज संघटनेसाठी किती परिश्रम घ्यावे लागतात, व किती अवधाने सांभाळावी लागतात याचे चित्रण लेखकांनी अत्यंत बारकाईने केले आहे.


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन
पुणे ३०.

त्याचप्रमाणे सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीतही खरा द्रष्टा आणि कार्यकर्ता पुरुष स्वस्थ न बसता अंतिम ध्येयास सर्वस्वी पोषक असे केवढे मौलिक कार्य करू शकतो हेही लेखकांनी, तसे तात्त्विक विवेचन न करताही, दाखविले आहे. 'क्रियासिद्धीः सत्त्वे भवति महतांनीच करणे' हे सुभाषित स्वातंत्र्यवीरांनी आपल्या कृतीने सिद्ध करून दाखविले याची प्रचीती ठिकठिकाणी येईल अशीच चरित्रलेखनाची योजना आहे व त्यात लेखक शतप्रतिशत यशस्वी झाले आहेत.

साहित्याच्या दृष्टीने या चरित्राचे मूल्य ठरविण्याची आवश्यकता नाही. चरित्रलेखकाचा तो उद्देशही नाही. हे साधेसुधे क्रमवार कथन आहे. भाषा सोपी, सरळ आणि साधी आहे. कोठेही बुद्धया भावनावशता आली नाही. कोठेही लेखकाचा तोल सुटला नाही हे त्यास भूषणावह आहे.

ह्या ग्रंथ म्हणजे संकल्पित चरित्राचा प्रथम खंड आहे. 'हिंदुत्व रक्षणार्थ दिलेला लढा १९३७ ते १९४७' व 'गांधीवध नि नंतर १९४८ ते १९६६' हे दोन खंड बाहेर पडावयाचे आहेत. तेही खंड प्रस्तुत प्रथम खंडाप्रमाणेच रोचक होतील अशी अपेक्षा वाचकांच्या ठिकाणी लेखकांनी अवश्यच निर्माण केली आहे. ते काम त्यांनी अचिरात् पुरे करावे असा आग्रह आहे. सावरकरांच्या रत्नागिरी कार्याचे हे दर्शन लेखकांनी मोठ्या समर्थपणे वाचकांस करून दिले व त्यामुळे तरुण कार्यकर्त्यांस विधायक कार्याची नवी स्फूर्ती व दृष्टी दिली यासाठी लेखक श्री. बाळाराव सावरकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

पुस्तकात स्वातंत्र्यवीरांच्या लेखांची सूची दिली त्यामुळे उपयुक्ततेत भर पडली आहे. दर्शनी व इतरही चित्रे चांगली आहेत. प्रत्येक पृष्ठात त्यातील विषयास अनुसरून स्वतंत्र शीर्षके दिली असल्यामुळे वाचकांची फार सोय झाली आहे. पुढील खंडही असेच राहतील हे उघड आहे. ◻

हिंदुसमाज संरक्षक
स्वातंत्र्यवीर सावरकर
(रत्नागिरी पर्व)
ले. बाळाराव सावरकर
प्र. वीर सावरकर प्रकाशन
सावरकर सदन,
७१ शिवाजी उद्यान, मुंबई २८
मूल्य १५ रुपये
(पृष्ठे ८+३९६+१८)



चालू लेखमाला

जबानी चौथी । शेवटचो हप्ता सहावा

लेखक : नारायण सान्याल
अनुवादक : अशोक शहाणे

# मी नेताजींना बघितलंय

दोन दिवसांत सगळ्या टापूची प्रत्यक्ष पाहणी करून जनरल शहानवाजखान पंचवीस फेब्रुवारीला परत मिकटिल्याला आले. त्यांनी सगळी हकिगत नेताजींना सांगितली.

पोपा न् काडकपाडांगबद्दल ते सांगत होते तेव्हा मी पण तिथंच होतो. जरा दूर उभा होतो. रात्रीची बाराची वेळ असेल ती. आकाशभर चांदणं होतं. मोकळ्यावर ह्या दोघांची चर्चा चालली होती. उत्तरेला न् पश्चिमेला तोफा न

मशिनगन्सचा घूमधडाका चालला होता. त्याचा निव्वळ आवाजच नाही तर त्याची चक्क आग पण आम्हाला दिसत होती.

म्हंजे कोणत्याही क्षणी ब्रिटिश रणगाडे इथं यायची शक्यता होती. मग मिकटिला न् नेताजी दोघांचाही त्यांनी कब्जा घेतला असता. कर्नल महबूब न् शाहनवाज फिरूनफिरून नेताजींना म्हणत होते, की आत्ता काही तुम्ही पोपा-टापूत जायची गोष्ट काढू नका. तुम्ही प्यिनमानाला जा. अशी विनंती ते करत होते. नेताजी काहीच उत्तर देत नव्हते. उत्तरेकडे न् पश्चिमेकडे नजर रोखून ते बसून होते. गोळ्यांचा आवाज तिकडनंच येत होता. अन् तोफेतनं गोळा सुटताना उडणाऱ्या ठिणग्या दिसत होत्या.

एवढ्यात एक जपानी अधिकारी आले. त्याचं नाव मेजर ताकाशि.लष्करी सलाम ठोकून मोडक्यातोडक्या इंग्रजीत ते नेताजींना म्हणाले---ब्रिटिश रणगाड्यांनी आमचा व्यूह भेदून प्राइनबिन ताब्यात घेतलंय्. अन् आता ते 'टाँउदा'-वर हल्ला चढवायच्या बेतात आहेत. हे टाँउदा आहे मिक्‌टिल्याच्या वायव्येला. शेवटी ते म्हणाले---टाँउदा न् मिकटिल्याच्या दरम्यान त्यांना अडवायची काहीच व्यवस्था आपल्याकडे नाही!

त्या चांदण्यात मी पाह्यलं---शहानवाजखान तत्काळ उठून उभे राह्यले.

म्हणाले—नेताजी! टाँउदा इथनं अवघं चाळीस मैलांवर आहे! ह्या चाळीस मैलांच्या वाटेत शत्रूच्या रणगाड्यांना थोपवून धरायला कुणीच नाही! एवढं अंतर कापायला त्यांना सहा तास लागतील! आत्ता साडेबारा वाजलेयत! सूर्य उगवायच्या सुमारालाच ते येऊन धडकतील इथं! आता मात्र मी तुमचं काहीएक ऐकणार नाही! तुम्ही आत्ताच्या आत्ता इथनं निघायला हवं!

नेताजी म्हणाले---कुठं? पोप्पाला?

---पोपा?

शहानवाजखान दचकलेच. पोपा म्हंजे मिकटिल्यापेक्षा आघाडीच्या भागात!

मग चक्क विनवणी करत शहानवाजखान म्हणाले---नेताजी! तुम्ही सगळ्याच बाबतीत माझ्यापेक्षा मोठ्ठे आहात! वयानं, ज्ञानानं, थोरवीनं, देशप्रेमानं---कोणत्याच बाबतीत तुमच्या पायाशी उभं राह्यचीपण लायकी नाही माझ्यात! पण तरी मी म्हणेन, आज तुम्ही स्वार्थी माणसासारखं करायला पहाताय्! निव्वळ शौर्य दाखवण्याकरता म्हणून तुम्ही स्वतःचा जीव धोक्यात घालायला पहाताय्! पण एक गोष्ट तुम्ही विसरून गेलायत! तुमचा जीव काही तुमच्या मालकीचा नाही! तो तुम्ही आधीच देशावरनं ओवाळून टाकलायत! मी ह्या रणांगणातला सेनापती आहे! तुमचा जीव म्हंजे माझ्यावर सोपवलेली ठेव आहे! सबंध भारत एक दिवस मला जाब विचारेल ह्या गोष्टीचा! ह्याच क्षणी जर तुम्ही मिकटिला सोडून दक्षिणेला जाण्याकरता निघाला नाहीत, तर मी शपथे-

वर सांगतो नेताजी—ह्याच क्षणी मी आत्महत्या करून टाकीन! तुम्हाला त्यांनी कैद केलेलं उघड्या डोळ्यांनी बघवायचं नाही मला!

अन् लगोलगच कर्नल शहानवाजनी कंबरेच्या पट्ट्यातनं रिवॉल्वर काढलं!

मग नेताजीपण उठून उभे राहिले. वज्रासारख्या गंभीर आवाजात म्हणाले —कर्नल! तू सैनिक आहेस! ह्याच्या-बद्दल भारतानं जर कधी तुला जाब विचारलाच, तर तू सांग—सुभाषचंद्र बोस आमचे सरसेनापती होते! माझे नेताजी होते! त्यांच्या जिवापेक्षादेखील एक सैनिक म्हणून त्यांची आज्ञा पाळणंच माझ्या दृष्टीनं महत्त्वाचं होतं! असा जाब तू देशाला दे!

शहानवाजखाननी हलकेहलके रिवॉल्वरात काडतुसं भरली! फिकट चांदण्यात त्यांचा चेहरा काही मला दिसत नव्हता. पोलादासारख्या मजबूत अशा त्या सेनापतीच्या दोन्ही गाला-वरनं आसवांच्या धारा लागल्या होत्या. का नाही, ते समजायला काही मार्ग नाही.

नेताजी त्यांच्या खूप जवळ उभे होते. मर्मभेदी मानसिक वेदनांनी शहानवाजखान कसे तडफतायत ते नेताजींना नक्कीच दिसलं असेल.

शहानवाजखानच्या खांद्यावर हात ठेवून नेताजी म्हणाले—तू माझी इतकी काळजी करू नकोस दोस्ता! ह्या सुभाष बोसला मारून टाकता येईल असा बाँब इंग्लंडला अजून तयार करता आलेला नाही!

ह्या गोष्टीवर आमचा शंभर टक्के विश्वास होता. त्याच दिवशी संध्या-काळी शत्रूच्या साठ बी–२५–एस विमानांनी आमच्या छावणीवर बराच-वेळ बाँबवर्षाव केला होता. त्याच्यामुळं चहूंकडचं सगळंच उद्ध्वस्त होऊन गेलं होतं. इथला पूलपण त्यांनी उडवला होता. पण नेताजींच्या अंगाला साधं खरचटलं देखील नव्हतं.

पण हे मधेच सांगितलं, ना?

तर नेताजींनी पोपा—रणांगणावर जायची लगेच तयारी करायला सांगितलं. आयुष्यात हे एकदाच नेताजींचा विश्वासघात करायच्या कटात आपणपण भाग घेतला—असं शहान-वाजखाननी आपल्या आठवणीत लिहून ठेवलंय्!

त्यांच्याच शब्दात—

'त्यांनी पोप्याला जाऊ नये म्हणून आम्ही खूप प्रयत्न केला. पण कसचं काय! एकदा त्यांनी काही निर्णय घेऊन टाकला की मग त्या संकल्पाला ते मुळीच ढळायचे नाहीत. पण अशा परिस्थितीत नेताजींनी पोपा-रणांगणा-कडे जाणं किती भयंकर धोक्याचं आहे हे आमच्या सगळ्यांच्याच ध्यानात येऊन चुकलं होतं.

'पण काय करावं, काही उमजत नव्हतं! त्यांना कसं नाही म्हणायचं? शेवटी नेताजींचे ॲडज्युटंट मेजर रावतांनी एक बेत केला.

'रात्रीचे दोन तर वाजलेच होते. मिकटिल्याहून निघायला जर काहीही करून दोन तासांचा उशीर लावता

आला, तर मग दिवस उजाडेल. म्हंजे मग निदान त्या दिवसापुरतं तरी नेताजींचं जाणं टळेल'—असा मेजर रावतांचा बेत होता.

'पहिल्यांदा मला वाटत होतं,नेताजींनी ताबडतोब निघावं. सुरक्षित आसऱ्याच्या जागी म्हंजे दक्षिणेला जावं. पण नेताजींनी नेमका ह्याच्या उलटा संकल्प जाहीर केला— म्हंजे लढाईच्या आणखीच पुढं आघाडीवर जायचा—तेव्हा मग आम्हाला वाटायला लागलं, की ह्यांचं जाणं जितकं लांबणीवर टाकता येईल तितकं बरं. उद्या कदाचित् नेताजींना राजी करून घेता येईल— दक्षिणेकडे, प्यिनमानाला जायला.

असा विचार करून मेजर रावत मुद्दामच उशीर लावत गेले.

'इकडे नेताजी निघायची घाई करतायृत. पण मेजर रावतांचं एक अर्जंट पत्र काहीकेल्या टाइप करून होतच नाहीय्! शिवाय नेताजींच्या ड्रायव्हरला त्यांनी कटात सामील करून घेतलंय्. गाडीच्या इंजिनात काहीतरी बिघाड झालाय्!

'नेताजी पोप्याला जाण्याकरता उतावळे झालेयृत, त्यामुळं निघायला उशीर लागतोय् असं बघितल्यावर ते चिडतायृत. पण ड्रायव्हर न् मेजर रावत ह्यांनी आव तर आणलाय् की लौकरात लौकर निघता यावं म्हणून आपण खरंच धांदलीनं कामं उरकतोय्!

'असं करता करता पाच वाजले! माझ्या लक्षात आलं की चला, किमान एका दिवसापुरतं तरी नेताजींना लढाईपास्नं किंचित् का होईना पण सुरक्षित जागी राखता आलं!

'मग सकाळी साडेपाचला नेताजींना खूप विनवून-विनवून शेजारच्या गावातल्या एका झोपडीत झोपायला पाठवलं.'

नेताजी झोपलेयृत. सातची वेळ असेल. जपानी ऑफिसर मेजर ताकाशी परत एकदा आले. म्हणाले—अत्यंत महत्त्वाची बातमी आहे!

त्यांना लगेचच नेताजींची भेट हवी होती. मी म्हणालो—नेताजी रात्रभर जागे होते. ते आत्ताच कुठं झोपलेयृत. तुम्ही आमच्या कॅमांडंटला भेटलात तर—

माझं वाक्य संपायच्या आतच ट्रेंचच्या पलीकडनं कर्नल शहानवाजखान आले.

मेजर ताकाशी त्यांना म्हणाले— आत्ताच अशी बातमी मिळाल्याय् की ब्रिटिश रणगाड्यांनी मिकटिल्याहून मंडालेला जाणारी न् काउकपाडांगला जाणारी — अशा दोन्ही सडका बंद करून टाकल्यायृत. तासाभरापूर्वी तरी रंगूनला जायची वाट मोकळी होती. आत्ता काय परिस्थिती आहे कोण जाणे! तुम्ही नेताजींना घेऊन लगेचच निघा!

शहानवाजनी विचारलं— ब्रिटिश सैन्य किती अंतरावर आहे असं तुम्हाला वाटतंय्?

—पश्चिमेकडे ते किती अंतरावर आलेयृत ते मला ठाऊक नाही. पण उत्तरेकडनं — म्हंजे म्यिनजानकडनं —

जी तुकडी येतेय्, तिनं टाँउदा ओलांडून आज सकाळी सहा वाजता महालेपण ताब्यात घेतलंय्.

मेजर ताकाशींनी नकाशा बघितला. अन् ते म्हणाले— तीसेक मैलावर असतील ते!

म्हंजे आत्ता नेताजींची झोपमोड करण्यावाचून इलाजच नाही, हे शहानवाजखानच्या लक्षात आलं. वाटेत काही अडथळा न होता तीस मैलांचं अंतर तोडायचं तर शत्रू दोनेक तासातपण इथं येऊन धडकेल.

पण नेताजींना उठवावं लागलंच नाही. ते स्वतःच उठून बाहेर आले. थोडक्यात त्यांनी एकदम अलीकडची परिस्थिती समजवून घेतली. ते ब्रीचेस न् टॉपबूट घालूनच झोपले होते बहुतेक. कारण कपडे चढवून मग बाहेर आल्यासारखे काही वाटले नाहीत ते.

शहानवाज म्हणाले— आता क्षणाचाही उशीर करून चालायचं नाही सर. जसे असाल तसेच बाहेर पडा. आता एकच तेवढी वाट मोकळी आहे— प्यिनमानावरनं रंगूनकडे जाणारी!

डोक्यावरची टोपी नीट करता करता नेताजी म्हणाले— पण काल रात्री तर आपलं असं ठरलं होतं की उद्या सकाळी पोप्याला जाऊन धीलनची हालत स्वतःच्या डोळ्यांनी बघायची म्हणून!

आत्यंतिक निराशेनं शहानवाजखाननी खांदे उडवले. म्हंजे नेताजींच्या प्रश्नाचं काहीच उत्तर नाही! पण मेजर ताकाशींनी उत्तर दिलं. सॅल्यूट करून ते नेताजींना म्हणाले— काल रात्री हेडक्वार्टर्सहून ही महत्त्वाची तार आल्याय्!

—काय आहे तारेत? वाच बरं!

शहानवाजनी तार वाचली. रंगूनहून जनरल कियानी न् जपानी सैन्याचे कमांडर-इन-चीफ दोघांची मिळून तार होती— नेताजींनी आपल्या पर्सनल स्टाफला बरोबर घेऊन तावडतोब रंगूनला यावं!

नेताजींनी दहा सेकंद विचार केला. मग म्हणाले— ठीक आहे! मी निघतो! तशी व्यवस्था करा.

घाम येऊन ताप निघाल्यासारखं झालं शहानवाजना. माझ्याकडे वळून ते म्हणाले— पधरा मिनटांच्या आत आपल्याला निघायला हवं! सगळ्यांना तसं सांग!

मी धावतच निघालो.

दहा मिन्टांच्या आत आम्ही सगळे 'पिठू' घेऊन, हातात रायफल घेऊन फॉल-इन झालो.

तरी गाडीची मुश्कीलच होती की! मोटार एकच होती. तिच्यात ड्रायव्हरखेरीज जास्तीतजास्त चारजण मावणार! नेताजींच्या पर्सनल स्टाफमध्ये वीसजण! शिवाय आमचेपण लोक आहेतच. आता ह्यांच्यातल्या कोणत्या तिघांनी नेताजींच्या बरोबर जायचं? ही निवड करणं मोठं कठीण होतं. आम्ही रांग करून उभे होतो. जीप आली. नेताजींची बॅग आत ठेवली.

शहानवाजनी नेताजींना विचारलं— कोणकोण जागार' तुमच्याबरोबर? सांगा!

म्हंजे ही निवड करायची जबाबदारी ते स्वत:वर घ्यायला तयार नाहीत !

नेताजींनी मात्र क्षणाचाही वेळ घेतला नाही.

ते म्हणाले--मेजर ताकाशी येतील, कर्नल राजू, अन्...तू येणार का ?

शहानवाज म्हणाले--सेनापती ह्या नात्यानं पोपा अन् काउकपाडांगकडे जाणं हेच माझं कर्तव्य आहे ! आहे ह्या परिस्थिनीत मी त्यांच्याजवळच असायला हवं !

नेताजी म्हणाले—पण आत्तासुद्धा आपल्याला कदाचित् वाट काढतच, लढत लढतच जावं लागेल. कर्नल राजू आहेत डॉक्टर. मेजर ताकाशी आहेत लायाझाँ ऑफिसर. तेव्हा निदान एक-तरी लढवय्या शिपाई माझ्याबरोबर असायला हवा. तर—नको ! तूच चल ! रंगूनपर्यंत नको. मला प्यिनमानाला पोचवून तू परत ये !

शहानवाज म्हणाले—बरं ! मग चला.

—पण ड्रायव्हर म्हणून कोण येणार ? माझा ड्रायव्हर आहे तो ड्रायव्हर म्हणून चांगलाच आहे, पण तो काही चांगला लढवय्या नाही. तुझ्या-जवळ असा कुणी आहे जो गाडीही चालवेल अन् वेळ पडली तर गोळीपण चालवेल ? परत गाडी बिघडली तर काही दुरुस्तीपण करून टाकेल—असा कुणी ?

—हो ! आहे सर ! लेफ्टनंट हरगोविंदसिंग !

मी एक पाऊल पुढं येऊन सॅल्यूट केला.

नेताजींच्या भिवया वर गेल्या. म्हणाले—कौन हो तुम ?

मी परतएकदा सॅल्यूट करून म्हणालो —मैं सेवक इ-नेताजी हूँ, नेताजी !

--अरे ! तू तर ओळखूच आला नाहीस की मला ! तुझ्या दाढीमिशा अन् डोक्यावरचं जंगल—

मेजर ताकाशी म्हणाले--प्रत्येक क्षण मोलाचा आहे सर !

—बरोबर ! अच्छा, चल ! तूच घेऊन चल माझी गाडी !

शक्यतितके हातबाँब अन् काडतुसं गाडीत घेतली. हे सगळं चाललेलं असतानाच अन्वरनं माझा हात दाबला. म्हणाला—कुछ फिकीर मत करो दोस्त ! फिर मिलेंगे हम दोनो !

संकटांनी भरलेला हा रस्ता सुरक्षित पार होण्याची फारच थोडी आशा आम्हाला होती. शिवाय अन्वर आणखी कदाचित् तासाभरातच कैद होऊन जाईल, किंवा लढाईत प्राण गमावेल ! त्यामुळं त्यांचं हे 'फिकीर मत करो दोस्त फिर मिलेंगे हम दोनो !' म्हणणं मला तरी निव्वळ थट्टाच वाटली. त्याच्यामुळंच काही बोललो नाही मी. खरं म्हंजे कुणीच काही बोलत नव्हतं. सगळ्यांना काय वाटतंय् हे प्रत्येकालाच ठाऊक होतं.

आमच्या रेजिमेंटनं निरोपाचं लष्करी अभिवादन केलं. मी गाडी स्टार्ट केली. आठ वाजले होते. झाडामधनं कवडसे येऊन उन्हानं रस्त्यावर रांगोळी घातली होती. वळणावरनं पाहलं तर ते अजून

अटेंशनमधे उभे होते. इतक्या सगळ्या लोकांच्यातनंपण अन्वरचा चेहरा झटदिशी नजरेसमोरून गेला. खुशीत दिसला तो चांगलाच.

रस्ता कापत जीप दक्षिणेकडे चालली प्यिनमानाकडे. नेताजी अन् कर्नल शहानवाज मागच्या सीटवर बसले होते. नेताजींच्या मांडीवर काडतुसं भरलेली एक टॉमीगन होती अन् शहानवाजखानच्या हातात एक सज्ज ब्रेनगन होती. त्या दोघांच्यामधे कर्नल राजू बसले होते. त्यांच्या दोन हातात दोन हातबाँब. मेजर ताकाशी काही माझ्याशेजारच्या सीटवर बसले नव्हते. ते पायदानावर उभे होते. त्यांच्या हातात होती टॉमीगन. शत्रूचं विमान वगैरे दिसतंय् का काय, ह्याच्यावर ते नजर ठेवून होते. शत्रू काही आम्हांला जिवंतपणी कैद करू शकणार नाही, हे पक्कं होतं तरी आम्हाला सांत्वन एवढंच होतं की नेताजींच्या बरोबर प्राण देण्याची संधी आम्हाला मिळणार होती.

रस्ता भलताच खराब होता. बाँबफेकीमुळे त्याचं काहीच धड राह्यलं नव्हतं तरी मी ताशी पंचेचाळीसच्या वेगानं गाडी चालवत होतो. अंदाजे चाळीस मिनटात आम्ही इंदोला पोचलो.

इथनंच बावीस तारखेला नेताजी मिकटिल्याला परत फिरले होते. इंदो गाव मिकटिल्याच्या दक्षिणेला वीस मैलांवर होतं भलतंच आश्चर्य म्हंजे ह्या चाळीस मिनटांच्या प्रवासात शत्रूचं एकपण विमान आम्हांला दिसलं नाही. वाटेत काही अडथळा पण झाला नाही.

इंदोला पोहोचल्यावर शहानवाजखान म्हणाले—दिवस फार वर आलाय्. आता दिवसा काही पुढं जायला निघणं बरं नाही.

कारण इतकावेळ आम्ही दुतर्फा झाडातन जंगलामधल्या रस्त्यानं आलो होतो. आता सरळ उघड्या माळावरनं प्ययबीकडे रस्ता जातो. गस्त घालणाऱ्या विमानांना ह्या उघड्या रस्त्यावर आम्ही सहज दिसून जाऊ.

तेव्हा उरलेला दिवस इंदोमधेच घालवायचं ठरलं. गाडीतनं उतरून आम्ही काही आसरा शोधतोय, एवढ्यात ब्रिटिशांची दहाबारा लष्करी विमानं गावावर मशीनगन चालवायला लागली. आम्ही येऊन पांचेक मिनिटं झाली होती म्हणूनच वाचलो. विमानातनं होणारी बाँबफेक न् मशिनगनच्या गोळ्या ! उघड्या जागेवर लष्करी विमानांचा हल्ला म्हंजे काय भयंकर चीज असते, हे त्यांच्यात सापडलेलाच जाणे ! वर्णन करून त्याची कल्पना करता येण अशक्य ! काही लष्करी विमानांत बाराबारा मशिनगन्स होत्या. शिवाय आमच्या सैन्यावर वीस किंवा चाळीस मिलिमीटर कार्ट्रिजच्या गोळ्या चालवायलापण ते मागंपुढं पाह्यचे नाहीत. ह्या गोळ्यांचं कार्ट्रिज साधारणपणानं दहा इंच लांब असतं. आगगाडीचं इंजिन किंवा रणगाड्यांचं कवच भेदण्याकरता म्हणून ही वापरायची ! माणसाच्या अंगात काडतुस घुसलं तर सबंध शरीर छिन्नविच्छिन होऊन

जायचं ! प्रेत म्हणूनही काही शिल्लक राह्यचं नाही ! ह्या असल्या गोळ्या आमच्यावर चालवायलापण ब्रिटिश सैन्य मागंपुढं पाह्यचं नाही !

इंदो गावात काही झोपड्या दिसल्या. रिकाम्या. म्हंजे लोक आधीच पळून गेलेले. ह्या झोपड्यांत आम्हाला सबंध दिवस सहज राहता आलं असतं. पण शहानवाजना काही ते पटलं नाही. ते म्हणाले—ह्या असल्या गावात ब्रिटिश हेरांचा सुळसुळाट झालाय्.

म्हणून त्यांनी नेताजींना विनंती केली, की आपण सगळेच हे गाव सोडून जंगलात जाऊ या.

असल्या बाबतीत नेताजी लष्करी नायकाचे आदेश पुरते मानून चालायचे.

ते तात्काळ म्हणाले — चला ! कुठं जायचं ?

गावापास्नं जवळंच एक झाड होतं. त्याच्या सावलीत आम्ही टेकलो. जागा जरा साफसूफ करून घेतली. जीपमधल्या गादया जमिनीवर टाकल्या. नेताजी काही टॉपबूट काढायच्या फंदात पडले नाहीत. ते तसेच आडवे झाले. अर्धं अंग जमिनीवर. मेजर ताकाशी एका दगडावर बसले.

थोडाच वेळ झाला असेल. आमच्या भोवती एक माणूस घोटाळताना दिसला. मला संशय आला.

मी विचारलं—काय पाह्यजे ?

काही न बोलता तो माणूस कटला.

लगेच मी कर्नलना ही गोष्ट सांगितली. शहानवाज नेताजींना म्हणाले —मला त्या माणसाचा संशय येतो. तो ब्रिटिशांचा हेर असेल कदाचित्. चला, आपण इथनं हलू या.

नेताजी लहान पोरासारखे लगेच उठून उभे राह्यले. म्हणाले — चल, आता कुठं जायचं ?

परत सगळं सामान जीपमधे भरून गावापास्नं मैलभर अंतरावर जरा दाट जंगलाकडे गेलो. परत पालापाचोळा साफ करून गाद्या टाकतोय्, एवढ्यांत दिसलं — आधीच्या त्या झाडावर दोन ब्रिटिश विमानं खूप खालनं घिरट्या घालतायत !

नेताजींचं लक्ष तिकडे वेधून कर्नल शहानवाज म्हणाले— हे पहा नेताजी, तुम्हाला हुडकतायत ते !

नेताजी म्हणाले -- वा ! म्हंजे काय ! हुडकणारच की ! किती दिवसा-पूर्वी ताटातूट झाली होती आमची ! अन् भलतेच जिगरी दोस्त ना !

म्हंजे तेव्हा जो इसम घुटमळून गेला होता, तो नक्कीच ब्रिटिश हेर होता. एवढ्यांतच त्यानं बिनतारी संदेश पोचवला होता.

आमचा सबंध दिवस त्या जंगलातच गेला. दहा मिन्टांच्या अवधीतच आम्हाला निघावं लागलं होतं, त्यामुळं खायलाप्यायला काहीच बरोबर घेता आलं नव्हतं. दुपारी मला प्रचंड भूक लागली. सगळ्यांची हालत एकच होती. गावात जाऊन काही खायला मिळतं का ते पहावं, अस मी कर्नलना म्हणालो. पण ते ‘नाही’ म्हणाले. आपण कुठं दडून बसलोय् ते त्यांना कळेल असं त्यांचं म्हणणं पडलं.

जंगलाच्या बाहेरच एक शेत होतं. हरभऱ्याचं. कुणा ब्रह्मी शेतकऱ्याचं असेल. पण बिचाऱ्याला शेतातला हरभरा काही घरात नेता आला नव्हता. जीव घेऊन पळून जावं लागलं असेल आधीच.

शहानवाज म्हणाले—चल हरगोविंद, आपण थोडासा हरभरा आणू या!

तेव्हा मग डिव्हिजनल कमांडर कर्नल शहानवाजखान न् लेफ्टनंट सरदार हरगोविंदसिंग शेतात हरभरा उपटण्यात गुंतून गेले. नेताजी म्हणाले—हवं तर मी पण येतो.

दोन्ही हात जोडून मी म्हणालो—तुम्ही थोडा आराम करून घ्या नेताजी!

बराच हरभरा गोळा करून घेऊन आलो आम्ही दोघं. मोठ्या आनंदानं नेताजींनी हा हरभरा खाल्ला. अन् आम्हीपण. हाय गुरुजी! हेपण बघावं लागलं मला! कच्चा हरभरा खाऊन वेळ भागवून नेतायत आझाद हिंद सेनेचे सरसेनापति—ज्यांची सुवर्णतुला केली होती मलायाच्या व्यापाऱ्यांनी!

हरभरा खाऊन होतोय् एवढ्यात शत्रूची ती दोन विमानं परत एकदा आली. आमचं नशीब म्हणून त्यांना आम्ही दिसलो नाही. तीन वाजायचा सुमार होता.

कर्नल म्हणाले—ह्यांच्या लक्षणावरनं कधीही बाँबफेक करतीलसं. दिसतय्.चला नेताजी, आपण त्या खड्ड्यात जाऊन बसू या.

ह्याही खेपेला नेताजी तात्काळ उठले. म्हणाले—कुठं जायचं, चल!

ते दोघं खड्ड्यात उतरून बसले. मी, मेजर ताकाशी न् डॉक्टर राजू जंगलांत जीपवर पहारा करत बसून राह्यलो.

खड्ड्यात दरम्यान् एक प्रकार घडला. तो मी नंतर ऐकला.

खड्ड्यात बसलेले असताना शहानवाजना एकदम एक विंचू दिसला! काळा विषारी विंचू! पुढं पुढं येत होता!

परत नेमकं तेव्हाच एक लष्करी विमान खाली येऊन इथं घिरट्या घालायला लागलं त्यामुळं हे दोघंही माना खाली घालून गुपचूप बसून राह्यले. विंचू नेताजींच्या गळ्यापास्नं एका इंचावर आला होता! त्याची वाकडी विषारी नांगी नेताजींच्या शर्टाच्या कॉलरला लागत होती! हे नेताजींनापण दिसत होतं! दगडी मूर्तीसारखे ते स्थिर बसून होते. एवढीशीसुद्धा बेचैनी नाही!

मिनिटभरानं शत्रूचं विमान निघून गेलं. मग मात्र लगेच शहानवाज ताड्कन् उभे राह्यले न् त्यांनी विंचू मारून टाकला. म्हणाले—खुदानं वाचवलं आज!

डायरीत शहानवाजखाननी एवढंच लिहिलेलं आहे. आणखी काहीच नाही. पण त्यांनी पुढं असंही जोडलं असतं, की 'नेताजी म्हणाले—हा विंचू काही विलायतेतनं आलेला नाही शहानवाज! विनाकारण चावत नाहीत ते!' तर मला काहीच आश्चर्य वाटलं नसतं.

हळूहळू संध्याकाळचा अंधार दाटून

आला. आता आम्हाला निघायला हवं. पण परत नेताजींनीच हरकत घेतली.

ते कर्नलना म्हणाले—माझं मन फार बेचैन झालंय्! पोपा रणांगणात काय झालं ते न बघता जावंसंच वाटत नाही! त्यापेक्षा, चल, आपण मिकटिल्यालाच जाऊ या परत! दिवस-भरात तिथं झालं तरी काय ते बघू या! तिथं आपले जे काही जवान आहेत, त्यांना हालवायची काहीच व्यवस्थापण न करताच आलोय् आपण!

महापराक्रमी डिव्हिजनल कमांडर कर्नल शहानवाजखानना आता रडूच कोसळेलसं वाटलं! ह्या इंदो गावातनंच नेताजी आधीपण एकदा मकटिल्याला परत फिरले होते. मिक्टिला न् इंदो ह्या दोन गावाच्यात ही गाडी काय 'शटल-सर्विस'सारखी जा-येच करत राहणार का काय सारखी?

खूप विनवण्या करून त्यांनी नेताजींना राजी केलं. नेताजींना घेऊन शहान-वाजनी पहिल्यांदा प्यिनमानाला जायचं असंच ठरलं. तिथं नेताजी, डॉक्टर राजू न् जपानी अधिकाऱ्याला उतरवून मी कर्नलसाहेबांना घेऊन परत मिकटिल्याला यायचं. तिथला सगळा बंदोबस्त करून रात्र उलटायच्या आत शहानवाजनी परत प्यिनमानाला नेताजींच्याकडे जायचं. असं सगळं ठरलं.

नेताजी, वगैरेंना प्यिनमानाला पोचवून आम्ही दोघं रात्री अकरापर्यंत मिकटिल्याला परतलो. येऊन पाह्यलं तर मिकटिल्याच्या आसपास तुमुळ लढाई चाललेली! छावणीत आल्यावर अन्वरभाईची गाठ पडली. तो अजि-बातच गांगरलेला नव्हता. मला म्हणाला—पाह्यलंस, किती लौकर परत भेट झाली आपली!

आमच्या तुकडीतल्या उरलेल्या जवानांची प्यिनमानाला जायची व्यवस्था करण्यातच रात्र गेली. त्याच रात्री आम्ही परत प्यिनमानाला निघालो. ह्या खेपेला आमच्या गाडीत आणखीही काहीजण होते. अन्वरभाई, कॅप्टन खान महंमद न् कॅप्टन बागडी! खान महंमद न् बागडींची न् माझी आधीपास्नंच ओळख होती. निडर, धाडसी, लढवय्ये होते दोघंही. जन्मात विसर पडायचा नाही त्यांचा. कॅप्टन बागडीं वीराप्रमाणे झगडले आपल्या तुकडीचं रक्षण करण्याकरता न् लढता-लढताच देह ठेवला त्यांनी! ब्रिटिश रणगाड्यासमोर—

पण जाऊ दे. मी गोष्टीचं सूत्रच हरवून बसेन अशानं. मी काय सांगत होतो?

हां! तर त्यांना घेऊन रात्रीच्या शेवटच्या प्रहरी आम्ही प्यिनमानाला चाललो होतो. प्यिनमानापास्नं नऊ मैल अलीकडे एका छोट्या छावणीपाशी सेनापतींच्या हुकमावरनं मी गाडी थांबवली. गावाचं नाव होतं इमेथिन. आमच्या दोन नंबरच्या इस्पितळानं इथंच छावणी टाकली होती. दोन नंबरच्या म्हंजे आधी मनेवाला असलेल्या. इमेथिन म्हंजे छोटी-छोटी बांबूंची बनं. त्यातच तीन मैल आगेवर

विखरून इस्पितळ होतं.

रात्रीच्या त्या शेवटच्या प्रहरातसुद्धा एक बंगाली डॉक्टर रोग्यांची सेवा-शुश्रूषा करत होते. आमची गाडी थांबताना बघून डॉक्टर पुढं आले. गाडीत कुणी जखमी आहे का म्हणून त्यांनी विचारलं.

कर्नल म्हणाले—नाही, जखमी नाही कुणी. पण तहानलेले मात्र आहेत!

डॉक्टरांनी कर्नलना ओळखलं. मग लष्करी सॅल्यूट करून ते लगेचच आमच्याकरता उकडलेले हरभरे न् थंड पाणी घेऊन आले.

कर्नलनी इथली खबरबात विचारली.

डॉक्टरांना इथं प्रत्येक गोष्टीचीच चणचण आहे हे आम्हाला ठाऊकच होतं. अन्न, पाणी, रसद—सगळीच. पण ते काही बोलले नाहीत त्याच्याबद्दल.

—औषधं मिळत नाहीय्‌त पुरेशी!

एवढंच फक्त ते म्हणाले.

मी डॉक्टरांना म्हणालो—मला एक बादली पाणी लागेल.

डॉक्टर रँकनं कॅप्टन होते. ते माझ्याकडे बघतच राहिले.

मी म्हणालो—माझ्याकडे असं बघू नका. मला बादलीभर पाणी काही प्यायला नकोय्‌. जिपचं इंजिन गरम होऊन गेलंय्‌ म्हणून—

डॉक्टर एकदम हसायला लागले.

म्हणाले—नाही नाही! मी काही तुमच्याकडे त्याच्यामुळं बघत नव्हतो! पण तुम्हाला कुठंतरी बघितलंय्‌ असं वाटतंय्‌!

—हो! तेव्हा दाढीमिशा होत्या मला! तुम्ही छामोलला बघितलं होतंत मला. खानजोलला घेऊन जाण्याकरता काही औषधं दिली होतीत तुम्ही माझ्याकडे. तुम्ही कॅप्टन बोस ना?

—हो! सत्येंद्रनाथ बोस.

प्यिनमानाला आल्यावर नेताजींची गाठ पडली. एवढ्यातच नेताजींनी पुढच्या कामाचा एक आराखडा तयार करून टाकला होता! शत्रूचं सैन्य प्यिनमानाला आलं तर मग काय करायचं त्याची ती योजना होती.

त्यावेळची लढाईची परिस्थिती बघून असं वाटत होतं की, ब्रिटिश सैन्य भलत्याच वेगानं मिकटिल्याहून प्यिनमानाला न् टांगूला येईल. तेव्हा नेताजींची योजना अशी होती की, एक नंबर डिव्हिजनमधल्या उरलेल्या धडधाकट सैनिकांना घेऊन तातडीनं एक नवीन रेजिमेंट तयार करावं. तूर्त त्याला एक्स-रेजिमेंट म्हणू या. कर्नल ठाकूरसिंग ह्या एक्स-रेजिमेंटचे कमांडर असतील. कर्नल ठाकूरसिंग हे फार धाडसी लढवय्ये होते. मणिपूरच्या लढाईत ते शहानवाझखानचे सहकारी कमांडर होते. हे नवं रेजिमेंट घेऊन कर्नल ठाकूरसिंगनी प्यिनमानाच्या उत्तरेला इमेथिनला जावं. तिथं स्वसंरक्षणात्मक व्यूह रचून शत्रूची वाट पहावी. नेताजींचा आदेश होता—शेवटचा सैनिक पडेपर्यंत हे रेजिमेंट लढत राहील! काही झालं तरी ते माघार घेणार नाहीत.

उरलेल्या जखमी न् आजारी सैनिकांना आणखी दहा मैल दक्षिणेला

हलवावं, अशी नेताजींची सूचना होती. तिथं त्यांची छावणी खोलावी. एक्स-रेजिमेंटचा व्यूह भेदून ब्रिटिश सैन्य इथं येऊन पोचलं तर त्यांनी काहीच प्रतिकार करू नये. त्यांनी आत्मसमर्पण करावं. ह्या उरलेल्या सैन्याचं नेतृत्व असेल कर्नल आर. एस. अर्शादकडे.

डॉक्टर म्हणून ह्या एक्स-रेजिमेंट-बरोबर मेजर एस. पी. मिश्र, कॅप्टन चाणके, लेफ्टनंट राव न् लेफ्टनंट प्रचारकर गेले. आमच्या गांधी रेजिमेंटचे मेजर अलीअकबरखान गेल्याच वर्षी वारले होते. ह्या गांधी रेजिमेंटचे आणखी दोन डॉक्टर तेव्हा इथ होते. वीरेन राय न् कानाई दास. शिवाय सत्येन बोस. ह्या तिघांनी ह्या उरलेल्या सैन्याची जिम्मेदारी घेतली.

त्याच रात्री ह्या सगळ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक बैठक नेताजींच्या-बरोबर आमराईच्या अंधारात भरली. नेताजींनी प्रत्येकाला आपापलं कर्तव्य समजावून सांगितलं.

त्यावेळी बोलताना नेताजी म्हणाले—मरण तर तमाम जिंदगीभर आयुष्याच्या मागोमाग फिरतच असतं. तेव्हा मरणाचा विचार करून आपण काळजीत कशाला पडायचं? जपानी आक्रमणाच्या भीतीनं ह्या ब्रह्मदेशातनंच पाच लाख भारतीय एकदा पळून जायला बघत होते. त्यांच्यातले चार लाख लोक तर वाटेतच मेले. त्याच्यामुळं कुणाला काय फायदा झाला? पण त्याच्या शंभराव्या हिश्श्यानं आपण जी आझाद हिंद सेना उभी केलीय्, त्यातल्या प्रत्येक सैनिकानं जर ह्या ब्रह्मदेशाच्या जंगलातच ब्रिटिशांच्या विरुद्ध लढताना प्राण वेचला, तर आपण नक्कीच विजयी होऊ! नाही, तुम्ही गैरसमज करून घेऊ नका! कदाचित् अशाप्रकारे प्राण वेचूनदेखील आपल्याला शत्रूची आगेकूच थोपवता यायची नाही. पण आपलं अंतिम ध्येय त्यांना थोपवण्याचं नाहीच मुळी! आपलं अंतिम ध्येय आहे भारताला स्वतंत्र करण्याचं! हे जंगल जर आझाद हिंद सेनेच्या सैनिकांच्या रक्तानं लालीलाल होऊन गेलं, तर चर्चिलची काय बिशाद आहे तरीही भारत बळकावून बसायची! शहीदांचं रक्त कधी वाया जात नाही! मी निश्चितपणानं सांगतो की आपण जर आदर्शापास्नं भ्रष्ट झालो नाही तर मग आपल्याला ब्रिटिश सैन्य थोपवता येऊ दे की न येऊ दे—पण भारत स्वतंत्र होणारच होणार! लढाईच्या शेवटी जेव्हा हा पोलादी पडदा वर जाईल, तेव्हा भारताला कळून येईल की आपण ह्या लढाईत प्राण वेचला तो काही जपानी लोकांच्या बऱ्याकरता नव्हे! अन् ही गोष्ट आपल्या देशबांधवांना कळली तर त्याचा काहीच परिणाम व्हायचा नाही असं तुम्हाला वाटतंय्? लढाईच्या आधीपण मी हेच म्हणालो होतो अन् आत्ताही माझं तेच म्हणणं आहे-—तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो!

नेताजींचं बोलून झाल्यावर ऑफिसरांच्या वतीनं कर्नल ठाकूरसिंग उभे राहून अत्यंत थोडक्यात म्हणाले—-नेताजी! मैं फौजी हूँ! ज्यादा बाते

मुझे नहीं आती ! सबही अफसरों की तरफ से मुझे एक बात कहना है — हम आपकी आँखे किसीके सामने नीची नहीं होने देंगे !

एवढंच म्हणून ठाकूरसिंग बसले. अन्वर माझ्या शेजारीच होता. अचानक त्यानं माझा हात घट्ट पकडला. ठाकूरसिंगनी आमच्या प्रत्येकाच्या मनातली गोष्टच सांगितली होती !

मग कर्नल शहानवाज उभे राह्यले. म्हणाले--नेताजी ! आमच्या सगळ्यांच्या मनची गोष्ट कर्नल ठाकूरसिंग बोललेच आहेत. ही कामाची माणसं, ह्यांना काहीच धड बोलता येत नाही. पण आज इथं जमलेल्या प्रत्येक सैनिकाचं काळीज फाडून टाकणारी गोष्ट त्यांनी फार सुंदरपणानं सांगितलेली आहे. आता ह्याच्यावर आणखी काही बोलणं शक्यच नाही. तरीपण ह्यांच्यातर्फे मी तुम्हाला आणखी एक गोष्ट सांगतो — तुम्ही जो आदेश दिलाय्त, त्यातलं अक्षर न् अक्षर पाळलं जाईल. पण आमची एक नम्र विनंती आहे. तुम्ही आत्ता प्यिनमानाला राहू नका ! तुम्ही लौकरात लौकर रंगूनला जा. तिथनं तुम्ही आझाद हिंद सेनेच्या तिन्ही डिव्हिजन्सना आदेश देत रहा. शेवटचा सैनिक पडेपर्यंतची ही लढाई नेत्याच्या अभावानं मधेच थांबून जायला नको !

नेताजी राजी झाले.

त्या दिवशी रात्रीच शहानवाजखान नेताजींना घेऊन रगूनकडे गेले. नेताजींना तिथं पोचवून ते तडक पोपा रणांगणांकडे परतणार होते. बाकीचे सगळेच ठाकूरसिंगच्या किंवा अशीदच्या नेतृत्वाखाली तिथंच राह्यले. मिकटिल्याहून आलेले आम्ही पंधराजणच तेवढे पोप्याला परतलो. ह्या पंधराजणात मी होतो, अन्वर होता, कॅप्टन बागडी हो अन् कॅप्टन खान महंमद होते.

ती रात्र मी आयुष्यात विसरणार नाही ! नेताजी आमचा निरोप घेऊन जिपनं रंगूनकडे रवाना झाले. तारीखपण लक्षात आहे माझ्या आजदेखील. एकोणीसशे पंचेचाळीस सालची एक मार्च. तेच नेताजींना मी शेवटचं बघितलं.

आमराईतली बैठक संपल्या संपल्या शहानवाज म्हणाले—तर मग आपण आत्ताच निघू या !

ठाकूरसिंग म्हणाले--थोडं काहीतरी खाऊन घ्या. परत वाटेत काही मिळेल, नाही मिळेल !

नेताजींनी विचारलं—ह्यांचं जेवण झालं ?

—हे सगळे नंतर जेवतील तुम्ही गेल्यावर.

ह्यांच्याकरता सैपाक केलाय् ना ?

—हो सर

--तर मग सगळ्यांना एकदमच वाढायला सांग. आम्ही सगळे एकदमच बसतो जेवायला.

आम्ही सगळेच पंगत करून जेवायला बसलो. त्यादिवशी जेवायला होता फक्त भात. डाळ किंवा काही भाजीपण नव्हती. प्रत्येकाच्या पानात थोडंसं मीठ अन् कांदा अन् हिरवी मिरची वाढली.

आम्ही सगळे मोठ्या आनंदानं जेवलो. नेताजींच्याबरोबर एका पंगतीत बसून.

जेवण उरकायला काही फार वेळ लागला नाही. दहाएक मिनटं लागली असतील. मग नेताजी जिपमधे बसले. ह्या खेपेला काही गाडी मी चालवणार नव्हतो. दरम्यान त्यांचा ड्रायव्हर मिकटिल्याहून येऊन पोचला होता. जिपमधे नेताजींच्या खेरीज कर्नल राजू अन् शहानवाजखान.

जिपमधे बसायच्या आधी नेताजी आम्हाला शेवटचं म्हणाले--सेनेचा मान तुमच्यावर सोपवून मी जातोय ! मला ठाऊक आहे, हा मान तुम्ही राखाल ! जयहिंद !

आम्हीपण एका आवाजात घोषणा दिली—नेताजी झिंदाबाद !

धुळीचा लोट उडवून जिप वळून दिसेनाशी झाली.

[ क्रमश: ]

---


केवड्याचा ओढा
पहारा
काळदरीचे काळीज
भास्करबुवा
चंदर
भवानबंकी
हिरा
बापू
सरकारवाडा

आगामी
कथासंग्रह

**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

राजहंस
प्रकाशन

हलक्या हातांनी त्यांनीच लखोटा उघडला,
त्यावर दोन दिवसामागची तारीख होती.
तिच्या कानात कसला तरी कर्कश आवाज घुमू लागला...
ती ऐकू लागली–

# चंदा है तू....मेरा सूरज भी तू...

अरुण इनामदार

दचकलात काय म्हणून ?

मला हसू आले आहे.–या–माझ्या–बोटाला भ्यालात ? उत्तर तर द्यावेच लागणार आहे तुम्हाला. होय, तुम्हीच ! अगदी सरळ तुमच्यावरच रोखले आहे बोट माझे–

इथ मी बसलेली. तिमिराने अवगुंठित

–आता मात्र तिरीमिरीने माझ्यावर नजरा रोखून बसलेल्या तुमच्या जगाला विचारते आहे, कसल्या अघोरी कुतूहलाने माझ्याकडे, माझ्या बाळाकडे पहाता आहात ? पुरे नाही झाले अजून ?

खिडक्या-दारांना जणू तोंडे फुटली आहेत, सगळ्या वृत्तपत्रांनी आमच्यासाठी चौकटी कोरल्या आहेत–

सगळीकडे चर्चा उतू चालली आहे,

" राक्षसाचा जन्म ! विसाव्या शतकात राक्षस जन्मास आला ! विचित्र बाळाचा अवतार ! "

–माझ्याच बाळाचे वर्णन आहे हे ! वाचतेच सबंध बातमी ही–

" सदर स्त्री संपूर्ण स्वाभाविक वृत्तीची असून, तिने जन्म दिलेल्या या बाळाच्या कपाळावर तिसरा डोळा आहे, आणि डोक्यावर दोन्ही बाजूंना शिंगेही आहेत. मुलाचे वजन जन्माचे वेळी साडेसतरा पौंड असल्याचे कळते.

हा विलक्षण प्रकार पाहण्यासाठी लोकांच्या झुंडी दर दिवशी रुग्णालयास भेट देत आहेत. "

जमावातील जनांनो ! जानकींनो !

एकालाही या वृत्तामध्ये काही वावगे

दिसू नये ? एकीलाही ?

बाई ग, तुझ्याचसारखी मी बाई—राक्षसाला जन्म देईन ?

—असू द्या. तुमच्या तोंडास हात लावणार कोण ? परंतु या क्षणी दूर व्हा.

एकदम दूर व्हा.

—परंतु तुम्हीच कसले, माझी मीही माझ्यापासून दूर जायला हवी आहे या क्षणी—

मी माझ्या बाळाकडे निघाले आहे !

—हे माझे लालसर डोळे. विस्कटले केस. चुरगळली वस्त्रे—माझ्या बाळाने असे पाहून चालेल कसे मला ? त्याची आई—आई दिसायला हवी !

—अशी कशी संतापलेली, कर्कश सुरातली आई ?

—मला हसू आले आहे...

बाळाकडे जाताना जणू माझ्या रूपात्तच नकळत हा हसरा फरक पडतो आहे.

माझी पावले अधिरी बनली आहेत. जोडवी रुणझुणतात. बांगड्या नाद करतात. जगाला कळत नाही काहीच. केस हातानेच सरसे केले मी, साडी सावरली—

त्याच्या पाळण्यावर झुकले आहे मी—

बाळ. माझे बाळ.

पाळण्याच्या दोरांना मोगरीच्या झेल्याचे रूप आले आहे.

—आला मोगरीचा वास तुम्हाला ?

पाळण्यावरले चिमण्याळे डुलले आहे किंचित्.

गडद निजला आहे बाळ माझा—

—किती सुंदर ही वाऱ्याची लहर तरी, त्याच्या मुखाजवळ रेंगाळणारी माशी दूर उडवून गेली.

पण वाराच काय, या क्षणी उभे विश्वच मला दयेने, सुंदरतेने भारलेले भासते आहे.

पहा ना बाळ माझे. जरूर, पण जरा जपून हं ! मंद श्वासाबरोबर नाकाची पातळ लालसर पुडी किंचित् हलते आहे. एका हाताची मूठ त्याच्याच चिमुकल्या छातीवर विसावली आहे. दुसऱ्या हाताची किंचित् चाळवाचाळव केली त्याने. हें शिंग—त्या दुसऱ्यापेक्षा अधिक कोवळे, लालसर दिसते, नव्हे ? आणि नवल तरी केवढे, या तिसऱ्या डोळ्यानेही अगदी आमच्याकडे पहायचेच नाहीसे ठरविलेले दिसते आहे ! केवढी झोप तरी ही !

—परंतु काय नवल, कळले वाटते त्याला, मी आल्याचे ? आलेच आहे मी—हसला पहा अवचित !

नीज पुरे झाली रे ! उचलू का तुला ? तुला घेतल्यावाचून उभेही राहणे अवघड, जड झाले आहे आता.

उघड ना डोळे—उन्हे पसरू दे सगळीकडे—

दारावरचा मण्यांचा पडदा किणकिणला. मी हलकेच मान तिकडे वळविली आहे. आले वाटते कोणी.

परंतु ते मला दिसत नाही ! माझे डोळे माझ्या बाळाने भारून टाकले आहेत—

जगानेही लक्षात धरावे ! माझे बाळ कसेही असो, तुम्हाला ते कसेही दिसो—माझ्या लेखी तो सर्वस्व आहे, माझे सगळे काही आहे. त्याच्याएवढे

सुंदर मला अन्य काही दिसत नाही, काहीही नाही.

निसर्गाने हे आश्चर्य माझ्या पदरात टाकले आहे, त्याला सामोरी जाईन मी, पाठमोरी होईन कशी ? त्याचे वडीलही म्हणाले होते—काय सांगायचे, दूर कोठे-तरी सांभाळायला देऊन टाकू निघाले होते ! का ? काय म्हणून ?

मी तुम्हाला दाखवून देईन की, त्याचे हे नवलरूप दैत्याचे नव्हे, देवतेचे आहे.

समयपुरुष केव्हा पुढे सरकला, कळलेच नाही. दिवस उलटले. ऋतुचक्र फिरत राहिले. भिंतीवर रेघोटयांनी आरास मांडली. पोरटयांनी घरात विध्वस मांडला. त्यांचा हात पुरेल, एवढया उंचीवर वस्तू ठेवण्याची सोय राहिली नाही—

बाळ विरुपाक्षाकडे घरा—अंगणाचे लक्ष लागून राहिले. घर जुन्या वळणाचे. विरत चाललेल्या तलम वस्त्रासारखी मने दुरावत चालली होती. भांडी भांडयांना लागत होती. बाळ विरुपाक्षाने अधिक मोठा गोंगाट मांडला ! इतर आवाज त्यात बुडून गेले. घरावर त्याच्या निमित्ताने पुनः जुन्या रंगाचा पंचम जमू लागला, वास्तुपुरुष त्याच्या बाळलीलांकडे किलकिल्या डोळयांनी पाहू लागला, मिशीत हसू लागला.

भावंडांमधील बाळ-कलह मिटविता त्यांच्या आयांच्या नाकी नव आले. आयांची भांडणे बाळे गळयात गळे घालून नवलाने पाहू लागली !

रांगोळीवर कुंकू भरावे, तसा विरु-पाक्ष किंचित वाढला आणि बाळांच्या भांडणांना तीव्र रूप आले. हा पोरगा वेगळा आहे, याची इतर मुलांना जाणीव होतीच; आता तो विरूप आहे अशी जाणीव आली—

त्या दिवशी भांडण विकोपाला गेली. विचित्र रूपाने विरुपाक्ष अगदी वेगळा पडे. तसाच त्या दिवशी त्याच्या सर्व सवंगडयांच्या चिडविण्याचे तो लक्ष्य ठरला. ते सर्वजण एक झाले व एकटया विरुपाक्षाला चिडविण्यास त्यांनी आरंभ केला—

विरुपाक्ष सरळ त्यांच्यावर तुटून पडला. दातओठ खाऊन त्याने 'सूड' उगविण्यास सुरुवात केली. सुरुवातीला 'जय' त्याचाच होत गेला. त्याची शक्ती अमानवी होती, हे तर खरेच होते. परंतु शेवटी 'शत्रू' संख्येने जास्त होते, ते भारी ठरले ! सर्वांनी मिळून विरुपाक्षाला खाली पाडले आणि त्याला बडविण्यास सुरुवात केली. त्याच्याच जोडीला त्याच्या विचित्र रूपावरून चिडविणे तर चालूच होते. विरुपाक्ष संतापला होता, चिरडीला गेला होता. घामाने न्हाला होता. साधे नाक पुसणेही एक विरुद्ध सात-आठ अशा 'लढाई'-मुळे त्याला शक्य होत नव्हते—त्याचे तीनही डोळे भरून आले, अपमानाने जीव घुसमटून निघाला—शेवटचा प्रयत्न म्हणून त्याने निकराने मुसंडी मारली.

तोडून काढावे, तसे त्या मुसंडी-बरोबर ते खोडकर खेळगडी त्याच्या-पासून दूर झाले. विजयाने विरुपाक्षाला वीरश्री चढली. स्फुरण चढल्यासारखे त्याने हल्ल्यावर हल्ले चढविले आणि

'शत्रू 'ना पार अंगणाच्या रणांगणातून पळवून लावले.

अखेर त्याच्या हाती सापडली जूही– 'शत्रू 'च्या गटातली, खेळण्यासाठी आलेली ती पोरगी. दात-ओठ चावीत विरुपाक्ष तिच्याकडे पाहू लागला.

–तिने त्याच्या तावडीतून सुटण्यासाठी हिसका दिला, त्याला ओरबाडून, ओरडून आपल्या 'साथीदारांना बोलावून पाहिले, त्याला चावण्याचे प्रयत्न केले–

परंतु विरुपाक्ष कच्चा नव्हता. त्याची पकड मुळीच सैल पडली नाही. तिन्ही डोळ्यांतून अंगार ओतीत तो जुहीकडे पहात राहिला. तिच्या ओरखड्यातून आता त्याच्या हाता-तोंडावर रक्ताच्या रेघा उमटल्या होत्या.

आणि जुहीने एक घोडचूक केली. तिने त्याच्या त्या विचित्र 'ध्याना 'वरून त्याला चिडविले–

–काय पण ध्यान ! अहाहा !

विरुपाक्षाच्या डोक्यात कोणीतरी शाळेसारखे घंटेचे टोल मारण्यास सुरुवात केली. त्याच्या डोळ्यात रक्त उतरले–

आणि त्याने सरळ धडक मारली.

जुहीची किंकाळी आसमंतात फुटून उठली. विरुपाक्षावर मार खाण्याची पाळी असताना न डोकावलेले सर्व मोठे लोक एका क्षणात जमा झाले आणि जुहीच्या आईने हंबरडा फोडला–

विरुपाक्षाच्या आईने कोणताही विचार न करता त्याला मारण्यास सुरुवात केली.

–त्याची विरुपाक्षाला पर्वा नव्हती. आधीच ठणकत असलेल्या अंगावर मुसळधार येणाऱ्या तडाख्यांची त्याला मुळीच जाणीव होत नव्हती ! तो आश्चर्याने आपल्या, जुहीच्या रक्ताने माखलेल्या हाताकडे ओझरते पाहून घेत होता–आणि आपल्या माथ्यावरील या दोन शिंगांच्या पराक्रमाने तर तो बेभान झाला होता. एवढे सामर्थ्य त्याच्याजवळ होते तर ! आणि अशी 'हत्यारे ' इतर कोणाही पोराजवळच काय, मोठ्या माणसाजवळही नव्हती !

जुहीला रक्तबंबाळ अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आले होते. मारून दमलेली विरुपाक्षाची आई हात कमरेवर ठेवून त्याच्याकडे पहात होती– जमिनीवर अस्ताव्यस्त पडलेला विरुपाक्ष क्षीण डोळ्यांनी तिच्याकडे पहात होता.

आपल्या अंगच्या सामर्थ्याचे दर्शनच आज त्याला घडले होते.

त्या दिवसापासून विरुपाक्षाशी सर्वांनी अबोला धरला. झालेल्या गोष्टीचा अर्थ समजून घेण्याचा कोणी प्रयत्नच केला नाही. तो एकटा पडला आणि त्याच्यासोबत त्याची आईही ! एकत्र असलेल्या त्या घरात विरुपाक्षाजवळ कोणी मूल फिरकणारही नाही, अशी त्यांच्या आया दक्षता घेऊ लागल्या. त्याच्या आईशीही कारणाशिवाय कोणी विशेष बोलेनासे झाले.

" मला नाही हे सहन होत. " त्याची आई एकदा त्याच्या वडिलांना म्हणाली, " तुम्ही एकदा सगळ्यांना विचारीत का नाही ?"

"काय विचारू ?" ते संतापून म्हणाले, "तुझा पोरगा फार गुणी पडला, म्हणून सर्वांनी तुमची ऊठबस करावयास हवी ! त्या पोरीचे बिल किती झाले, ते नाही दिसत तुला. हजार वेळा सांगितलेय्, त्याला जरा धाक दाखवायला हवा. नुसते लाड–लाड काय रे ए, तिथे ठेवायला सांगितली होती का तुला पाटी ?"

बाजूलाच असलेल्या विरुपाक्षाला त्यांनी एकदम एक जोराचा फटका दिला आणि त्याच जोराने त्याला उठून बसविला––

त्याची आई जागची हलली नाही. एकटक पतीकडे पहात राहिली. मुलाचा दांडगेपणा तिला मान्य होता. नुसत्या लाडाने भागत नाही, हे तर तिला प्रत्येकजणच शिकवीत होता. परंतु पार सुकून, उतरून गेलेले पोराचे तोंड मात्र त्याच्या वडिलांनाही दिसू नये, याचे ती नवल करीत होती.

त्यावर बोलणे हा इलाज नव्हता. या घरात आता असेच चालणार होते. विरुपाक्षावर सर्वांनीच जणू दात धरला होता आणि त्याचे वडीलही त्यांच्यातच सामील झाले होते––पोराला दूर, होस्टेल्सारख्या ठिकाणी ठेवून टाकावे, असा त्यांचाही विचार होता.

परंतु त्याच्या आईला हे मान्य नव्हते. एवढ्या वयापासून त्याला आपल्यापासून निष्कारण दूर ठेवण्यास तिने अगदी शांतपणे, निश्चयाने नकार दिला.

"तो माझ्याजवळच राहील; " ती म्हणाली. दिवस मागे पडले. ऋतू पालटावे, तसा काळ पुढं सरकला आणि एक दिवस ती बाई घराबाहेर पडली.

नवे घर मांडण्यात आले होते. घर फोडून वेगळे होण्याचा कलंक तिच्याच कपाळी मारण्यात आला होता, परंतु तिला हे असह्य झाले होते.

विरुपाक्षाचे शाळेचे वय पुढे चालले होते. त्याचा विचार कोणालाच नव्हता –अगदी त्याचे वडीलही 'बघू–' यापलीकडे काही 'बघत' नव्हते. विरूप असला, तरी त्याच्याकडे लक्ष द्यायला हवे होते––

निदान त्याच्या आईला तरी !

नवे घर, नवी शाळा, नवे शेजारी, नवे सोबती–विस्तारलेल्या क्षितिजाने विरुपाक्षाला अधिकाधिक अंतर्मुख केले. आपल्या शक्तिमुळेच आपण चार पावले मागे राहिले पाहिजे–याची सतत टोचणी त्या बाळमनाला लागत होती, त्यामुळे तो सर्व गोष्टीमध्ये मागे–मागेच राहू लागला. त्याचे वय, त्याची बुद्धी, त्याला पुढे खेचीत होती, परंतु स्वतःलाच घाबरून त्याने पुढे जाण्याचे टाळले––

धावण्याच्या शर्यतीत शिरलो तर वाऱ्यावरोबर निशाण गाठेन. पोहण्यास पडलो, तर एका दमात ते टोक गाठेन. वक्तृत्वात उभा राहिलो, तर इतरांना शब्द काढू देणार नाही–पतंग उडवावयास निघालो, तर इतरांचा एकही पतंग वर राहणार नाही–कुस्तीत शिरलो, तर आखाडा डोक्यावर घेतल्याशिवाय राहणार नाही––

"पण बाळा विरुपाक्षा, तू जपूनच राहिले पाहिजेस हं ! एकही तक्रार

यायला नकोय् मला–" आईच्या शब्दांनी त्याचे ओठ मिटले जात, घट्ट मिटले जात–व एकाद्या माणसाळलेल्या प्रचंड हत्तीसारखा तो दणकेबाज पोरगा मागे सरकू लागे—

ते पाहवत नव्हते, सर्कशीतल्या हत्तीचे एका स्टुलावर बसणे पाहवू नये, तसे.

त्याच्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या लक्षात ती गोष्ट एका साध्या प्रसंगाने आली. स्नेहसंमेलनाच्या प्रसंगी, आंतर-शालेय कुस्तीमध्ये अजिक्य ठरलेला या शाळेचा कुस्तीगीर पोरगा काही आगळीक करून गेला आणि आपल्या शक्तीच्या गुर्मीत खुद्द मुख्याध्यापकांचाही मुलाहिजा त्याने ठेवला नाही—

त्यावेळी विरुपाक्ष तेथेच होता, जमलेल्या मुलांमध्ये मिसळून भयचकित दृष्टीने तो प्रकार पहात होता. समोर तो पहिलवान पोरगा आव्हान दिल्यासारखा बेछूट उभा होता व थिजलेले, गप्प झालेले ते मुख्याध्यापक !

एका क्षणात विरुपाक्ष पुढे झाला, आणि न राहवून त्याने त्या 'अजिक्य' पोराला आभाळ दाखविले !

विरुपाक्षाला त्यामध्ये विशेष काहीच नव्हते ! त्याचे मुख्याध्यापक मात्र थक्क झाले होते. या निराळ्या मुलाकडे त्यांचे लक्ष होतेच, या प्रसंगाने तो अधिक त्यांच्या नजरेसमोर आला. "त्याला मी मुद्दामच अशा स्पर्धांमध्ये पडू देत नाही." त्याची आई त्यांना म्हणाली, "त्याने चार लोकांसारखे व्हायला हवे – सभ्य, सौम्य. उगीच राक्षसीपणा करता कामा नये ! सर्वांची इच्छा त्याने बेफाम, राक्षसी बनावे, ही आहे — परंतु मी मात्र त्याला तसे होऊ देणार नाही. त्याने चांगलेच निघाले पाहिजे ?"

मुख्याध्यापकांनी बेल वाजवून आपल्या सचिवांना बोलावले, व आपले त्या दिवसाचे कार्यक्रम रद्द केले. विरुपाक्षाची आई पाहतच राहिली — त्यांनी तिलाच त्या दिवशी आपले म्हणणे नीट शिकविण्यात वेळ वेचला ! "त्याने चांगले निघणे, म्हणजे दुबळे निघणे नव्हे !" ते म्हणाले, "चार लोकांसारखेच त्यानेही जगण्याची जरूर नाही. त्याच्या सर्व उपजत शक्तींच्या पराकोटीच्या आविष्कारापर्यंत त्याने वाढणे, म्हणजे त्याची खरी वाढ होणे आहे–– त्या शक्तीच नष्ट करणे म्हणजे त्याची योग्य वाढ होणे नव्हे !"

"म्हणजे त्याने राक्षसी व्हावे काय ?" तिने थरकापून विचारले.

"नाही. त्याच्या अंगात जरूर राक्षसी शक्ती हव्यात, परंतु त्यांना दैवी वळण असावे. ––आणि ते काम तुमचे !"

आभाळाचे रंग पालटले. घंटा घणघणली. गलबलाटाने शाळेचा परिसर दुमदुमून उठला. संध्याकाळ झाली होती. "त्याच्या शक्तींना वाव मिळावयास हवा !" विरुपाक्षाच्या आईला हे नवे होते, परंतु पटले होते.

आगगाडीने कर्कश शिटी दिली, आणि ती पुढे सरकली. खिडकीतून दिसणारा विरुपक्षाचा चेहरा हळूहळू दूर–दूर गेला, तरी त्याच्या आईच्या नजरेसमोर तो दिसतच होता. त्या चेहऱ्याची

विविध रूपे तिच्या डोळ्यामध्ये दाटून आली होती--

जन्मानंतरचे त्याचे पहिले दर्शन. लोकांच्या नजरा. वर्षावर्षाला पालटते चाललेला, मोठा-मोठा होणारा तो चेहरा–वेगळे झाल्यानंतरचा विरुपाक्ष, शाळेत जाणारा, हट्ट धरणारा, शाळेतल्या मुलांशी भांडणारा, समजूत काढल्यावर पुन: फुलून येणारा त्याचा तो जगावेगळा चेहरा --

आणि मग मुख्याध्यापकांच्या सल्ल्याने सैनिकी शाळेत घातलेला विरुपाक्ष. तेथे तर दर वर्षा–वर्षाला त्याच्यात एवढा फरक पडे की, हा आपला विरुपाक्षच का असा संभ्रम पडावा! त्या मुख्याध्यापकांचे निदान सोळा आणे अचूक ठरले होते. सैनिकी शाळेमध्ये विरुपाक्षाला चांगलाच वाव मिळाला होता. त्याच्या अंगच्या गुणांचा योग्य परिपोष व्हावा असेच तेथील वातावरण होते--

दिवसा दुप्पट, रात्री चौपट--अशी विरुपाक्षाची तेथे वाढ होत गेली. प्रत्येक दिवस यशाचे नवे देणे घेऊन आला. पारितोषिकांची वृष्टी अंगावर घेतच शिक्षण पूर्ण झाले, नवा दिवस एक अपूर्व सन्मान त्याच्या निधड्या छातीवर खोवून गेला --

एका संपन्न परकीय राष्ट्राच्या सेनादळामध्ये अधिकारी म्हणून त्याची नियुक्ती झाली होती. तो तिकडे गेला त्या रात्री आपली झालेली अवस्था तिला आठवली--

विरुपाक्षाच्या कर्तबगारीचा पट नजरेसमोर येताच तिच्या अंगावर आनंदाचे रोमांच जरूर उभे रहात; परंतु एक अपूर्ततेची भावनाही तिच्या मनात त्याचबरोबर जागून जात असे. त्याला वाढवून संसारक्रमांत अडकविणे, एवढे एकच ध्येय आपल्या डोळ्यांसमोर होते का?

मनाच्या या प्रश्नांचे उत्तर नकारार्थी होते! यावेळीही तिला ते जाणवून गेले. विरुपाक्षाला घेऊन जाणारी गाडी गेली तरी तिच्या डोळ्यांसमोर त्याचा चेहरा प्रश्नचिन्हासारखा उभाच होता. त्याच्या राक्षसी शक्तिला दैवीगुणांची जोड देण्यात आपण यशस्वी झालो काय?

पतींनी तिला सावध केले, तेव्हा ती भानावर आली. जगाच्या दुसऱ्या खंडातील युद्ध तिसऱ्या राष्ट्रासाठी लढण्यास विरुपाक्ष चौथ्या राष्ट्राचे सैन्य घेऊन निघून गेला होता; मागे उरला गाडीने उडविलेल्या धुळीचा एक पुसटता ढग – डोळ्यात प्राण आणून ती विरुपाक्षाच्या पत्राची, संदेशाची, निरोपाची वाट पहात राहिली.

या सर्व वर्षांनी तिच्या शरीरावर परिणाम केलाच होता. आता तो सर्व उफाळून वर आला–

शक्ति कमी होत गेली. डोळ्यांभोवती काळी वलये उमटू लागली. कशातच उत्साह वाटेनासा झाला — वार्धक्य जणू फार उचलत्या पावलांनी जवळ आले. आणि ती स्वत:ला विचारीत होती, आता त्याला दूर ठेवावयाचे तरी कशासाठी?

या अखंड काळजीने तिला घेरून टाकले. ती बिछान्याला खिळली...

रेडिओवर, वृत्तपत्रांतून, सैनिकी टपालांतून, विरुपाक्षाच्या युद्धाचे वृत्तांत येत होते.

सगळ्या वार्ता विजयाच्या होत्या. पराजयाचा पुसटताही डाग कोणत्याही वार्तेला लागलेला नसे – तिकडून वार्ता येऊ लागल्या. दिवसापासून तिच्या कानांवर अशी बातमी चुकूनही आली नव्हती. विरूपाक्षाच्या नेतृत्वाखालील त्या सैन्याने विजयाची घोडदौड चालविली होती...

हळुहळू युद्धाच्या ज्वाळा मंदावत गेल्या. कोणीतरी कोणाच्यातरी शिष्टाईचा आधार घेतला, आणि मग सर्वांना शांततेची आठवण झाली. मध्यस्थांनी धावाधाव केली. संहार पुरेसा झाल्याची खात्री करून घेण्यात आली, आणि युद्ध थांबले.

ती मात्र बिछान्याला खिळली होती. विरूपी परत येणार, या जाणिवेने तिची सुधारती प्रकृतीही ढासळली होती. खुद्द राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते त्याचा सन्मान व्हावयाचा होता––

एवढ्या आनंदाचे ओझे आपण सोसू शकू, याची तिला स्वत:लाच शंका होती. त्या समारंभाला हजर राहण्याचे तिने त्यामुळेच निश्चयाने नाकारले होते.

विरूपाक्ष दिल्लीमध्ये परतला होता. त्याच्या वडिलांची समारंभास जाण्याची तयारी पूर्ण झाली, आणि अचानक ते तिच्यासमोर येऊन उभे राहिले.

"काय झाले ?" तिने विचारले.

दोन्ही हातांनी तोंड झाकून घेत त्यांनी एक हुंदका दिला, आणि एक लखोटा त्यांनी तिजसमोर टाकला–

"हे...हे काय ?" विजेने चाटल्यासारखी उन्मळत ती बोलली.

"शांत...शांत हो. धीर धर." ते अडखळत म्हणाले,

"परमेश्वर आपला पाठीराखा आहे. अशी घाबरू नको. विरू सुखरूप आहे. पण हे वाच..."

–हलक्या हातांनी त्यांनीच लखोटा उघडला. दोन दिवसांमागची तारीख त्यावर होती. तिच्या कानात कसलातरी कर्कश आवाज अखंड घुमू लागला होता. जडशीळ होऊन ती ऐकू लागली,

"सदर अधिकारी विरूपाक्ष यांनी केलेल्या एका कृत्याविषयी आपणास कळविण्यात येत आहे त्यांच्या सर्वोच्च वरिष्ठांना त्यांनी गोळी घालून ठार केल्याचे कळते. त्याबद्दल योग्य वेळी सदर अधिकारी, आपले पुत्र विरूपाक्ष यांची आमच्या लष्करी कोर्टातर्फे चौकशी करण्यात येईल. त्यांना विशिष्ट मानचिन्ह दिल्याचे आपणास कळविण्यात आले आहेच..."

...पति वाचीत होते, आणि ती कृतकृत्यतेने फुलून आली होती. विरूपाक्षाने त्याच्या वरिष्ठांना गोळी घातली होती. ती ऐकतच होती – त्या वरिष्ठांनी, जिंकलेल्या प्रदेशावर केलेल्या अमानुष अत्याचारांबद्दल विरूपीने त्याला शिक्षा दिली होती !

मानचिन्हे, पदके – किंवा लष्करी चौकशी – त्या सर्वांपेक्षा विरुपाक्षाने अंगात बाणविलेल्या मानवतेची ही पावती तिला लाख मोलाची होती, ती जिंकली होती, विरूपी जिंकला होता.

–जग काहीही म्हणो ! ● ● ●

## क्रीडांगण

# मागे वळून पहाता–

मुकुंद मणूरकर

इंग्लंडचा दौरा संपला. एखादे चक्री-वादळ झाल्यानंतर आसमंतात जसा एक सन्नाट पसरतो तसंच काहीसं भारतीय क्रीडाक्षेत्रात झालं. टेस्ट सुरू होण्याआधी एकदोन दिवस वाटणारी हुरहूर, टेस्टच्या सहा दिवसात चढत जाणारी उत्कंठा, गरमागरम चर्चा, तिखट कॉमेंट्स हे सारं आता संपलं. भारताने मालिका तर जिंकलीच, पण गेल्या वर्षी वेस्ट इंडिज् व इंग्लंड यांना त्यांच्या भूमीवरच खडे चारून कमावलेल्या रुबाबाची शान भारतीय वीरांनी स्वतःच्या भूमीवर टिकवली, नव्हे वाढवली. विजयाची सुरेख हॅटट्रीक साधताना भारताने जागतिक क्रिकेट क्षेत्रात स्वतःबद्दलचा दरारा निर्माण केला. गेल्या दोन महिन्यातील प्रचंड गदारोळाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास अनेक गोष्टी जाणवतात. काही भल्या, काही बुऱ्या, तर काही पितळ उघडं करणाऱ्या.

इंग्लंडच्या संघाने सबंध दौऱ्यात आपल्या नाकी दम आणला हे कबूल केलंच पाहिजे. दौऱ्याआधी इंग्लंडच्या खेळाडूंची नावे जाहीर झाली तेव्हा हा संघ दुय्यम दर्जाचा आहे अशी ओरड अनेक समीक्षकांनी केली. भारताने आपला दुय्यम संघ उतरवावा अशाही मागण्या झाल्या. आणि त्यापैकी काही-जण तर आता म्हणत आहेत की मद्रासला अंडरवूड असता अगर कलकत्त्याला अर्नोल्ड खेळता तर निकाल वेगळाच लागला असता. पण इंग्लंडला दुय्यम लेखण्यात झालेली चूक कोणीही कबूल केली नाही. समीक्षकांनी मात्र हा दौरा चांगलाच गाजविला. झाडून साऱ्या दैनिकात समग्र आणि सचित्र वर्णने येत असत. अर्थात् त्यापैकी बहुतेक 'वृत्तांत' या सदरात मोडणारे, 'समीक्षा' अशी थोडीच! मराठीच्या बाबतीत बोलायचे झाल्यास 'महाराष्ट्र टाईम्स्'च्या वि. वि. करमरकरांनी केलेले पाचही सामन्यांचे समीक्षण अप्रतिम ठरावे. क्रीडा-समीक्षेला करमरकरांनी साहित्याच्या प्रांगणात अदबीनं बसवलं आहे! काही समीक्षकांची 'प्रादेशिकता'ही दिसून आली. यात विशेष आघाडी मारली ती मुंबईच्या एका इंग्रजी दैनिकाच्या समीक्षकांनी. पहिल्या दोन सामन्यांनंतर रामनाथ पारकरऐवजी चेतन चौहानला घेतले. पारकरला याचे जितके वाईट वाटले नसेल इतके या समीक्षकांना वाटले. पारकरवर अन्याय झाला हे कबूल, पण त्याचा पाठपुरावा करताना चेतनला लाखोल्या कशाला? सामना सुरू होण्यापूर्वीपासूनच चेतनवर पद्धत-

शीर तोफा डागल्या होत्या. त्याच्या कानपूरच्या मंद खेळावर दुगाण्या झाडणाऱ्या या समीक्षक महाशयांनी मुंबईच्या सामन्यात पतौडीने केलेल्या कूर्मगती खेळावर काहीच लिहू नये? चेतन तर आक्रमक खेळाडू म्हणून कधीच प्रसिद्ध नव्हता, पण पतौडीसारखा शैलीदार फलंदाज दोन तासात जेमतेम पाच धावा करू शकतो तेव्हा त्यावर टीका करण्यासारखे काहीच नसते का? चेतनच्या क्षेत्ररक्षणाबाबतही तसेच. सिलीपॉईंटला त्याने घेतलेल्या काही काही सुरेख झेलांकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते, पण बॅकवर्डशॉर्टलेगला एखाद्या वेळी चेंडू अडविण्यात झालेल्या ढिलाईला मात्र चांगली बोल्डटाईपमध्ये प्रसिद्धी दिली जाते. एका प्रमाणभूत मानल्या जाणाऱ्या आणि तेही इंग्रजी, दैनिकातील क्रूर टिकेचा काहीच विपरीत परिणाम न होण्याइतका चेतन खासच निगरगट्ट नसेल.

समीक्षकात आणखीही एक वर्ग होता. तो म्हणजे 'पैसे वसूल' करणाऱ्या खेळाचा आग्रह धरणाऱ्यांचा. त्यामुळे मुंबईच्या सामन्यात वाडेकरने डाव लवकर घोषीत केला नाही व सामन्यातील उत्सुकता वाढविली नाही म्हणून अनेकांनी लेखण्या परजल्या. दोन वर्षापूर्वी याच 'चमकदार' खेळाने भारतीय क्रिकेटचे नुकसान केले होते. एकाद्या ध्येयासाठी झगडणे आणि त्याची पूर्ती करणे याचा धडा अजित वाडेकरने घालून दिला आहे. अजितच्या कप्तानपदाबद्दल प्रथमपासूनच अश्रू ढाळणाऱ्या अनेकजणांनी, आता काही कारण न सापडल्यामुळे, त्याने डाव लवकर घोषित केला नाही म्हणून टिका करावी हे अपेक्षितच होते. पण मालिका खिशात टाकण्याची संधी घेतताना अजितला कुठलाही धोका पत्करण्याचे कारण नव्हते या पटणाऱ्या समर्थनापेक्षा त्यावेळची परिस्थिती अधिक पटते. इंजिनिअर जखमी, दुराणीचो अडगळ, त्याची जागा घेणारा पारकरही जखमी अशा परिस्थितीत डाव चहापानापर्यंत लांबविण्याशिवाय वाडेकरला पर्याय नव्हता. आणि शेवटी हे टेस्ट क्रिकेट आहे, महोत्सवी सामना नव्हे. यातील जयपराजयाला खूप महत्व असते आणि ते कागदोपत्री वर्षानुवर्षे टिकून रहाते.

पाचही सामने मिळून सुमारे तेरा-लाख लोकांनी उपस्थिती लावली. एखादी टेस्ट पहायला मिळणारे भाग्यवान व पाचही टेस्ट पहाण्याची संधी मिळालेले दैवी पुरुष समजावेत इतके टेस्ट क्रिकेट सामान्य माणसाला महाग आहे. त्यामुळे दुधाची तहान ताकावर भागवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे कॉमेंट्री ऐकणे. पण या बाबतीत समाधान झाले नाही. प्रत्येक ठिकाणी एखादाच चांगला समालोचक असायचा, पण एकूण संच तद्दन भिकार असायचा. त्यामानाने मुंबईला बरंच चांगलं ऐकायला मिळालं. मुंबई सोडल्यास इतर ठिकाणचे 'एक्स्पर्ट कॉमेंट्रेटर' म्हणजे एक विनोद होता. 'एक्स्पर्ट' खेळाडू माईकसमोर चट्कन एक्स्पर्ट कॉमेंट्सही करू शकतो हे आकाश-

वाणीला कुणी सांगितले ? एखादा गडी बाद झाल्यावर समालोचक सांगायचे 'नाऊ अवर एक्स्पर्ट लाला (-किंवा जो असेल तो) विल टेल यू'. मग लाला सांगायचे – 'बेदीने नॉटला चांगलेच फसविले.' च्यामारी! फसविल्याशिवाय विकेट मिळाली नाही हे आम्हाला समजते. पण विकेट मिळविण्यासाठी बेदीने आधीच्या दोन-तीन ओव्हर्सपासून काय प्रयत्न केले, वाडेकरने कशा मुव्हज घेतल्या वगैरे-बद्दल काही नाही! दिवसाच्या खेळाच्या एक्स्पर्टस् कॉमेंटस् म्हणजे दिवसभराचा धावफलक विस्ताराने सांगणे व दुसऱ्या दिवशीच्या खेळाबद्दलचा हमखास चुकणारा अंदाज व्यक्त करणे! मुंबईला मात्र, बॉबी तल्यारखानांनी खऱ्या 'एक्स्पर्ट' कॉमेंट्स केल्या. त्यांचा ढंगदार आवाज व त्याला खोचक शब्दांची जोड, समोर घडणाऱ्या घटनांवर वेगळ्याच दृष्टीकोनातून विचार करण्याची त्यांची लकब, यामुळे ते या जागेवर शोभून दिसले. पण ते त्रागा करणारे असावेत असं मात्र वाटलं नव्हतं. मुंबई आकाशवाणीचे बुलेटीन वाचून व ऐकून एवढं कळलं होतं की चहापानाच्या वेळात तल्यारखान समालोचन करणार. पण या वेळात त्यांनी एकट्याने असे कधीच समालोचन केले नाही. शेवटच्या दिवशी तर त्यांनी कहर केला. वाडेकरने डाव घोषीत केला नाही म्हणून ते 'नर्व्हस' झाले. व पाच मिनिटात त्यांनी 'विजय, आता मी येणार नाही' अशी मर्चंटना धमकी देऊन पोबारा केला. बिचाऱ्या मर्चंटनी मग वेळ मारून नेली. आकाशवाणीची ऑफर तुम्ही एकदा स्वीकारल्यानंतर उरलेल्या वेळात तुम्हाला बोललेच पाहिजे. चहापानाच्या वेळात विजय मर्चंटना बोलण्याचे बंधन नव्हते. पण दहा मिनिटे शिल्लक असताना

---


# एका पराभवाची कहाणी

ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी

अनुवाद : अनंत भावे

मल्य : पंधरा रुपये

---

राजहंस प्रकाशन


---

'बॅक टू द स्टुडिओ' म्हणून पळ काढणाऱ्या बॉबींनी याचा विचार केला नाही. आपल्या हेकट स्वभावाचे दर्शन घडविले.

निवडसमितीच्या धरसोड व डरपोक धोरणांचे प्रदर्शन या मालिकेत चांगलेच झाले. संपूर्ण सीझनमध्ये अपयशी ठरून केवळ एका विभागीय सामन्यातील कर्तबगारीवर पतौडीची निवड करताना दिलेला न्याय इतरांनाही मिळणार का? दुराणी व प्रसन्न यांची फलंदाजी व गोलंदाजी पणास लावताना त्यांच्या क्षेत्ररक्षणाकडे काणाडोळा करण्याचे धोरण निवडसमिती यापुढेही राबवणार का? मुंबईच्या सामन्यात दुराणीचा समावेश 'नो दुराणी, नो मॅच' या धमकीला घाबरून करण्यात आला होता हे उघड गुपित आहे. इंग्लंडची आघाडीची फळी नेहमी कोसळत असे व मधल्या फळीतील एखादा खेळाडू तळाच्या फलंदाजांना हाताशी धरून डाव लांबवीत असे. अशावेळी एखादा साळगावकर किंवा ईस्माईल नक्कीच काहीतरी, वेगळे करु शकला असता. या सीझनमध्ये 'साळगावकर–इंजिनिअर–वाडेकर' यांचे सुरेख कॉबीनेशन बसले असताना त्याचा लाभ घेण्याचे धाडस निवडसमितीने करायला हरकत नव्हती. पहिल्या कसोटी सामन्याची निवड करताना मागील वर्षीच्या विजयी संघात बदल न करण्याचा भावनात्मक विनोदही निवडसमितीने करुन पाहिला. पण ही रसिकता नंतर आटली हे भाग्य!

पण मालिकेत सर्वांत मोठा विनोद दोन्ही संघांनी आघाडीच्या फलंदाजी-बाबत केला. वास्तविक आघाडीचा फलंदाज ही सतत प्रयोग करण्याची जागा नव्हे. पण भारताने पारकर-गावसकर, गावसकर–चौहान, चौहान–इंजिनिअर व इंजिनिअर गावसकर अशा जोडचा खेळवल्या व त्याला तितकीच दाद इंग्लीश संघाने वूड–ॲमिस, डेमिस–डनिस, डेनिस–रुप, रुप–लुईस व रुप–बर्कनशा यांना आघाडीत खेळवून दिली. आघाडीच्या गोलंदाजीत मात्र इंग्लीश संघात सुसुत्रता होती. भारताचा काही प्रश्नच नाही. त्यांची 'आघाडीची' गोलंदाजी नव्हतीच!

असो. या सर्व गोष्टी आता आठवणीत जमा झाल्या. विश्वनाथ, फ्लेचर यांची शैलीदार व ग्रेग-इंजिनिअर यांची धडाकेबाज फलंदाजी, चंद्रा-बेदीच्या फिरकीने केलेली करामत, सोलकरचे फँटॅस्टिक डाईव्ह्ज्, पंच रुबेन यांची निर्विकारता, अपील करताना पंचांच्या अंगावर धावून जाणारे नॉट-ग्रेग, लुईसचा समंजसपणा, या साऱ्यांची चित्रे घोळवीत आता बसायचे. 'गुड मॉर्निंग टू लिसनर्स' या आवाजासरशी कान टवकणारे उत्सुक चेहरे सध्यातरी दिसणार नाहीत.

क्रिकेटची कॉमेंट्री ऐकणे हा गेले दोन महिने विरंगुळा ठरत होता. यात क्रिकेटचा मोठेपणा किती आणि आपलं जीवन इतकं नीरस झाल्याचे विदारक सत्य किती?

● ● ●



## 'एकलव्या'चा मानकरी प्रकाश शेठ

मध्यम उंचीचा, सडसडीत बांध्याचा, वर्णाने गोरागोमटा, किंचित लाजरा, किंचित् हसरा असा हा प्रकाश शेठ. खोखोच्या मैदानाबाहेर सीधासाधा दिसेल. पण मैदानात उतरल्यावर भारतातील नामांकित खेळाडूंचा घाम काढण्याची हिंमत अंगात आहे. यंदाच्या राष्ट्रीय स्पर्धेत प्रकाशला 'एकलव्य' पारितोषिक मिळाले. पुण्याच्या नव-महाराष्ट्र संघाच्या या खेळाडूने आपल्या संघाची दैदिप्यमान परंपरा पुढे चालविली आहे. गेल्या चार वर्षात 'एकलव्य' मिळविणारे सुहास वाघ, अवी पटवर्धन आणि 'छत्रपती' पुरस्काराचे मानकरी मधु झंवर, शाम पुरोहित यांच्या पंक्तीत प्रकाशही आता विराजमान झाला आहे. पुणे विद्यापीठाच्या खोखो संघाचे दोन वर्षे यशस्वी नेतृत्व करणारा प्रकाश यंदा वैद्यकीय पदवी मिळविण्याच्या बेतात आहे. 'एकलव्या'चे पीस आपल्या शिरपेचात अभिमानाने खोवत असतानाच 'छत्रपती' व 'अर्जुन' पुरस्कार मिळविण्याची रास्त आकांक्षाही बाळगून आहे! आपल्या शैलीदार पळतीने प्रेक्षकांची मने रिझवणाऱ्या प्रकाशची ही अपेक्षा पुरी होईलही!!

●

## राज्य नाट्य स्पर्धा

पृष्ठ २१ वरून

बोंद्रे यांच्या आवाजातील नैसर्गिक अनुनासिकत्व ल्यूसीच्या भूमिकेत काही संवादात खटकत होते. या नाटकातील ध्वनिसंयोजन व संवादाचे संयोजन यात काही नातेच नव्हते. पार्श्वध्वनीमुळे संवाद ऐकू येऊ नयेत असे सतत घडत होते. तसेच एकदा संवाद उच्चारताना पात्राची प्रेक्षागृहाकडे पाठ असणार हे माहीत असेल तर दिग्दर्शकाने तालमीतच त्या संवादाची फेक वेगळी योजावयास हवी. [ 'ई ' रांगेतील खुर्चीत संवाद पोचण्यास एवढा त्रास होत असेल तर प्रेक्षागृहाच्या इतर कोपऱ्यात नाटक किती पोचले असेल याची कल्पना येईल. ]

दिग्दर्शकाचे कौशल्य जाणवले ते शारीर छळांच्या दृश्याच्या संकल्पनेत व प्रत्यक्ष समूह रचनेत. या प्रसंगातील भीषणता, क्रूरता त्यांनी नेमकी प्रस्थापित केली. क्षणभरही आभासाने हास्यास्पदता येऊ न देता त्यांनी देशभक्तांचे शारीर क्लेश दर्शविले. अर्थात् यामुळे नाटकातील मूळ आशय बाजूला राहून प्रत्यक्ष घटनेला महत्व प्राप्त झाले. साधन् डे यानी गोणपाटांनी आच्छादित भिंतीनी परिणाम चांगला साधला होता, तरी या नाटकातील पोटमाळ्याचा उल्लेख, एकाच देशातील दोन गटांचा उल्लेख आणि ' स्व 'च्या शोधाचा सुचितार्थ लक्षात घेता, भिन्न पातळ्यांवरील अभिनय क्षेत्रे, गोणपाटाचा (neutral) निवळ रंग व दुसरा एखादा (deep) गडद रंग यातील विरोधही अधिक बोलका ठरला असता.

नाटकाचा प्रयोग बरा झाला अशीच पण एवढीच प्रतिक्रिया ' मेन विदाऊट शॅडोज 'च्या प्रयोगानंतर झाली. कारण भाषांतरकार, दिग्दर्शक व नट यांना नाटक पेलले नव्हते. तरी एक नटसंच उमेदीने स्वतः एखाद्या नाटकाचे भाषांतर करून सादर करण्याचा यत्न करतो हे दृष्यच स्पर्धेच्या सांप्रतच्या अवस्थेत श्रेयस्कर वाटले.

## प्रेमकहाणी
### बाल नाट्य संस्था

या नाट्यप्रयोगाच्या दुसऱ्या दिवशीच रत्नाकर मतकरींच्या ' प्रेमकहाणी 'चा प्रयोग झाला. रत्नाकर मतकरी यांचे नाव मराठी रंगभूमीवर बालनाट्याच्या

क्षेत्रात आणि एकांकिकांच्या क्षेत्रात प्रस्थापित झालेले असले तरी प्रौढांच्या व्यावसायिक वा प्रायोगिक रंगमंचावर त्यांचे स्थान अजून व्हावयाचे आहे. रत्नाकर मतकरी आणि प्रतिभा मतकरी (अल्काझीशिष्या) हे दोघे काही तरुण मित्रांसमवेत गेली काहीच वर्षे प्रौढा-साठी नाट्यप्रयोग करण्याचा यत्न करीत आहेत. 'ब्रह्महत्या', 'शापित' ही दोन नाटके त्यांनी यापूर्वीच्या स्पर्धांत केली होती. मतकरींच्या एकांकिकात वा वा नाट्यलेखनात रंगमंचाची विलक्षण जाण आहे.त्यामुळेच ते स्वतः दिग्दर्शन करतात याचे आश्चर्य काहीच नव्हते. परंतु आतापर्यंतच्या त्यांच्या प्रयोगात पदन्यासाची सफाई व संपूर्ण प्रयोगाला असणारी एकसंधता यात कमतरता दिसत होती. त्यावेळी नाट्यक्षेत्रातील अनेकजण मतकरी स्वतःच्या लेखनावर अन्याय करीत आहेत असे कुजबुजत असत. 'प्रेमकहाणी'च्या अत्यंत नेटक्या प्रयोगाने मतकरींनी आपले दिग्दर्शन कौशल्यही सिद्ध केले आहे. 'प्रेमकहाणी' ही एक निव्वळ विरचना आहे. लेखका-च्याच शब्दात सांगायचे तर--"या नाटकात वास्तव आणि रंगभूमी यांचे परस्पर संबंध शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. निरनिराळ्या पातळ्यांवर, केवळ रचनेच्याच नव्हे तर व्यक्तिचित्रणाच्या, घटनांच्यादेखील. कलेच्या प्रांतात आपण एकसारखे वास्तवतेचा कलात्मक अर्थ लावण्याच्या प्रयत्नात असतो. कारण कलेच्या प्रगतीच्या दृष्टीने ते आवश्यक आहे. उदाहरणार्थ, सामान्य माणसाचे दुःख, त्यातला सामान्यपणा समजून घेऊनही नाट्यपूर्ण (पण नाटकी नव्हे) रीतीने मांडणे हा प्रयोगाचा एक भाग. एका अर्थी हे नाटक म्हणजे नाटक-काराने घेतलेला केवळ कथावस्तूचाच नव्हे तर 'नाटक' या गोष्टीचाच शोध." हा हेतु असल्याने नाटककाराने नाटक लवचिक राखले आहे. तीन अंकात विस्तारत जाणारे एक कथासूत्र, काही विशिष्ट व्यक्तिरेखा यात नसून प्रत्येक घटनेच्या अनेक शक्यता आपण पहात जातो. नाटककार स्वतः रंग-मंचावर सूत्रधार असतो; प्रसंगी तो आपल्या पात्रांच्या जीवनात शिरून त्यांना मार्ग दाखवतो. क्वचित प्रेक्षक नाटकात घुसून, पात्रांचा जीवनक्रम बदलण्याचा यत्न करतो. याबरोबरच नाटककाराने 'नाटकी नाटके', चित्रपट या माध्यमाच्या आधारे वास्तव आणि बेगडी स्वप्ने यांचेही नाते मांडून पाहिले आहे. सलग सूत्र नसूनही या नाटकातील साध्यासुध्या प्रेमकहाणीला कारुण्याची धार आहे. सामान्य दरिद्री माणसाची क्षुद्र स्वप्ने, सामान्यांच्या ठिकाणी केविलवाणा होणारा ध्येयवाद, या सूत्रांमुळे हे नाटक म्हणजे केवळ कृत्रिम खेळ नाही—त्याच्या तळाशी मानवी अस्तित्वाविषयीची करुणा आहे हे जाणवते. विनोदबुद्धी आणि कारुण्याचा मंद सूर यांचा या प्रयोगातून सहज प्रत्यय येतो.

हे नाटक समूहाचे आहे आणि तरी शरद-मुकुंद हे मित्र आणि ललिता ही नाटकाची नायिका या तिघांना त्यात

विशेष स्थान आहे. सामान्य मुलाची–शरदची–भूमिका करणाऱ्या दिलीप प्रभावळकर यांनी त्यांच्या आंगिक-वाचिक अभिनयाचा नाटकाच्या समजुतीचा प्रत्यय सतत दिला. ‘ रंगायन ’ने सादर केलेल्या ‘ लोभ नसावा ही विनंती ’मधील भूमिकेपासून तो ‘ अलबत्या गलबत्या ’तील चेटकीच्या भूमिकेपर्यंत त्यांच्या अनेक भूमिका मी पाहिलेल्या आहेत. प्रस्तुत नाटकातील शरदच्या पद्धतीच्या भूमिकेवर माधव वाटव्यांच्या अभिनयाची छाप ‘ ससा आणि कासव ’ या नाटकापासूनच पडली आहे. तरी प्रभावळकरांनी स्वतःचा शरद उभा केला, त्या शरदशी थोडे नाते–थोडा दुरावा सुचविणारा प्रेक्षकही उभा केला. त्यांना मिळालेले पारितोषिक व गणपतराव भागवत पुरस्काराचा मान यथायोग्यच होता. प्रतिभा मतकरींनीही जग फारसे न पाहिलेली, तरी दारिद्र्याचा अनुभव घेतलेली, सुखासाठी आसुसलेली ललिता प्रयत्नपूर्वक साकार केली. प्रतिभा मतकरींची अंगयष्टी ललितेच्या भूमिकेला फारशी योग्य नसताही त्यांनी आविर्भावांनी, विशेषतः डोळ्यांच्या-ओठांच्या हालचालींनी ललितेच्या भूमिकेला योग्य न्याय दिला.

## महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेतील

| | | |
|---|---|---|
| १९५४–५५ | १. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन | ‘ उद्याचा संसार ’ |
| | २. महाराष्ट्र कलोपासक | ‘ अंमलदार ’ |
| | ३. बडोदा ॲम्यॅच्युअर्स | ‘ खडाष्टक ’ |
| १९५५–५६ | १. गोवा हिंदू असोसिएशन | ‘ खडाष्टक ’ |
| | २. महाराष्ट्र कलोपासक | ‘ अपूर्व बंगाल ’ |
| | ३. भारतीय विद्याभवन | ‘ श्रीमंत ’ |
| १९५६–५७ | १. गोवा हिंदू असोसिएशन | ‘ संशयकल्लोळ ’ |
| | २. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन | ‘ जगन्नाथाचा रथ ’ |
| | ३. महाराष्ट्र कलोपासक | ‘ रंभा |
| १९५७–५८ | १. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन | ‘ वेड्याचं घर उन्हात ’ |
| | २. भारतीय विद्याभवन | ‘ तीन अंकी हॅम्लेट ’ |
| | ३. गोवा हिंदू असोसिएशन | ‘ करीन ती पूर्व ’ |
| १९५८–५९ | १. कलासहकार, अमरावती | ‘ तुझे आहे तुजपाशी ’ |
| | २. B. E. S. T. कला विभाग | ‘ मधल्या भिंती ’ |
| उत्तेजनार्थ : | फ्रेंड्स् सर्कल, कल्याण | ‘दुरितांचे तिमिर जावो’ |
| | महाराष्ट्र कलोपासक | ‘ दुसरा पेशवा ’ |
| | समर्थ कला मंदिर | ‘ चला आळंदीला ’ |

या संपूर्ण नाट्यप्रयोगाची सफाई संचाच्या संघभावनेतून निर्माण झाली होती. पदन्यासाचे संयोजन मतकरींनी फारच नेमके केले होते. छोट्या भूमिकातील जयश्री कर्वे (पूर्वाश्रमीच्या कु. बांगर–'मी जिंकलो मी हरलो' मधील भूमिका मुंबईकर प्रेक्षकांना स्मरत असेलच) यांचा सहज अभिनय, रवि पटवर्धनांचे बेअरिंग उल्लेखनीय होते. 'कहाणी कुणा प्रेमिकाची' या एकांकिकेचे प्रयोग पाहातानाच त्यातील रंगमंचआनुकूल्य जाणवले होते. परंतु एकांकिकेचे नाटक करणे या प्रक्रिये-विषयी माझ्या मनात अविश्वास असतो. या नाटकाचे स्वरूपच एकाच घटनेची वेगवेगळी रूपे मांडून पहाणे हे असल्या-मुळे त्यातील विस्तार कृत्रिम वाटला नाही. हा प्रयत्न पिरांदेल्लोच्या पद्धतीचा सत्याचे अनेक चेहरे पारखण्याचा गहन प्रयत्न नसला तरी लेखकाच्या अपेक्षांच्या मर्यादेत 'प्रेमकहाणी' हे नाट्यलेखन व त्याचा प्रयोग यशस्वी झाला. मराठी रंगमंचाला एक नवा हौशी नाट्यसंघ मिळाला आहे की ज्याच्याविषयी अपेक्षा बाळगता येतील.

●

## विजेत्या संस्था आणि नाटके

| | | |
|---|---|---|
| १९५९–६० | १. गोवा हिंदु असोसिएशन | 'शारदा' |
| | २. इंडियन नॅशनल थिएटर | 'काचेची खेळणी' |
| उत्तेजनार्थ : | करवीर नाट्यमंडळ | 'माणूस नावाचे बेट' |
| | अहमदनगर वाचनालय | 'वेड्याचं घर उन्हात' |
| | लोकहितवादी मंडळ | 'सुंदर मी होणार |
| १९६०–६१ | १. रंजन कलामंदीर, नागपूर | 'चंद्र नभीचा ढळला' |
| | २. जनता केंद्र, माझगाव–ताडवाडी | 'वाल्मिक' |
| उत्तेजनार्थ : | काळबादेवी ग्रामोन्नती मंडळ | 'एकरूप होऊ सगळे |
| | प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन | 'पवनाकाठचा धोंडी' |
| | ब्राह्मण सेवा मंडळ, घाटकोपर | 'चिमणीचं घर होतं मेणाचं' |
| १९६१–६२ | १. रंगायन | 'ससा आणि कासव' |
| | २. रंजन कलामंदीर | 'काळी माती खारे पाणी' |
| उत्तेजनार्थ : | प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन | 'प्रेमा तुझा रंग कसा' |
| | कलाभारती, पुणे | 'शितू' |
| | अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंडळ | 'श्रीमंत' |

# घाशीराम कोतवाल
# पी. डी. ए.

विजय तेंडुलकरांनी नवे नाटक लिहिले,की ती वार्ता सहसा गुप्त रहात नाही. अनेक महिने 'जब्बारकडे तेंडुलकरांचे नवे चांगले नाटक आहे' ही वार्ता कानी येत होती. नंतर पुण्याच्या केंद्रस्पर्धेच्या फेरीत 'घाशीराम कोतवाल' दुसरे आल्याची आणि त्या नाटकातील नाना फडणवीसांच्या व्यक्तिचित्राविषयी वाद निर्माण झाल्याचेही ऐकत होतो. पण या सर्व वार्तांमध्ये मराठी रंगमंचावर एक विलक्षण नाटयप्रयोग केला जात आहे याचा फारसा गंध नव्हता. त्यामुळे पुण्याच्या पी. डी. ए. ने केलेला



दिग्दर्शक
जब्बार पटेल

'घाशीराम कोतवाल'चा प्रयोग पहाणे हा एक अनपेक्षित अनुभव होता.

मराठी रंगभूमीच्या संगीत परंपरेविषयी वा 'संगीत नाटक हाच मराठी रंगभूमीचा स्वभाव आहे' याविषयी आपण नेहमी बोलत वा ऐकत असलो तरी संगीत रूपाचे तर्कशास्त्र ज्या नाटकाच्या अंगी लागलेले आहे, आणि म्हणून लय हा ज्या अविष्काराचा स्वभाव आहे, असे नाटचप्रयोग मराठी माणसाला अनुभवायला मिळत नाहीत. 'घाशीराम कोतवाल' या नाटचप्रयोगाचे वैशिष्टच हे की त्यात अविष्कारपद्धती आणि कथासूत्र हे वेगळे उरतच नाहीत. लय आणि ताल हे माध्यम नाटककार, दिग्दर्शक संगीतकार, या सर्वांनी वापरले असल्यामुळे या नाटचप्रयोगाचा सारा ओघ, एका प्रवेशाकडून दुसऱ्या प्रवेशाकडे जाणे, एका चित्तवृत्तीतून दुसऱ्या चित्तवृत्तीत जाणे, हे ध्वनीतील लय आणि ताल यांच्याद्वारे होते.

'घाशीराम कोतवाल' हे या नाटकाचे शीर्षक असले तरी हे घाशीरामाची कथा सांगणारे नाटक नाही अथवा सध्या वर्तमानपत्रात चालू असणाऱ्या चर्चेने सुचविल्याप्रमाणे नानांचे एकांगी चित्रण करणारे, एका ऐतिहासिक मान-

बिंदुवर चिखलफेक करणारेही नाटक नाही. किंबहुना जे या नाटकाविषयी याप्रकारचे आक्षेप घेतात त्यांना या नाटकाकडे जायची खरी वाट सापडलीच नाही असे म्हणावयास हवे. एक माणूस समूह—समाज—झुंड या क्रमाने माणसाचे माणूसपण हरवत जाते. मग मनुष्य समाजाचा बळी होतो आणि तो बळी झाला की इतरांच्या रक्ताची तहान त्याला लागते. समाज पुरुषाचे उग्र स्वरूप, व्यक्तीचे व्यक्तित्त्व शोषून घेण्याची त्याची शक्ती हा या नाटकाचा अनुभव ब्राह्मणशाहीच्या अनुभवातून नाटककाराने व्यक्त केला आहे. कोण त्याही राज्याच्या अवनतीच्या काळातील समाज हा विवेकबुद्धी हरवलेला समाज असतो. सामाजिक इतिहासामध्ये या (decadence) अवकळेला फार महत्त्वाचे स्थान असते. हा ब्राह्मणशाहीचा अनुभव समान पोशाख केलेल्या, एका तालात हलणाऱ्या ब्राह्मणांच्या भिंतीतून व्यक्त होतो. प्रेक्षक या ब्राह्मणशाहीकडे पाहतो तो तीन आधारांच्याद्वारा. पुण्याला परका असलेला घाशीराम, त्यांच्यातला एक असूनही त्यांच्यापासून दूर होऊ शकणारा सूत्रधार आणि या साऱ्या काळावर ज्याची सावली पडली आहे असा इंग्रज अधिकारी, या तीन बिंदूंतून



श्री गणराय नर्तन करी । आम्ही पुण्याचे बामण हरी

जाणारी रेषा ब्राह्मणशाहीच्या संपूर्ण अनुभवाला फार अर्थपूर्ण छेद देते. नृत्यात्मक लयीत होणाऱ्या हालचालींमुळे माणूस समूहातला एक होण्याची प्रक्रिया आणि समूहातून बाहेर आल्यावर स्वत:ची गद्य लय गवसण्याची प्रक्रिया सूत्रधार कधी या एकलयीत हलणाऱ्या ब्राह्मणांच्या भितीतला एक असणे तर कधी त्या लयीतून बाहेर येऊन स्वत:च्या डोळ्यांनी बघू शकणारा एक

## महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेतील

| | | |
|---|---|---|
| १९६२–६३ | राष्ट्रीय आणीबाणीमुळे महोत्सव रद्द. | |
| १९६३–६४ | १. रंजन कलामंदीर | 'वऱ्हाडी मानसं' |
| | २. पार्ले कॉलेज | 'ससा आणि कासव' |
| उत्तेजनार्थ : | इंडियन नॅशनल थिएटर | 'फोन नं. ३३३३३' |
| | यु. टि. सी. नागपूर | 'धाकटी आई' |
| | रंगायन | 'कावळ्यांची शाळा' |
| १९६४–६५ | १. महाराष्ट्र कलोपासक | 'कथा कुणाची व्यथा कुणा' |
| | २. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन | 'शारदा' |
| उत्तेजनार्थ : | रंजन कलामंदीर | 'चार कथा एक व्यथा' |
| | इंडियन नॅशनल थिएटर | 'फास' |
| | सहकार नाट्यमंडळ, मालाड | 'रंभा' |
| १९६५–६६ | १. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन | 'तू वेडा कुंभार' |
| | २. बहुरुपी | 'पस्तीस तेरा नव्वद' |
| उत्तेजनार्थ : | रंगायन | 'बाधा' |
| | नाट्यभारती, इंदूर | 'कारकून' |
| | नाट्यसंघ, नाशिक | 'याचसाठी केला होता अट्टाहास' |
| १९६६–६७ | १. रंजन कलामंदीर | 'नयन तुझे जादूगार' |
| | २. नाट्यभारती | 'लोह परिसा लागेना' |
| उत्तेजनार्थ : | ललित कलासाधना | 'सागर माझा प्राण' |
| | वरेरकर नाट्यसंघ, बेळगाव | 'कांचनमृग' |
| | राजहंस नाट्यसंघ, कुर्ला | 'अपराध मीच केला' |
| १९६७–६८ | १. B. E. S. T. | 'संभूसांच्या चाळीत' |
| | २. नटराज, वांद्रे | 'काका किश्याचा' |

असणे, यातून व्यक्त होते.

ध्वनीला शब्दसमान अर्थ नसला तरी विशुद्ध, आर्ष अशा मानवी भावना व्यक्त करण्याचे सामर्थ्य शब्दापेक्षा अधिक असते. या सामर्थ्याचा प्रस्तुत प्रयोगामध्ये दिग्दर्शक व संगीत दिग्दर्शक यांनी फार परिणामकारक वापर केला. ललितागौरीसारखी कोवळी मुलगी नानांच्या भक्ष्यस्थानी पडणार हा भयावह अनुभव 'आ'कारात असणाऱ्या

## विजेत्या संस्था आणि नाटके

| | | |
|---|---|---|
| उत्तेजनार्थ : | प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन | 'सती' |
| | नाट्यभारती | 'रायकरवाडी' |
| | अहमदनगर कॉलेज | 'सैनिक नावाचा माणूस' |
| १९६८–६९ | १. थिएटर ग्रुप, नगर | 'काळे बेट लाल बत्ती' |
| | २. रंगायन | 'लोभ नसावा ही विनंती' |
| उत्तेजनार्थ : | उदय कलाकेंद्र | 'का ? असंच का ?' |
| | आर्टिस्टस् कंबाईन, ग्वाल्हेर | 'कुचलिया वृक्षाची फळे' |
| | बंगाली असोसिएशन, नागपूर | 'नाव नाही नाटकाला' |
| १९६९–७० | १. थिएटर युनिट | 'वल्लभपूरची दंतकथा' |
| | २. आर्टिस्टस् कंबाईन | 'मना त्वाचिरे' |
| उत्तेजनार्थ : | रंगायन | 'दंबद्वीपचा मुकाबला' |
| | उदय कलाकेंद्र | 'ग्रॅण्ड रिडक्शन वेल' |
| | रंजन कलामंदीर | 'मेरू मंदार धाकुटे' |
| १९७०–७१ | १. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन | 'अशी पांखरे येती' |
| | २. ललित कलासाधना | 'मला उत्तर हवंय' |
| उत्तेजनार्थ : | रंगायन | 'अंत नाही' |
| | रसिकाश्रय अकोला | 'बाकी इतिहास' |
| | स्टेट बँक | 'आमचं नाव बाबूराव' |
| १९७१–७२ | १. महाराष्ट्र कलोपासक | 'कालाय तस्मै नमः' |
| | २. गुरुदत्त मित्रमंडळ | 'सहलीला सावली आली' |
| उत्तेजनार्थ : | 'धी इंडिया कल्चर लीग' | 'अवध्य' |
| | उदय कला केंद्र | 'पाचोळा जळत नाहीए' |
| | बडोदे ॲमॅच्युअर्स ड्रॅमॅटिक क्लब | 'चिमणीचं घर होतं मेणाचं' |

आहुतीच्या सहकल्पनेने व्यक्त करणे, नाना ननाना अशा ध्वनिसाम्यातून तराण्यात शिरणे, भिन्न तालवाद्यांच्या योजनेने अर्थसूचन करणे अशी अनेक उदाहरणे देता येतील. 'घाशीराम कोतवाल'मधील लावणीचा बाज मात्र जमलेला नाही. मनाला मोहिनी घालणाऱ्या लयीची कल्पना वा शब्द प्रेक्षकापर्यंत पोचू शकलेले नाहीत.

हा नाट्यप्रयोग म्हणजे एका प्रचंड संचाच्या विविध विरचना आहेत. त्या दिग्दर्शकाने व नटांनी विलक्षण नेमकेपणाने सादर केल्या आणि तरीही त्याला कवायतीचे कृत्रिम स्वरूप येऊ दिले नाही. त्या विरचनात दृश्यमाध्यमाची जाणीव आहे, नाट्यानुभव व्यक्त करताना आवश्यक असा लवचिकपणा आहे. या प्रयोगाच्या सांगितिक स्वरूपाला ब्राह्मणांच्या भिंतीचे धृपद आहे- या ब्राह्मणांच्या पाठी, रांगेची वेगळी मोडणी, तर कधी वर्तुळ, कधी झाडांच्या आकारात पाय हात मोडून उभे राहिलेले ब्राह्मण, अशी विविध दृश्यरूपे योजून नाट्याचा प्रवाह अव्याहत राखला जातो.

अशा प्रकारच्या नाट्यप्रयोगात वैयक्तिक अभिनयाला स्थान नसते. (किंबहुना सांकेतिक पात्रकल्पना, कथाविस्ताराच्या कल्पना या कशालाच स्थान नसते.) परंतु मोहन आगाशे यांनी आपली नजर, आवाजाचा आत्मविश्वासपूर्वक संथपणा, शब्दांना दिलेले वळण यातून या नाटकाच्या कक्षेतील 'नाना' अतिशय परिणामकारकतेने व्यक्त केला. स्वरूपा नारके या रूढार्थाने सुंदर नसल्या तरी त्यांची कृश शरीरयष्टी आणि टपोरे डोळे यातून वेधक व्यक्तिचित्र त्या निर्माण करू शकल्या. इतर स्त्रीपात्रे मात्र फार कमकुवत वाटली. घाशीरामाची भूमिका टिळेकरांनी अत्यंत सांकेतिक भडक स्वरूपात सादर केली असा समज होण्याची शक्यता आहे. परंतु या नाटकातील घाशीरामाचे प्रयोजन पाहता 'राक्षस' या कल्पनेला ज्याप्रमाणे भयावह मुखवटा असतो, व्यक्तिरूप नसते, तसाच घाशीराम उभे करणे अगत्याचे होते – म्हणूनच त्याचा मृत्यू (' Death Dance ') काळनृत्य आणि मग शांतता या क्रमाने रंगविला गेला आहे. या नाटकातील दिव्याचा प्रसंग नाटककार व दिग्दर्शक यांनी वेगळा संकल्पिलेला आहेच. परंतु ज्या नटाने तो सादर केला त्याने तो अधिकच भयावह केला. नाटकामागील माणसाने केलेली माणसाची शिकार हे जे सूत्र आहे त्याला या दिव्याच्या दृश्याने अधिक परिणामकारकता आली आहे.

'घाशीराम कोतवाल' हा नाट्यप्रयोग इतका विलक्षण आहे की त्याचे विश्लेषण करीत गेले तर त्यास अंत नाही. जब्बार पटेल–सतीश आळेकर हे दिग्दर्शक, चंदावरकर–मुळगुंद हे संगीत-नृत्य दिग्दर्शक आणि 'पी. डी. ए'चा नटसंच यांनी एका विलक्षण प्रभावी दृश्यश्राव्यनाट्याचा अनुभव आपल्याला दिला. माझ्या आतापर्यंतच्या आयुष्यात प्रेक्षक म्हणून जे काही अविस्मरणीय मी अनुभवले त्यातले 'घाशीराम' एक

आहे. विजय तेंडूलकरांचे कोणतेही नवे नाटक रंगभूमीवर आले की विशिष्ट वर्तमानपत्रातून, विशिष्ट व्यक्तींच्या व्याख्यानातून हळूहळू रान कसे उठविण्यात येते हे आपल्याला आता समजू लागले आहे. तुमच्या--माझ्यासारख्या सामान्य प्रेक्षकाला या वाङ्मयीन (?) वादांशी काय कर्तव्य? (त्यामागचे वेगळे रंग न ओळखण्याइतके आपण भोळे राहिलो नाही.) म्हणून आपल्याला एक विलक्षण नाटयानुभव मिळाला याने आपण खुश असायला काय हरकत आहे?

●

## हयवदन
## आराधना नाटयसंघ

'घाशीराम कोतवाल'सारखा परिपूर्ण नाटयप्रयोग झाल्यावरच यावर्षीच्या स्पर्धेचे सार्थक झाल्यासारखे वाटले. आणि मग एकदम स्मरले की 'घाशीराम कोतवाल' पुणे केंद्रातून दुसरे आले आहे. या नाटयप्रयोगाहून 'हयवदन' नाटकाचा प्रयोग कसा आणि किती चांगला असेल या कुतूहलाने दुसऱ्या दिवशी 'हयवदन'चा प्रयोग पाहण्यासाठी गेले. नाटयस्पर्धा या प्रकारावरचा विश्वास उडावा असे काहीतरी समोर पाहिले. इतक्या समर्थ नाटकाचा इतका वाईट प्रयोग अनेक वर्षांत पाहिला नव्हता. चिं. त्र्यं. खानोलकरांचा अनुवाद (मूळ लेखक :गिरीश कार्नाड) फारसा परिणामकारक नव्हता. दिग्दर्शकाला नाटकाचा रोख उमजला नव्हता. नाटककाराने योजलेल्या प्रत्येक आविष्कारपद्धतीचे विडंबनच त्याने सादर केले. असे नाटक 'घाशीराम कोतवाल'-शी स्पर्धा करू शकते हेच आश्चर्य; नाटयक्षेत्रातील सुजाण सोडाच पण साधी देहयष्टी आणि श्रुति असणाऱ्या कोणाही व्यक्तीला परीक्षक केले असते तरी निर्णय योग्य घेतला गेला असता. यापेक्षा अधिक काय लिहावे? कलेच्या क्षेत्रात कलाबाह्य राजकारण सतत येत असते. का येते? या प्रश्नाचे उत्तर आपल्याकडे कसे असणार? बरे हा चमत्कार इथेच संपला नाही. गोव्याची दोन्ही नाटके झाल्यानंतर, 'घाशीराम कोतवाल' आणि 'प्रेमकहाणी' याच्या पहिल्या दुसऱ्या क्रमांकाविषयी कुणाच्याही मनात शंका नव्हती. यंदा वाद निर्माण होऊ नयेत इतके हे दोन नाटयप्रयोग इतर नाटयप्रयोगांपेक्षा उजवे होते. 'मेन विदाऊट शॅडोज' ह्या नाटयप्रयोगात अनेक उणीवा होत्या. क्षणभर असे मानले की 'घाशीराम'च्या लेखनाविषयी वाद होते : परंतु ही स्पर्धा नाटयप्रयोगाची होती. 'घाशीराम'-सारखी रंगभूमीचे सुजाण भान व्यक्त

करणारी अवघड विरचना अत्यंत सहज सफाईने सादर करणारी नाटचनिर्मिती स्पर्धेच्या प्रेक्षकांनी अनेक वर्षांत पाहिली नव्हती. असो. परीक्षकांनी चिकटवलेल्या क्रमांकामुळे प्रयोगाची प्रतवारी ठरत नसते. ●

यंदाच्या स्पर्धेतील नाटके मी बघितली! ती पहात असताना विविध तपशील खटकले. जाता जाता या स्फुट तपशीलांचा उल्लेख केल्यास स्पर्धेचे चित्र पूर्ण होण्यास मदत होईल.

★ नाटक ही एक एकसंध निर्मिती आहे. त्यातील नेपथ्य, सजावट, प्रकाशयोजना इत्यादी तपशील सजावटीसारखे असून चालत नाहीत. त्यांचे नाटचवस्तूशी आंतरिक नाते असावे लागते, याचा विचार बहुसंख्य दिग्दर्शक करीत नाहीत.

★ अजूनही नाटकातील स्त्रीपात्रे, साडी-लुगडचाला काही महत्त्व असते याचा विचार न करता भपकेबाज साडयांची निवड करतात असाही अनुभव या स्पर्धेत आला. प्रत्यक्ष आयुष्यात तुम्ही साडी कशीही नेसत असलात तरी रंगमंचावर येताना परकर खाली लोंबत असणे (वेंधळेपणा दाखविण्यासाठी नाही), आपल्या शरीराच्या उंचीचा, ठेवणीचा विचार न करता पदराची विशिष्ट शैली पत्करणे, म्हणजे अनेक प्रेक्षकांच्या डोळ्यांवर अन्याय असतो. नऊवारी नेसणे दुर्मिळ झालेले असले तरी रंगमंचावर कसेतरी नऊवारी गुंडाळणे अक्षम्य आहे. [ 'घाशीराम'च्या नेटक्या प्रयोगाला असे गालबोट लागले होते. पुणेकरांकडून तर ही अपेक्षा नव्हती. 'रायगडा'तील येसूबाई अनेकदा पाचवारी नेसणाऱ्या पद्धतीने पदर ओढीत होती. ]

★ मराठीचे उच्चारण ही एक वस्तुनिष्ठ गोष्ट नाही याची जाणीव ठेऊनही अनेक नाटकातील पात्रांचे शब्दोच्चार कानांना खटकतात. ध्वनिक्षेपक असूनही पाचव्या ओळीपलीकडे अनेक नाटकातील काही संवाद पोचत नव्हते. याचा अर्थ माणसाचा आवाज आणि ध्वनिक्षेपक साधने यांचा दिग्दर्शकाने योग्य उपयोग करून घेतला नव्हता.

दरवर्षी स्पर्धा येतात, अनेक नाटचसंस्था परिश्रमपूर्वक नाटके सादर करतात. अशी नाटके सादर करणाऱ्या हौशी नाटचसंस्थांची महाराष्ट्रातील संख्या तीनशेवर आहे. परंतु केवळ एक संहिता निवडून तिचा प्रयोग करणे म्हणजे नाटचाविषयी आस्था असणे ही समजूत चुकीची आहे. कलेच्या प्रांतातील हौस इतकी सोपी कधीच नसते. नाटक हे एक सांगणे आहे; तुम्हाला नाटचाकडे जाण्याचा विशिष्ट दृष्टिकोन असल्याशिवाय त्याचे तर्कशास्त्र उलगडणार नाही. अलीकडच्या काही वर्षांत नाटचस्पर्धा निर्जीव होत आहेत असे आपण म्हणतो, याचे मूळ कारण नाटकाची संवेदनाक्षमता नसणारे अनेक केवळ एक प्रयोग करण्याच्या आकांक्षेने रंगमंचावर उभे रहात आहेत.

आकांक्षी संहितेची निवड, संहितेच्या स्वभावानुसार नैसर्गिकतः त्यातून फुलत गेलेला दृश्य आविष्कार, संहितेने झपाटलेला नटसंच हे दृश्य आज दुर्मिळ झाले आहे. ● ● ●

# शासकीय नाट्यस्पर्धेची अठरा वर्षे

## काही विचार

मुंबईत १९५४–५५ या वर्षांत प्रथम स्पर्धा झाली. परतु महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर म्हणजे १९६१–६२ मध्ये जी स्पर्धा झाली त्या स्पर्धेला प्रथम मानून यंदा जी स्पर्धा झाली ती बारावी मानण्यात येते.

शासकीय नाट्यस्पर्धा ह्या मराठी नाट्यवर्तुळातील एक महत्त्वाचा भाग आहे. आज इतकी वर्षे चालू असणारी ही स्पर्धा मराठी सामाजिक वातावरणाचा एक घटक बनली आहे. म्हणूनच या स्पर्धेने साधले काय? अजून काय साधले नाही? अथवा ही स्पर्धा आणखी काही करू शकेल? या प्रश्नांचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. प्रथमच एक मान्य केले पाहिजे की स्पर्धेने इतक्या वर्षांत अनेक नव्या नटांना, दिग्दर्शकांना, नाटककारांना प्रकाशात आणले, तसेच नाट्यातील प्रयोगांची जाणीव असणारा प्रेक्षकवर्ग निर्माण केला. मुख्य म्हणजे नाट्यसंस्थांना एक तयार रंगमंच व प्रेक्षकवर्ग उपलब्ध करून दिला आणि हे फक्त मुंबई शहरापुरते केले नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील कलावंतांना ही संधी उपलब्ध करून दिली. आपल्यासारख्या स्वतुष्ट मुंबईकरांना गावोगावच्या कलावंतांचा परिचय करून घेण्याचीही संधी दिली. आज स्पर्धा सुरू होऊन इतकी वर्षे झाल्यानंतर आपल्याला या स्पर्धेत दोष दिसत असले तरी ज्या काळात ही स्पर्धा सुरू झाली तो काळ विसरून चालणार नाही.

१९५४–५५ सालात हळूहळू मुंबईत नाटकाविषयीचे सुजाण कुतुहल नव्याने जागे होऊ लागले होते. 'भारतीय विद्याभवन'च्या 'कलाकेंद्र' तर्फे होणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेने त्याकाळातील तरूण पिढीतून नवे कलावंत निर्माण केले, नवा प्रेक्षकवर्ग निर्माण केला. नव्हे, हिंदी चित्रपटाकडे जाणारा प्रेक्षकवर्ग मराठी नाटकांकडे वळवला. हेच कार्य राज्य नाट्यस्पर्धेने विस्तृत परिघात केले. या काळात शिवाजी नाट्यमंदिर (आजच्या स्वरूपात), रवींद्र नाट्यमंदिर ही प्रेक्षागृहे नव्हती. मुंबई मराठी साहित्यसंघाचे प्रेक्षागृह, रंगभवन, भारतीय विद्याभवनचे प्रेक्षागृह आणि दादर विभागात प्रयोग करावयाचा असल्यास किंग जॉर्ज हायस्कूलचे प्रेक्षागृह (या प्रेक्षागृहात 'ललितकले'च्या वा इतर संस्थांच्या नाटकाचे प्रयोग होत असत!) एवढीच प्रेक्षागृहे होती. नाटकाला जाण्याची सवय असणारा प्रेक्षकवर्गही विखुरलेला होता आणि 'इंडियन नॅशनल थिएटर'चे भेंडे दाम्पत्य व त्यांचे सहकारी, 'भारतीय विद्याभवनात' एकत्र आलेले

विजया जयवंत (मेहता), नंदकुमार रावते, दामू केंकरे—या सर्व तरूण मंडळींना नवा रंगमंच, नवी हौशी चळवळ उभी करावयाची होती. या सर्वांचा नाटके करावयाची कुठे व कोणासाठी हा प्रश्न स्पर्धेने काही अंशी सोडवला.

ज्या अर्थाने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमुळे मराठीतील एकांकिका-लेखनाचा वेग वाढला व एकांकिका अधिकाधिक प्रयोगप्रवण होऊ लागल्या त्याच अर्थाने मराठीतील अनेक नवे नाटककार, अनुवादकार स्पर्धेच्या प्रोत्साहनामुळे लेखनाला प्रवृत्त झाले. याशिवाय वेगवेगळ्या संस्थांचे नाटककार निर्माण झाले, नाटकमंडळीच्या बिऱ्हाडी असणाऱ्या तालीममास्तर नाटककाराची काही नवी रूपेही जाणवू लागली.

या नाट्यस्पर्धांच्याकडे वळणारा सारा प्रेक्षकवर्ग काही सुजाण नव्हता—आजही नाही. परंतु स्वस्त उत्सवपत्रिकेच्या मोहाने वर्षामागून वर्षे स्पर्धा पाहणाऱ्या प्रेक्षकांतून काही सुजाण प्रेक्षक निर्माण झाले. रंगभूमीवरील वेगवेगळ्या प्रयोगांचे ऐतिहासिक, तुलनात्मक भान त्यांना निर्माण झाले. नकळतपणे हा प्रेक्षक व्यावसायिक प्रयोगाला जाताना हे संस्कार बरोबर घेऊन जाऊ लागला, व्यावसायिक दिग्दर्शक वा निर्माते हळूच एखाद्या प्रयोगाला डोकावू लागले, त्यापासून काही शिकू लागले, तर कधी एखाद्या चांगल्या नटाला वा नटीला संधी देऊ लागले.

काही स्पर्धकांच्या वा प्रेक्षकांच्या मनात या स्पर्धेचा विकास कसा व्हावा याविषयीच्या ज्या अपेक्षा होत्या त्या मात्र पुऱ्या झाल्या नाहीत. याला स्पर्धेच्या संचालकांपेक्षा स्पर्धकांचा दृष्टिकोन अधिक कारणीभूत आहे असे मला वाटते. तयार प्रेक्षकवर्ग उपलब्ध झाल्यावर आकांक्षी नाट्यप्रयोग करण्यात व्यावसायिक धोका नसतो. त्यामुळे हौशी नाट्यसंस्था दरवर्षी स्पर्धेच्या निमित्ताने अधिकाधिक आकांक्षी (म्हणजे वैभवशाली नव्हे. कारण प्रयोगाचा आर्थिक भार संस्थेलाच सोसावा लागतो) नाट्यप्रयोग सादर करतील ही प्रारंभीची अपेक्षा फोल ठरली. याची कारणे आपल्या नाट्यवर्तुळातील वातावरणात अधिक आहेत. एकतर केवळ स्पर्धेसाठी एक नाट्यप्रयोग सादर करणाऱ्या साऱ्याच हौशी नाट्यसस्था या प्रयोगशील नाट्यसंस्था नाहीत. नाट्याविषयीचा काही निश्चित दृष्टिकोन बाळगणाऱ्या नाट्यसंस्था अत्यल्प आहेत. नाट्यसंहिता निवडताना तिच्या मूलभूत श्रेयस्करतेपेक्षा नेपथ्याला, प्रकाश योजनेला वाव आहे का ? वैयक्तिक पारितोषिक पात्र अभिनयाला वाव आहे का ? परीक्ष-

काला कळेल का? अशा अप्रस्तुत प्रश्नांची चर्चाच अनेकवेळा अधिक होते. काही संस्था व दिग्दर्शक केवळ पारितोषिकापुरते आकांक्षी असतात—मग पूर्वी पारितोषिके मिळालेल्या नाटचप्रयोगांसारखे नाटचप्रयोग करण्याचा यत्न सुरू होतो. पण हे सारे नाटचस्पर्धेचे दोष नसून आपल्या नाटचविषयक जाणीवेतले दोष आहेत; आपल्या रंगभूमीवरील निष्ठेतील कच्चेपणा आहे. यामुळेच स्पर्धेतील नाटचप्रयोग हे त्या त्या वर्षातील सर्वोत्कृष्ट प्रायोगिक प्रयत्न असावेत ही अपेक्षा फोल ठरली आहे.

हे खरे असले तरी स्पर्धेच्या संचालकांनी काही सुधारणा करून पहाण्यासारख्या आहेत.

★ नाटचप्रयोगाच्या कालमर्यादेच्या नियमाचा पुर्नविचार. कारण या नियमामुळे काही चांगल्या संहिता नाकारल्या जातात वा भर घालून विद्रूप केल्या जातात.

★ जिल्हापातळीवर नाटचविषयक ग्रंथांचे सुसज्ज ग्रंथालय स्थापन करणे. आणि वर्षात काही शिष्यवृत्या देऊन काही होतकरू नट, दिग्दर्शकांना देशातील (निदान महाराष्ट्रातील) उत्तम नाटचप्रयोग पाहता येतील अशी सोय करणे.

शासकीय नाटचशिबीरात मला असे काही नट, दिग्दर्शक भेटले होते की प्रथम पारितोषिक मिळालेला एकही नाटचप्रयोग त्यांनी पाहिला नव्हता वा अन्यही चांगली नाटके पहाण्याचा त्यांना योग आला नव्हता.

★ संपूर्ण स्पर्धेतील (प्राथमिक फेरी, अंतिम फेरी असा भेद न करता) नाटचदृष्टचा आकांक्षी प्रयत्नास वेगळे पारितोषिक देणे.

★ इतक्या केंद्रामध्ये नाटचविषयक जाण असणारे परीक्षक लाभणे अवघड आहे हे माहीत असूनही अशी सूचना करावीशी वाटते की 'श्री. ना. पेंडसे कोण?' 'स्पॉट ते काय असतं' 'या शीर्षकाचा अर्थ काय?' 'शांतता...' हे काय नाटक आहे?' असे प्रश्न विचारणारे परीक्षक नसावेत. परीक्षकांचा निर्णय केवळ गुणांच्या बेरजेने किंवा प्रांतिक हट्टापायी न होता दर रात्रीच्या प्रयोगानंतर चर्चा होईल अशी सोय करणे शक्य असावे.

★ दरवर्षी शक्य नसेल तर काही वर्षानंतर एकदा आमंत्रित संस्थांना एक वर्षाची पूर्वसूचना देऊन, खर्च देऊन उत्तम नाटचप्रयोग करण्यास आमंत्रण द्यावे. हे वर्ष स्पर्धेचे न मानता महोत्सवाचे मानावे. या महोत्सवाला काही मुंबईबाहेरील प्रेक्षकांना आमंत्रणे पाठवावीत वा महोत्सव महाराष्ट्रात तीन ते चार केंद्रात करावा. •

महाराष्ट्र राज्य हे माझ्या माहिती-प्रमाणे एकमेव राज्य आहे की जे नाटयस्पर्धेसाठी लाखो रुपये खर्च करते. परंतु हे पैसे कारणी लावण्याची जबाबदारी अखेर नाटककार, दिग्दर्शक, नट व संस्थांचे चालक यांची आहे. तरी सणाप्रमाणे स्पर्धा केवळ साजरी न करता तिचा अधिक सखोल विचार व्हावा !

● ● ●

## नेपथ्य व प्रकाशयोजनेची पारितोषिके

१९६१–६२ सालापासून म्हणजेच पहिल्या महाराष्ट्र नाटयमहोत्सवापासून नेपथ्य व प्रकाशयोजनेची पारितोषिके देण्यात येऊ लागली. ही पारितोषिके मिळविणाऱ्या कलावंताची नावें खाली आहेत. [ फक्त १९६९–७० व १९७०–७१ या दोन सालातील तपशील उपलब्ध झालेला नाही. ]

### नेपथ्य

| | | |
|---|---|---|
| १९६१–६२ | श्री. प्रकाश मळकर्णेकर | ' ससा आणि कासव ' |
| १९६३–६४ | श्री. बाबा पार्सेकर | ' कावळयांची शाळा ' |
| १९६४–६५ | श्री. राजा नातू | ' कथा कुणाची व्यथा कुणा ' |
| १९६५–६६ | श्री. श्रीधर राजगुरु | ' तू वेडा कुंभार ' |
| १९६६–६७ | श्री. बाबा पार्सेकर | ' सागर माझा प्राण ' |
| १९६७–६८ | श्री. आनंद पै | ' ही चौकट वाटोळी ' |
| १९६८–६९ | श्री. आनंद पै | ' अडीच घरं वजीराला ' |
| १९७१–७२ | श्री. रमेश खानविलकर<br>श्री. रमेश उमरोटकर | ' पाचोळा जळत नाहीए ' |

### प्रकाशयोजना

| | | |
|---|---|---|
| १९६१–६२ | श्री. राजा नातू | ' शितू ' |
| १०६३–६४ | श्री. कमलाकर गांगुली | ' फोन नं. ३३३३३ ' |
| १९६४–६५ | श्री. विजय लागू | ' शारदा ' |
| १९६५–६६ | श्री. सुधाकर करमरकर | ' पस्तीस तेरा नव्वद ' |
| १९६६–६७ | श्री. गणेश नायडू | ' नयन तुझे जादूगार ' |
| १९६७–६८ | श्री. बाबा पार्सेकर | ' खेळ दो जीवांचा ' |
| १९६८–६९ | श्री. सपन मित्रा | ' नाव नाही नाटकाला ' |
| १९७१–७२ | श्री. विसू कामेरकर | ' पाचोळा जळत नाहीए ' |

[ श्री. प्रकाश मळकर्णेकर वा श्री. बाबा पार्सेकर या दोन नावांव्यतिरिक्त आज व्यावसायिक रंगभूमीवर नेपथ्य वा प्रकाश योजना करणाऱ्या व्यक्तिचे नाव वरील नावात नाही हे महत्त्वाचे वाटते. ]

●

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH-649

१९५४-५५ सालात हळूहळू मुंबईत नाटकाविषयीचे सुजाण कुतुहल नव्याने जागे होऊ लागले होते. 'भारतीय विद्याभवन'च्या 'कलाकेंद्रा'तर्फे होणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका-स्पर्धेने त्याकाळातील तरुण पिढीतून नवे कलावंत निर्माण केले, नवा प्रेक्षकवर्ग निर्माण केला. नव्हे, हिंदी चित्रपटाकडे जाणारा प्रेक्षकवर्ग मराठी नाटकांकडे वळवला. हेच कार्य राज्यनाट्यस्पर्धेने विस्तृत परिघात केले.

प्रेमकहाणी

